# माणूस

चित्र वार्ता पुस्तक

१ जानेवारी ७४ • एक रुपया



संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

# माणूस चित्र वार्ता पुस्तक

एक जानेवारी १९७४ किंमत एक रुपया अंक अकरावा



# १९७४




## मेष:

इतरांना मेषपात्रं बनवून साखरेच्या लाईनीत पुढे याल.



## वृषभ:

हाताखालच्या लोकांकडून बैलासा
श्रम करून घेण्यात घवघवीत यश तुमचेच.



## कर्क:

पोहू नका. खेकडयापासून भय संभवते.



## मिथून

जोडीने मेहूण म्हणून वर्षभर फुकटात जेवाल!



## सिंह:

मंडळींच्या भगीरथ प्रयत्नाने लाभलेल्या रेशनमध्ये तुमचा वाटा सिंहाचा राहील.



## कन्या:

आठ असतील तर नववी हमखा

# (वि)चित्र भविष्य



## तूळ:

दिवस फार खराब आहेत.
तोलून मापून बोलत चला.



## वृश्चिक:

कोणत्याही वादात पडू नका. आयत्यावेळी
चक्क नांगी टाकावी लागेल!



## धनू:

सऱ्याच्या धनावर नेहमी तुमचा डोळा राहील.




## मकर:

तुमचेच हितचिंतक तुमचे दात
तुमच्या घशात घालायला
कमी नाही करणार!




## कुंभ:

तुमचे खरे यश कुंभात!
लावा!! कुंभ लावा कुंभ!!!



## मीन:

तळलेले मासे एकदम वर्ज्य.




प्लीज मागे फिरा...
आज मुंबई बंद आहे.


# बंद... बंद... काही प्रश्न ?

**छाया : मोहन नावेलकर**





म्हणून तर लोकल्सची धडधड बंद पडून
त्या स्थानकावर विश्रांती घेत आहेत.





१८ डिसेंबर, १९७३ ला शिवसेनेने मुंबई बंद केली. अगदी संपूर्ण बंद ! 'बंद' हा प्रकार मुंबईकरांना आता जुना झाला आहे. अनेक 'बंद' त्यांनी अनुभवले आहेत. पण, ह्या सर्व 'बंद'मध्ये परवाच्या 'मुंबई बंद' चे यश घवघवीत होते ह्याबद्दल वाद नाही. १७ वर्षे बेळगावचा प्रश्न कुजतो आहे. अलिकडे खुद्द बेळगावात, मराठी जनतेवर झालेल्या अत्याचारांच्या निषेधात ह्या प्रश्नाला नव्याने तोंड फुटले, आणि बघता बघता दोन्ही बाजूंनी उग्र रूप धारण केले. महाराष्ट्र आणि कर्नाटक दोन्ही ठिकाणी हिंसाचाराची नवी लाट उसळली. ह्या पार्श्वभूमीवर परस्परांवरील अत्याचारांच्या निषेधार्थ वेगवेगळ्या ठिकाणी 'बंद' अंमलात आले. कोल्हापूर, अथणी वगैरे ठिकाणी 'बंद'च्या वेळी मोठ्या प्रमाणावर हिंसाचार घडले. एक प्रकारचे दहशतवादाचे वातावरण सर्वत्र तयार झाले. ह्या वातावरणातच १७ डिसेंबर उजाडली. काँग्रेससह सर्वच पक्षांनी बंदला पाठिंबा घोषित केला. खुद्द महाराष्ट्र शासनाची भूमिकाही बंदला सहानुभूतिदर्शकच होती. १८ तारखेच्या 'बंद'चे यश असे १७ तारखेलाच निश्चित झाले होते. बृहन्मुंबईतल्या बहुसंख्य (जवळजवळ सर्वच !) कारखान्यातून, ऑफिसेसमधून, सेवा उद्योगातून कर्मचाऱ्यांनी दुसऱ्या दिवशी न आले तरी चालेल असे १७ तारखेलाच सांगितले गेले होते. 'लोकसत्ता' वगैरेनी १९ तारखेचे अंक 'बंद' मुळे निघू शकणार नाहीत असे १७ तारखेलाच जाहीर करून टाकले होते. सारांश, १८ तारखेच्या बंदच्या यशाबद्दल कुणालाच शंका उरली नव्हती. प्रश्न एवढाच होता की बंद कसा पार पडतो !

तथापि प्रत्यक्ष १८ तारखेला, रेल्वे, पोस्ट, वृत्तपत्रे, बँका वगैरेही 'बंद' पाडले गेले तेव्हा मात्र लोकांना नक्कीच आश्चर्य वाटले

बंदचे ‘ न भूतो ’ स्वरूप आणखीही एका दृष्टीने लोकांच्या मनावर ठसले. पाल्यांचा गोळीबार आणि महालक्ष्मीला जाळलेले डबे हे दोन प्रकार वगळता, शिवसेनेचा असूनही बंद शांत होता.

ह्या बंदमुळे व इतर उग्र घडामोडींमुळे सीमा प्रश्नाला कुठले वळण लागते ते लवकरच स्पष्ट होईल. पण बंदमुळे इतरही अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. बंदमुळे राष्ट्रीय हानी होते ह्यात वाद नाही. त्या मुद्द्यांचे भांडवल करून अनेक रास्त मागण्यावरील संपांना, बंदना काँग्रेस शासन आजपर्यंत विरोध करीत आले आहे. खुद्द सीमा प्रश्नावरील बंदलादेखील आजवर काँग्रेसने, शासनाने विरोध केला आहे. आज मात्र काँग्रेसने उघड पाठिंबा दिला. शासनाने बंदविरोधी नेहमीचे उपाय योजले नाहीत. मग इतकी वर्षे काँग्रेस शासन सीमा प्रश्नावरील आंदोलनांना, बंदना विरोध का करीत आली ? का, ‘ बंद ’, ‘ घेराव ’, ‘ संप ’ आदिसारख्या आंदोलनाशिवाय प्रश्न सुटू शकत नाहीत असे आता काँग्रेसलाही




रेल्वे बंद, बसेस बंद, मुंबई बंद ! अर्थात सारे व्यवहारच बंद ! एरवी गजबजलेलं दादरचं खोदादाद सर्कल म्हणूनच एवढं शांत...

वाटू लागले आहे ? मग मोरॅटोरियमच्या निरर्थक गप्पा कशाला ? बंदमुळे होणाऱ्या राष्ट्रीय हानिचे फुकट ढोल कशाला ? की ह्या साऱ्या युतीच्या मुळाशी १३ जानेवारीला मध्य मुंबईतून होणारी लोकसभेची पोटनिवडणूक असावी ? एरवी बंदच्या दैदिप्यमान यशाचे, महागाई विरोधात केलेल्या आंदोलनाचे भांडवल करून मध्य मुंबईत काँग्रेसशी टक्कर घेऊन यशस्वी व्हायचा प्रयत्न शिवसेनेने का करू नये ? मराठी माणसाच्या प्रश्नावर मराठी (काँग्रेसचे ! ) खासदार दिल्लीत गप्प बसतात हा शिवसेनेचा लाडका आरोप आहे. मग आज मराठी माणसाचा आवाज उठवील असा खासदार मुंबईतून पाठवायची शक्यता निर्माण झाली असताना शिवसेनेने हे अवसान घातकी पाऊल का टाकावे ? बंदला मिळालेल्या पाठिंब्याच्या बदल्यात ही बिदागी शिवसेनेने काँग्रेसला देऊन टाकली असेच मग मानायचे का ? हे जर का खरे असेल आणि ही युती जर का पुढेही अशीच चालणार असेल तर मुंबईच्या राजकारणाचा चेहरामोहराच पार बदलून जाईल एवढं मात्र खरं !!

वर्दळीचे सारे रस्तेही शांत शांत ! मग डांबरी धावरस्त्यावरचे क्रिकेटचे सामने दिवसभर जागोजाग रंगले.








# रिंगणातले उमेदवार...

लढाऊ बाण्याचे
**अॅड. रामराव आदिक**
जनतेची गाऱ्हाणी कॉंग्रेसच
दूर करू शकेल.



जनसंघाचे जेष्ठ-श्रेष्ठ आमदार
**डॉ. वसंतकुमार पंडित**
त्रस्त जनता भ्रष्ट कॉंग्रेसला
नष्ट करणारच !



स्वा. सावरकरांचे पुतणे
हिंदुसभेचे तरुण प्रांताध्यक्ष
**विक्रम सावरकर**
विशुद्ध हिंदुत्वाचा पुरस्कार
आणि सर्वांगीण प्रगती करणारा
आर्थिक दृष्टिकोन...



डांगे कन्या, कामगार महिला नेत्या
**कॉ. श्रीमती रोझा देशपांडे**
खास मुंबईत कॉंग्रेस पुढारीपण
हे भांडवलधार्जिणंच आहे म्हणून...

## १३ जानेवारी पोटनिवडणूक मध्य मुंबईतली

१९७१ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकात मध्य मुंबई (उत्तर) ह्या लोकसभा मतदार संघातून कांग्रेसचे श्री. रा. धो. भंडारे (पूर्वाश्रमीचे रिपब्लिकन) शिवसेनेचे प्रि. मनोहर जोशी ह्यांचा लाखाच्या वर मतांनी पराभव करून निवडून आले होते. अलिकडेच त्यांना राज्यपाल पद मिळालं व त्यांची जागा रिकामी झाली आहे. ही पोटनिवडणूक १३ जानेवारी, १९७४ ला होणार असून ह्या मतदार सघात प्रचारांनी वातावरण निर्मितीला नुकतीच सुरूवात झाली आहे. साडेसहा लाख मतदारांच्या ह्या मतदारसंघातून कॉंग्रेस, जनसंघ, कम्युनिस्ट हिंदुमहासभा व दोन अपक्ष असे सहा ही पोटनिवडणूक लढवित आहेत. परंतु मुख्य लढत कॉंग्रेसचे अॅड. रामराव आदिक, जनसंघाचे आ. वसंतकुमार पंडित व कम्युनिस्ट कॉ. श्रीमती रोझा देशपांडे ह्यांच्यातच राहील असे दिसते. हिंदुमहासभेचे श्री. विक्रम सावरकर ह्यांचाही धडाका प्रचार सुरू आहे. दलित समाजाचे प्रतिनिधी म्हणवून घेऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ह्या एकेकाळच्या मतदार संघातून श्री. दोडके अपक्ष म्हणून निवडणूक लढवित आहेत.

शिवसेनेनी ह्या लढतीत भाग घेतला नाही ह्याचं अनेकांना आश्चर्य वाटत आहे. इंदिरा लाटेच्या काळातही (१९७१ साली) प्रि. मनोहर जोशींना लाखाच्या वर, दुसऱ्या क्रमांकाची मतं मिळाली होती हे लक्षात घेता, प्रत्यक्ष निवडणूकीच्या रिंगणात न उतरताही शिवसेना ह्या निवडणूकीला मोठी कलाटणी देऊ शकेल असे वाटते.




## ...मग हे कोण ?

### २४ डिसेंबर पासून मुंबईत सुरू झालेला बाल नाटचमहोत्सव



सौ. वंदना विटणकर
किशोर कला केंद्राच्या लेखिका





नवल रंगभूमीचे ↓
नरेंद्र बल्लाळ

रत्नाकर मतकरी ↑
बालनाटच संस्थेचे
सूत्रधार, लेखक, दिग्दर्शक



कुमार शाहू
किशोर कला केंद्र





अलबत्या गलबत्यामधली चेटकी.
हा आहे दिलीप प्रभावळकर

याच नाटकात
राणी (प्रतिभा मतकरी)
राजकन्या (मीनल जोशी
राजा (मधुकर नाईक)

पूर्वी बालनाट्य संस्थेने सादर केलेले
इंद्राचे आसन–नारदाची शेंडी
यंदा महोत्सवात रंगरेखाने सादर केले.

मंगळावर स्वारी मध्ये
अशोक पावसकर
मिलींद बल्लाळ, इला पातकर

# बालनाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने ....

रत्नाकर मतकरी

मराठी रंगभूमीवर किती प्रकारची नाटके होतात ?

एक म्हणजे व्यावसायिक सातत्याने नाटके सादर करण्याचा व्यवसाय करणाऱ्या तीन-चारच संस्था.

त्यानंतर हौशी मंडळी. तिच्यात नाना दिशा. सर्वांची समस्या एक. त्यांना पुरेसा प्रेक्षकवर्ग मिळत नाही. कारण प्रेक्षकवर्ग व्यावसायिक नाटकांचा चाहता.

तरीही न खचता मंडळी स्वतःचा प्रेक्षकवर्ग तयार करण्याचे जिकीरीचे काम करीत राहतात. पैशांचे बिलकुल पाठबळ नसताना. केवळ रंगभूमीवरील श्रद्धेच्या जोरावर. त्यातही काही नवीन प्रयोग : रंगमंचाशिवाय नाटक करणे, प्रेक्षकांशी जवळीक साधणे. परंपरा मोडून नवीन तंत्र शोधणे इ.—रंगभूमी जिवंत असल्याच्या या खुणा.

नाटकांचा तिसरा प्रकार : मुलांसाठी नाटके. हा सुरू केला मुंबई मराठी साहित्य संघाने. पहिले नाटक माझेच, 'मधुमंजिरी.' सादरकर्ती : सुधा करमरकर. मुलांचे नाटक म्हणून त्यात काही कमी पडू न देता केलेले : (नटवर्गाची नावे वाचाल तर थक्क होऊन जाल. डॉ. काशिनाथ घाणेकर, भावना, राजा पटवर्धन, स्वतः सुधा करमरकर वगैरे.)

हे नाटक खऱ्या अर्थाने पहिले 'बालनाट्य' असे आम्ही म्हटले तेव्हा विरोधक (हे प्रत्येक गोष्टीला असतातच) म्हणाले, 'छे छे, पूर्वी शिरगोपीकरांची आनंद संगीत मंडळी मुलांसाठी 'गोकुळचा चोर' करायची ते पहिले बालनाट्य. आता शिरगोपीकरांनीच जेव्हा चंद्रलेखाबरोबर हातमिळवणी करून 'गोकुळचा चोर' प्रौढांसाठी काढले तेव्हा त्या ऐतिहासिक विधानातली हवाच गेली.

हे आपले गंमत म्हणून सांगितले—पहिले बालनाट्य कुठले हे महत्त्वाचे नाही. महत्त्वाचे हे की 'मधुमंजिरी'पासून 'बालरंगभूमी' नावाचा प्रकार आपल्याकडे रुजू लागला. (५८ च्या सुमारास—साधारण पंधरा वर्षांपूर्वी) हा प्रकार काय, तर मुलांसाठी म्हणजे त्यांना प्रिय अशा विषयांवरची नाटके, ती रमून जातील अशा पद्धतीने सादर करायची. म्हणजे त्यात त्यांच्या बुद्धीला, नेत्रांना, कानांना चालना मिळेल आणि हे सारे होताना त्यांचे उत्तम मनोरंजनही होईल अशा पद्धतीने. मुख्य म्हणजे 'मुलांना काहीही चालते' अशी भूमिका न ठेवता नाट्यप्रयोग अधिकाधिक उत्कृष्ट व्हावा यासाठी झटणे. इथेच गॅदरिंगचे नाटक आणि कंपनीचे नाटक यात फरक पडतो !

आता मुलांचे नाटक आणि ते उत्कृष्टपणे करायचे म्हणजे पंचाइत ! पोशाख, नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना हे सारे अव्वल दर्जाचे ठेवायचे म्हणजे कोण यातायात ! अहो, हे सगळे प्रौढांच्या सामाजिक नाटकापेक्षाही कठीण ! उघडच आहे—'सामाजिक' नायक-नायिका रोजच्या कपड्यात येऊ शकतात—राजेरजवाड्यांना भरजरी पोशाख लागतात. त्यातून 'रायगड'मधला संभाजी, 'संभाजी' वाटला पाहिजे आणि मुलांच्या नाटकात तो फाटका चालेल असे थोडेच आहे ? कपडेवाले मोठ्यांच्या नाटकासाठी जर वेगळी लावतात, आणि मुलांच्या नाटकासाठी वेगळी लावतात असे होते का ? मोठ्यांच्या नाटकात जंगलाचे नेपथ्य कठीण आणि मुलांच्या नाटकात ते सोपे असे आहे का ? मोठ्यांच्या नाटकात काय किंवा मुलांच्या नाटकात काय, तोंड उजळायचे तर 'लाइट्स' सारखेच हवेत. (उलट 'चमत्कार' वगैरे दाखवायचे असल्यामुळे मुलांच्या नाटकात ते अधिकच हवेत !) तात्पर्य, चांगली निर्मितीमूल्ये असलेले मुलांचे नाटक हे प्रौढांच्या भपकेबाज ऐतिहासिक वा पौराणिक नाटकाइतकेच, आणि सामाजिक नाटकांहून अधिक खर्चाचे पडते.

शिवाय मुलांच्या नाटकासाठी थिएटर्सची भाडी तीच, कधीकधी भाडी भरूनही तारीख मिळताना मारामार ! निर्माता संघ म्हणतो की मुलांच्या नाटकाचे निर्माते हे निर्माते नव्हेत ! (तेवढ्याच तारखा वाचल्या !) वर्तमानपत्रात जाहिरात द्यायची म्हणजे कठीण ! कारण सगळ्या प्रौढ नाटकांच्या जाहिरातीत हल्ली मोठमोठी व्यंगचित्रे ! बालनाट्याची जाहिरात वाचकाच्या डोळ्यात भरायची म्हणजे ती तेवढीच मोठी हवी ! आता जाहिरातीचे दर—मुलांच्या नाटकासाठी वेगळे आणि मोठ्यांसाठी वेगळे असे असतात का ?

वेगळे दर असतात ते दर फक्त तिकिटांचे. मुलांच्या नाटकांना तीन रुपयांचे तिकीटही फार वाटते. पालक तक्रार करतात. त्यांच्या मते मुलांच्या नाटकासाठी तिकिटाचा दर एक रुपया असावा—आठ आणे असला तर बरेच !

आठ आणे दरातसुद्धा शाळाशाळांतून आमच्या 'बालनाट्य' संस्थेने प्रयोग केलेले आहेत. पण असे प्रयोग कधी यशस्वी होतात? शिक्षक व शाळाचालक यांचे, निदान शाळेचा हॉल (जो काय असेल तो) वापरायला देणं, तिकीटविक्रीसाठी जागा देणे इतपत सहकार्य असेल तर ! पण शाळांपुढे भलतीच (म्हणजे पुष्कळ या अर्थी) कामे असतात ! त्यातून शाळेला मदत म्हणून ते प्रौढांची नाटके लावून विद्यार्थ्यांना तिकिटे घ्यायला लावतातच. मग आणखी बालरंगभूमीची त्यांनी का जोपासना करावी ? आणि त्यात त्यांचा फायदा तो काय ? फायद्याशिवाय काहीही काम करणे मूर्खपणाचेच नाही का ? निदान आजच्या काळात ?

परंतु बालप्रेक्षकांच्या सुदैवाने हाताच्या बोटावरच मोजण्याइतके का होईना, पण काही मूर्ख लोक आज बालरंगभूमीसाठी धडपड करताहेत. 'बालनाट्य' संस्था चाल-

पृष्ठ ४० वर

: १ :

प्रचंड धुक्याचे लोळ काळ्याकुट्ट पहाडांना चिकटून राहिले होते. भेसूर, तीक्ष्ण, कावेबाज किंवा मर्मभेदक दृष्टीचा पल्लादेखील त्या धुक्याला फाडून पलीकडे जाऊ शकत नव्हता. भयाण उंच आणि चित्रविचित्र कांटेरी झुडुपांनी बरबटलेल्या त्या धिलांग पहाडाच्या पलीकडे काय असेल, काय नसेल याविषयीचं कुतूहल निर्माण होण्याचं कारणच नव्हतं. कारण हजारो फूट उंच चढलेली ती डोंगरांची रांग कुठल्याही शूर, पाताळयंत्री, उपद्व्यापी प्राण्याला आपल्या आसपास शंभर दीडशे फुटावर देखील फिरकू देत नव्हती !

त्या पहाडाचं स्वरूप जणू अधिकच भयाण करण्याकरिता पायथ्यापासून पलीकडे कितीतरी दूरपर्यंत उंचच उंच झाडांची थप्पी लागून राहिलेली होती. एकएका झाडांची उंचीच दोन-दोनशे फुटावर होती. त्याचा विस्तार आणि सबंध घेर एखाद्या डोंगराएवढा सहज होता. त्यात केळीच्या पानाप्रमाणे एकच एक काळं हिरवं पान असलेली काही झाडं पन्नास पन्नास फूट वर उंच गेलेली होती. तर काही झाडांची काळीभोर खोडंच केवळ शंभर फूट उंच वाढलेली होती. तिथे जर एखाद्या श्वापदाने आवाज केला तर त्याचा प्रतिध्वनि एवढा कर्कश उमटत होता की, त्यामुळे ते उभं जंगल दणाणून उठत होतं. सारीच जनावरं त्यामुळं मग मोठमोठ्याने केकाटायला सुरुवात करीत होती.

–आणि त्या सर्वांचा आवाज पुन्हा अनेक पटींनी मोठा होऊन त्या साऱ्या रांगड्या आसमंतात घुमू लागत होता. मग किती तरी वेळ तिथल्या शूर आणि भेकड प्राण्यांच्या जिवाची त्रेधा तिरपीट उडून जात होती. कुणीतरी पुढे येणाऱ्या संकटाच्या भीतीनं गर्भगळित भोऊन जीव घेऊन पळत सुटत. पळतांना काही अजस्र जनावरं आपल्या देहानं एखादं उभं झाड सहजपणे उन्मळून फेकून देत. माकडं, जिराफ, हत्ती, आणि इतर पक्षी देखील आपल्या चित्रविचित्र आवाजाने ते सारं वातावरण दणाणून सोडीत. मग तास तास तिथल्या साऱ्या वातावरणात डरकाळ्या आणि चीत्कार यांच्याशिवाय इतर काहीच उरत नसे. शेवटी ओरडून ओरडून तोंडाला फेस आला आणि ओरडण्याची शक्तीच शरीरातून कमी होत गेली, की हळू हळू ते ओरडणं बंद पडे. बंद पडता पडता काही वेळात मग तिथे एवढी शांतता पसरे की त्या शांततेतूनही एक प्रकारचं अत्यंत भयाण वातावरण निर्माण होई. परंतु त्या गूढ, विषण्ण, भयाणतेची शक्ती मात्र एवढी अचाट असे, की तिच्या दाढेखाली तिथं वळवळणारं विश्व हा हा म्हणता रगडलं जाई. शांत होऊन निपचिप पडे.

......आवाज होत राही तो केवळ खळखळणाऱ्या पाण्याचा, फेसाळून खाली दरीत उडी घेणाऱ्या धबधब्याचा. दरीतून वळणावळणाने खाली वाहात जाणाऱ्या त्या नदीच्या काठाकाठाने हिरवीगार झाडी दाटली होती. जणू वाहात जाणाऱ्या त्या नदीला शेवटपर्यंत सोबत करण्याचा तिनं बेत ठरविलेला आहे ! मैला मैलाच्या अंतरानं त्या नदीचं पात्र रुंदावत गेलेलं होतं. आणि पुढे पुढे तर ती अगदी मोकळ्या मैदानातून खळाळा वाहात गेली होती. नदीच्या त्या आसमंतातच वरच्या बाजूला त्या भल्या मोठ्या वडाच्या झाडाजवळ काही झोपड्या उभ्या राहिलेल्या होत्या. काळ्याकुट्ट उंच



लाकडांची मेडं आणि वाळलेल्या निबर गवताची कुडं उपयोगात आणून काही माणसांनी तिथं निवाऱ्याची सोय निर्माण केली होती. पोट भरण्यासाठी आणि जीव जगविण्यासाठी तिथं त्यांची पराकाष्ठा चाललेली होती. वस्तीतील सारी रानटी माणसं तिथं मोठ्या एकोप्यानं वागत होती. एकमेकांच्या जिवाला जीव देत होती. तरीही त्यांनी स्वतःच्याच अनुभवातून निर्माण केलेल्या कडव्या शिस्तीचं देखील पालन करीत होती ! ◻

: २ :

तीभर दुपारची वेळ होती. काळ्या रांकट दगडावर सांडलेलं रानटी माद्यांचं दूध वाळून जागच्या जागींच बसलं होतं. काळ्या खडकांच्या कपारीतून दाटीवाटीनं उगवलेलं पिवळं गवत वाळत चाललं होतं. आणि भोवतालचे आभाळाला भिडलेले पहाड उन्हाचा ताप सहन करीत स्वस्थ पसरले होते. चोहोकडून, तापलेल्या उन्हाच्या झळा गव्हाळ्या नागिणीप्रमाणे सळसळत होत्या. तापलेला वारा तिथल्या तिथेच घुटमळत होता. डोंगरांच्या कपारीतून, काटेरी झुडुपांच्या जाळ्यांतून तेवढ्याच सावलीच्या आडोशाला बसलेली श्वापदं, लाल गाळणारी लालभडक जीभ तोंडाबाहेर काढून ल्हाऽल्हाऽ करीत होती, मोठमोठ्यांनी धापा टाकीत होती. त्या साऱ्या तापलेल्या परिसरापुढे त्यांचं या वेळी तरी काहीच चालत नव्हतं. चोहोकडून

या कादंबरीचे प्रथम प्रकाशन १९६२ मधले. सध्या दुर्मिळ. दुसरी आवृत्ती निघू पाहत होती, इतक्यात कागद टंचाईची व कागदाच्या भयंकर भाववाढीची झळ सर्व प्रकाशन व्यवसायाला जाणवू लागली. आज परिस्थिती अशी आहे, की मराठीतील ललित व तत्सम इतर साहित्याचे प्रकाशनकार्य जवळजवळ थांबलेले–थंडावलेले आहे. नवी पुस्तके, जुन्या पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या काढण्यास आज चांगले, सुस्थिर असलेले प्रकाशकसुद्धा धजावत नाहीत. चिल्लर, लहानसहान संस्थांची तर बातच सोडा.

किती दिवस ही परिस्थिती टिकून राहणार ?

दीर्घकाळ.

म्हणून या चित्रवार्तेला पुस्तकविभागाची जोड प्रथमपासून दिली. हेतू हा की जी पुस्तके दुर्मिळ व एरवी मराठी वाचकांसमोर नजिकच्या काळात येऊ शकणार नाहीत ती या पुरवणीच्या माध्यमातून, कमी किंमतीत वाचकांना उपलब्ध व्हावीत.

ज्यांनी ही कल्पना प्रथमपासून उचलून धरली, तिला मनःपूर्वक साहाय्य केले अशा लेखक मित्रांपैकी एक श्री. वि. शं. पारगावकर–– या कादंबरीचे लेखक.

इतरही नामवंत लेखक आता या कल्पनेचे स्वागत करू लागतील अशी आशा आहे. कारण काळ तर मोठा कठिण आलेला आहे–– सर्वांनाच. कादंबरीचा जराही संक्षेप केलेला नाही. पुढील अंकी ती पूर्ण होईल.

–संपादक

रखरख, तळपत्या सूर्याचा ताप, आणि चटकत्या वाऱ्याचे गरम चपके सारखे चोहोकडून डागण्या देत होते. जाळीत होते !

–आणि त्या वस्तीतील उघडीनागडी, काळाकुट्ट कातडीची लहान लहान पोरं घामेजून मरगळून पडली होती. काही माणसं दोन पायावर बसून, बसल्या बसल्याच घटका घटका बाहेरच्या उन्हाकडे पहात होती. त्यांच्या उघडच्या वाघडया रांकट नजरेतून काही सुद्धा टिपकत नव्हतं. त्यांना नेमका कशाचाच काही बोध होत नव्हता. तरीही ती माणसं त्या धगधगत्या विश्वाकडे फक्त पाहात होती !

त्यातल्याच एका झोपडीत पिरंगुळा पडला होता. उघडा वाघडा आणि अस्ताव्यस्त ! पांढऱ्या केसांच्या जाळ्यात अडकून पडलेला त्याचा काळा ठिक्कर चेहरा हळू हळू निस्तेज होत चालला होता. त्याच्या कपाळावर, केसांच्या खाली, आणि चेहऱ्याच्या दर्शनी भागावर असंख्य झुळ्यांचं जाळं पसरलं होतं. मधूनच धापा टाकण्याकरिता वासलेल्या तोंडातून चार दोन पिवळे धमक दात उघडे पडत होते. पुनः काळाकुट्ट ओठाआड लगेच झाकले जात होते. त्याच्या डोळ्यावरच्या पांढऱ्या भिवया खूप वाढल्या होत्या. आणि लांब लांब पांढऱ्या पापण्यातून दिसणारी डोळ्यांची बुबुळं हळू हळू निवत चालली होती. मध्येच कुठून तरी अत्यंत वेदना देणारी कळ उठली की, तो पायाच्या टांचा जमिनीवर घाशीत होता. मग लगेच एका अंगावर होण्याकरिता खूप धडपड करीत होता. परंतु आता त्याला त्याच्याच येवढ्या मोठ्या धिप्पाड शरीराचं ओझं पेलता येत नव्हतं ! आठ दिवस सारखा एकाच अंगावर पडून राहिल्यामुळे त्याचं डोकं मान, पाठ कंबर साऱ्यांनाच कळा लागल्या होत्या. आणि आतून पोटात, छातीत, मांड्यातूनही विलक्षण कळा निघत होत्या, त्या वेदना असह्य होत होत्या. डोळ्यांना एवढी बधिरता आली होती की, स्वतःचा स्वतःला देखील विसर पडत चालला होता.

असह्य वेदना झाल्या की, टांचा झाडण्यापुरती शक्ती तो बळेच निर्माण करीत होता. आणि त्याच वेळी एकदम कुठूनतरी आलेल्या शक्तीच्या मदतीने लगेच एका अंगावर होण्याकरिता धडपड करीत होता.

त्याची बोंब ऐकली की जवळपासची काही माणसं त्याच्याजवळ येत होती. ती सारी म्हातारीच होती. आता कामधंदा होत नसल्यामुळे ती सारी झोपड्यांची राखण करीत बसलेली होती. पिरंगुळाच्या जिवाची लाही त्यांना पहावत नव्हती. त्यांपैकी मग कुणी त्याच्या अगदी जवळ येत होती. कोरलेल्या भोपळ्यात सांठविलेलं मोचळ पाणी त्याच्या तोंडात घालीत होती. त्याच्याकडे भेदरलेल्या नजरेनं पहात होती. मग माशांचे तुकडे बळेच त्याच्या तोंडात ढकलीत होती. परंतु पिरंगुळाला ते पाणी घोटता येत नव्हतं. आणि तुकडेही गिळता येत नव्हते. तोंडातून खाली घरंगळलेले माशांचे तुकड जमिनीवर पडले होते. आणि काळ्या मुंग्यांची एक भली लांबलचक रांग त्या तुकड्याभोवती पिंगा घालीत होती. त्या तुकड्यांना वारुळात वाहून नेण्याकरता त्या मुंग्या झटत होत्या.

पिरंगुळाच्या आवतीभोवती हळूहळू मुंग्यांचं जाळं विणलं जात होतं. त्याच्या जवळ बसलेला त्याच्याच वयाचा केडा हे सारं दृश्य अत्यंत शांतपणे पाहात होता. परंतु जेव्हा पिरंगुळाच्या कांखेपर्यंत काळ्या मुंग्यांचा मोर्चा जाऊन भिडला तेव्हा मात्र केडाचं सारं शरीर गदगदलं. एकाएकी तो वृद्ध बेभान झाला. आणि कपाळावर हात बड-

वून घेऊन मोठमोठ्याने रडू लागला. पिरंगुळाच्या छातीवर डोकं आपटून घेऊ लागला. त्याचा आकांत पाहिल्याबरोबर सारी वस्ती घाबरून गेली. आसपास बसलेली लहान मुलंहि जागच्या जागीच रडू लागली ! पिरंगुळाची बायको रिशा एकदम मागून समोर आली. आणि तिथंच दुःखाने गडबडा लोळू लागली.

भर दुपारच्या तप्त वातावरणात ती छात्या बडवून होणारी रडारड ऐकून वस्तीच्या मागच्या बाजूच्या भल्या मोठ्या वडाच्या झाडावर निवाऱ्याला विसावलेली पाखरं भराभर उडू लागली आणि तळपत्या उन्हात आकाशात घिरट्या घालू लागली !

पिरंगुळाला मात्र कशाचीच शुद्ध नव्हती, आता तर त्याचं बोंब मारणं देखील कमी झालं होतं. डोक्यावरचे वाढलेले केस जमिनीवर अस्ताव्यस्त पसरले होते. अवजड झालेलं शरीर आता मुळीच हालचाल करीत नव्हतं. फक्त त्याचा श्वास मात्र मोठमोठ्याने चालला होता. नरड्यावाटे बाहेर पडणाऱ्या त्या 'घरघर' आवाजाला खंड पडत नव्हता.

पिरंगुळाच्या झोपडीत दाटीवाटीनं जमलेली माणसं अगदी हैराण झालेली होती. त्याचा त्राता त्यांच्यातून निघून चालला आहे याची आता त्यांना स्पष्ट जाणीव झालेली होती. त्याला थांबविणं आता कोणाच्याही हातात नव्हतं. वस्तीवरचे नवजवान लोक सकाळीच शिकारीला बाहेर गेले होते. पिरंगुळाचा मुलगा निगूडाही त्यात होता.

आता फक्त निगूडाच्या परतण्यावर साऱ्यांचं लक्ष लागून राहिलेलं होतं. दिवस हळू हळू खाली जात होता. उन्हाचा दाह कणाकणांनी निवत चालला होता. आणि ती माणसं पिरंगुळाच्या भोवती जीव टांगून बसली होती.

शेवटी दिवस मावळला. तरी पिरंगुळाचा श्वास चालूच होता. शिकार करून लोक परतले. निगूडाला येताना पाहिल्याबरोबर पाच चार लोकांनी त्याच्या गळ्याला मिठी घातली. आणि ते धाय मोकलून मोठमोठ्यांनी रडू लागले.

त्या दिवशी खाणंपिणंही कुणाला सुचलं नाही. रात्रभर पिरंगुळाभोवती सारी वस्ती जागीच होती. बरीच रात्र उलटल्यावर दमलेल्या गड्यांना झोपा लागल्या. दिवसभर पिरंगुळाच्या भोवती बसून शिणलेली म्हातारी मंडळीही झोपून गेली. त्याच वेळी पिरंगुळा एकदम थंड पडला ! त्याची सारी हालचाल एकदम थांबली. आणि त्या वस्तीच्या एका पिढीचा कणा मोडून पडला. त्यांच्यातली फार मोठी शक्ती हरपली. संरक्षणाचं चिलखतच नाहीसं झालं.

पिरंगुळाची शेवटची हालचाल करुण होती का केविलवाणी होती हेच सांगता येत नव्हतं. चहूकडे मिट्ट काळोख दाटलेला होता. वातावरण शांत होतं. मात्र जंगलात दूर कुठे तरी रातकिड्यांचा आवाज येत होता. मध्येच थांबत होता आणि पुन्हा केव्हा तरी एकदम सुरू होत होता. त्याचा घायटा वाढत होता. तेवढाच काय तो आवाज आणि मधली शांतता—पिरंगुळाने आपला शेवटचा श्वास एकदा जिवाच्या कराराने छातीत ओढून घेतला; आणि हळूहळू कायमचा सोडला ! शेवटच्या वेदनेचा हुंकार त्याच्या तोंडातून अती क्षीणपणे बाहेर पडला. आणि आत शरीरात दाटून राहिलेल्या वेदनेचा मोठा लोट त्याच्या झुळ्या पडलेल्या चेहऱ्यावर पसरला. त्यामुळे त्याच्या डोळ्यांतील बुबुळांना मोठाच धक्का बसला. एकदा त्याचे डोळे गरागरा फिरले; आणि न मिटले जाताच चैतन्यहीन झाले !

सारे शरीरच चैतन्यहीन झाले. आणि मग उरलेली रात्रभर ते अगदी निश्चेष्ट पडून राहिले.

सकाळी दिवस बराच वर आल्यावर पिरंगुळाचा देह वस्तीवरून हलविण्यात आला. वस्तीपासून थोड्याच अंतरावर नदीच्या काठी एक मोठा खड्डा खणण्यात आला. त्यात एका लांबलचक दगडाची शीळ टाकली. त्या शिळेवर मग हळूच पिरंगुळाचा देह ठेवण्यात आला. त्याच्या भोवताली त्याची हत्यार, बाण, दगडी कोयते, पाणी पिण्याचा घोटीव दगड आणि वाळवून ठेवलेले मासे, रानफळं त्याच्या आसपास ठेवले गेले. हे सारं व्हायला दुपार झाली.

मग निगूडानं त्या खड्ड्यात माती लोटली. आणि साऱ्यांनी मिळून तो खड्डा भरून काढला.

दिवस कलल्यानंतर पिरंगुळाला तिथेच सोडून मग ती सारी माणसं अत्यंत दुखऱ्या दुबळ्या मनाने वस्तीवर परतली.

पिरंगुळा त्या वस्तीचा नेता होता. त्याने त्या वस्तीला खूप नावारूपाला आणले होते. पन्नाससाठ वर्षांच्या काळात या वस्तीला जे सुसंगत रूप आले होते ते सारे पिरंगुळाच्या नेतृत्वाचे फळ होते. कुठे तरी वणवण भटकत फिरणारी ती बाया माणसांची टोळी पूर्वी मिळेल तिथे शिकार मारून खात होती; कधी मोठमोठाल्या वृक्षांच्या ढोलीत, तर कधी डोंगरकपारीत रात्र कंठून विश्रांती घेत होती. परंतु बुद्धीचा बराच विकास झालेल्या पिरंगुळाने नेतृत्व आपल्या हाती घेतले. आणि प्रथमचे रानोमाळ भटकून सैरावैरा आयुष्य कंठण्याचे निराश्रित जीवन त्याने वळविले. चांगल्या मजबूत झोपड्या तयार केल्या. धट्टाकट्टया तरुण लोकांच्या उपयोग कसा करून घ्यावा, अधु माणसाला बसल्या बसल्या काय काम द्यावे, मुले झालेल्या बायकांचे संरक्षण कुणाकडे सोपवावे; आणि एखाद्या दिवशी अथवा पावसाळ्यात ताजी शिकार न मिळाली तर अन्नाची सोय कशी करावी याच्यासंबंधी त्याने खोल विचार केला. आणि त्याप्रमाणे आपल्या आश्रयाला असलेल्या माणसांना शिकवून त्याने दक्ष केले.

त्यामुळे बरेच भय कमी झाले. माणसे एकोप्याने राहू लागली. एकमेकाला एकमेकांच्या मदतीची गरज भासू लागली आणि माणसाला माणसाची किंमतही कळू लागली.

त्याचा मुलगा निगूडा तर बापाच्या हाताखाली शिकून अगदी तज्ज्ञ बनला. फक्त तो बापापेक्षा स्वभावाने अती तापट होता एवढेच ! ◻

## : ३ :

पिरंगुळा वारल्यानंतर त्याची रिकामी झालेली जागा भरून काढण्याकरिता त्या वस्तीतला तरुण नेता निगूडा वर उठला. काळीभोर सणसणीत छाती. वाघासारखा रुंद जबडा, बिबटासारखे सदा खुनशी दिसणारे डोळे आणि अस्वलाप्रमाणे डोक्यावर आणि छातीवर केसांचं जाळं. तो तरुण त्या जमावात उठून उभा राहिला तेव्हा त्याच्या बरोबरीला उभा राहण्याचं एकाचंही धाडस झालं नाही ! फक्त निगूडाच्याच वयाचा नि दमाचा परंतु जरा बारीक हाडांचा 'उदगा' 'उभा राहू का नको—राहू का नको !' असा काही काही वेळ विचार

करीत राहिला. एका क्षणाला तर त्यांच्यातला वरचढ करणारा शिकारी पुरुष त्याला आवरलाच नाही. आणि झटकन् तो गुडघ्यापर्यंत वर उठला—पण मग लगेच समोर उभ्या असलेल्या धिप्पाड पुरुषाच्या भेसूर डोळ्यांकडे आणि छातीच्या कोटाकडे पाहून गपकन खाली बसला !

त्यानंतर दिवसभर तो सारा माळ आनंदात बेहोश होऊन नाचला. तरुण स्त्रियांनी रंगीबेरंगी फुला-पानांच्या माळा गुंफल्या. निरनिराळ्या झाडांच्या पानांचा सुंदर पोशाख तयार केला. मोठमोठाल्या पक्ष्यांची पिसं जमवून तयार केलेला उंच टोप निगूडाच्या मस्तकावर ठेवण्यात आला. मग सामुदायिक शिकार झाली. खाणंपिणं झालं. निशा घेतली गेली. आणि चारपाच तास स्त्री-पुरुषांचा नाच झाला.

त्या एवढ्याशा जगात हे सारं वर उतू जाईपर्यंत झालं. मग स्त्री-पुरुषांनी एकमेकांना मिठ्या मारल्या. खोड्या निघाल्या. मारहाण झाली. शेवटी दिवस मावळताच झोपायची ती सारी माणसं झोपून गेली. जागून पहारा करणारी रानमांजराच्या डोळ्याप्रमाणे जागरूक राहिली !

त्या दिवशी निगूडा झोपडीत झोपला नाही. विस्तीर्ण जाळीदार वडाच्या खोडाला टेकून तो पडला होता. त्याचा तो ऐश्वर्याचा टोप जवळच पडला होता. झाडाच्या पानांचं वस्त्रं त्याच्या टटटटणाऱ्या मांड्यांभोवती आणि कमरेभोवती घट्ट बसलं होतं. पानांचं हिरवट ताजेपणा हवेबरोबर गंध उधळीत होता. आणि माळेत गुंफलेल्या जंगली फुलांचा घमघमाटही चहूकडे दरवळत होता.

पण त्या नुकत्याच पार पडलेल्या उत्सवात निगूडला समाधान वाटलेलं नव्हतं. आता तर त्याच्या कपाळाच्या शिरा ताडताड उडत होत्या. आणि त्याच्या हृदयात पेटलेली आग गुंजेच्या बियांप्रमाणे त्याच्या डोळ्यात चमकत होती.

अगणित दिवस उगवले होते आणि मावळून गेले होते. परंतु पूरिया काही अजून त्याच्या हाती लागली नव्हती ! पूरियाचं चालणं पाहणं, हसणं आणि बोलणं या साऱ्यापेक्षाही तिची अंगकाठीच त्याच्या मनात जाम बसली होती. निबर झाडीतल्या मादक फुलांचा गंध एकदम नाकात घुसावा तशी पूरिया त्याच्या हृदयात घुसली होती. तिला प्रथम पाहिल्याबरोबर काही वेळ तो अक्षरशः वेडाच झाला होता. तिच्या करिता एकदा तर त्याने अंधळेपणाने जीव धोक्यात घातला होता. माणसाच्या रक्ताला चटावलेल्या बिबटासारखा तो तीनचार दिवस 'वडीगा'च्या वस्तीजवळ लपत छपत हिंडला होता. त्या वेळी उदगाही त्याच्या मदतीला होता.

अखेर पाचव्यांदा दिवस मावळला. त्या रात्री त्या दोघांनी वडीगाच्या वस्तीवरून पूरियाला मोठ्या शिताफीनं पळविली. दिवस उगवायच्या आत कित्येक मैल काट्याबोराट्यातून चालत, अनेक श्वापदांना हुलकावण्या देत ते आपली वस्ती जवळ करीत होते. शेवटी तिला त्यांनी आपल्या वस्तीवर आणली तेव्हा ती बेशुद्धच होती.

तिला त्यांनी जेव्हा झोपडीच्या पुढे मोकळ्या पटांगणात निजविली तेव्हा वस्तीवरच्या साऱ्या स्त्रिया भराभरा तिथं जमल्या. डोळे वासून पूरियाकडे टकटका बघतच राहिल्या. त्या वस्तीतली एकही पूरियाच्या तोलामोलाची नव्हती. त्यातल्या त्यात 'निमूवा' जरा बरी होती. पण हाडोमाशी बारीक होती. आणि तिच्या डोळ्यात नागावरच्या कवडीप्रमाणे चमकच नव्हती ! आतापर्यंत होत्या नव्हत्या साऱ्या बरेपणाला घेऊन निमूवा गिगूडाबरोबर नाचली होती. त्याच्यापासून एकदा तर ती पोटी भारावली होती. आणि एका सामान्य चित्त्याला बघून गर्भगळीत झाली होती ! गर्भपात झाल्यानंतर निगूडच्या ती कायमची डोळ्यातून उतरली होती.

आपल्या पुरुषत्वाला संभाळण्याच्या योग्यतेची ही नाही अशीच काहीशी अस्पष्ट भावना निमूवाविषयी निगूडाच्या मनात तेव्हा निर्माण झाली असावी ! गर्भपात करून तिने आपला जणू अपमानच केला आहे असंच त्याला तिच्याविषयी सारखं वाटत राहिलेलं असावं ! कारण त्या प्रसंगानंतर तो निमूवाच्या अंगी कधीत्र हुंदडला नाही. ती मात्र त्यानंतर त्याच्याकडे अनेक वेळा लघळली होती. परंतु तो त्यामुळे हलला नव्हता. पुढे पुढे तर हट्टाला पेटून रात्र रात्र ती त्याच्या छातीवर पडून राहिली होती. परंतु त्याने गाढ झोप घेतलेली होती !

त्या वस्तीतल्या बाकीच्या साऱ्या पोरी तर अगदीच सुमार होत्या. कोणी मांजरीच्या पिलांसारख्या होत्या, तर कोणी गायीच्या कालवडीसारख्या होत्या. दुबळ्या—मलूल !

निगूडा वाघाच्या दमाचा माणूस होता. हाताच्या एका चपराकीत फळाफळा मुतणारी पोरगी त्याच्या उपयोगाची नव्हती. फक्त निमूवाच काय ती त्याच्याशी झटापट करण्याच्या दमाची होती. परंतु शेवटी तिलाही ता पेलला नव्हता !

त्या प्रसंगापासून निगूडाचं मन पिरंगुळाच्या वस्तीपासून दूर दूर भटकू लागलं. शिकारीच्या निमित्तानं तो आणि उदगा पाहता पाहता काळेनिळे डोंगर चढून पलीकडचा माळ उतरत. पुन्हा डोंगर चढत; पुन्हा उतरत. पाहता पाहता कुठच्या कुठे निघून जात. अनेक वस्त्यांची चाहूल घेत, टेहेळणी करीत, कुठे डल्ला मारीत, पोटाची आग विझवीत—आणि पुन्हा आपल्या टेहेळणीच्या कामाला लागत.

शेवटी बऱ्याच भटकंतीनंतर त्यांना वडीगाच्या वस्तीतील पूरिया दिसली !

तिला प्रथम पाहिल्याबरोबर त्याच एका क्षणाला निगूडा मटकन खालीच बसला. एवढा तिच्या आकर्षणानं तो झटकला होता.

आभाळात सूर्य अगदी वर येण्याची वेळ होती. नदीच्या पलीकडच्या काठावर वडीगाची वस्ती होती. आणि अलीकडे डोंगरांना चिकटलेल्या झाडीत निगूडा आणि उदगा लपले होते.

नदीच्या खोल आणि संथ डोहात पूरिया मनसोक्त पोहत होती. घटकेत झाडाच्या उंच फांदीवर खारीसारखी चढून जात होती. आणि लगेच चपळाईनं डोहात उडी घेत होती. मग पाणी संथ होईपर्यंत ती तशीच पडून राहात होती. त्यानंतर डोहाच्या तळाशी जाऊन मोठमोठाल्या माशांच्या आणि कासवांच्या खोड्या काढीत होती. त्यांचा पाठलाग करीत होती.

हे सारं पाहताना निगूडा अक्षरशः दिपला होता. त्याच्या वस्तीपेक्षा वडीगाची वस्ती एवढी पुढारलेली असेल अशी त्यांची कल्पना नव्हती. 'वडीगा' अत्यंत शूर माणूस आहे हे त्यांना माहीत होतं, परंतु त्या वस्तीतल्या पोरीदेखील तेवढ्याच शूर असतील असं त्याला वाटलेलं नव्हतं.

–मग निथळत्या पाण्यानिशी बाहेर उन्हात उभ्या राहिलेल्या पूरियाला त्याने अगदी पोटभर पाहिली आणि एक ढेकर देऊन त्याने उदगाला खूण केली !

त्यानंतर दोन दिवस त्याचा आणि उदगाचा कट शिजला. उदगाला खरं म्हणजे निगूडाचं हे असलं वागणं पहिल्यापासून पसंत नव्हतं. परंतु त्याचा नाइलाज होता ! त्यांच्या डोक्यातून मग अनेक युक्त्या निघाल्या. दंड, छाती आणि हत्यारांवर पूर्ण विश्वास ठेवला गेला. आणि एका मध्यरात्रीच्या सुमारास पूरियाला त्यांनी पळविली !

अगोदर बराच वेळ तिच्यावर झाडपाल्याचा काही परिणामच झाला नाही. तोंडात बळेच कोंबलेल्या मुळ्या तिने केव्हाच तोंडाबाहेर फेकून दिल्या होत्या. मग अगदी आडरानात तिने निगूडाच्या हातचा सडकून मार खाल्ला ! तिनेही त्याला चांगलाच ओरबाडला. पण मग तिच्या नाकात काहीतरी पिळल्यावर ती एकाएकी निपचित पडली.

ती पार त्यांनी तिला आपल्या वस्तीत स्वतःच्या झोपडीसमोर आणून निजविली तरीही सावध झाली नव्हती.

—भोवती जमलेल्या बायकातली निमूवा जेव्हा तिच्याकडे फारच टक लावून पाहू लागली, तेव्हा निगूडाने जवळचा एक ढेकूळ उचलला आणि फाडकन् निमूवाच्या थोबाडावर मारला. त्यासरशी निमूवा एकदम दोन हात मागे सरकली ! आणि निगूडाच्या नजरेला नजर देण्याची तिला हिम्मतच झाली नाही. पण मग दुसरे ढेकूळ उचलताना निमूवाचं त्याच्याकडे लक्ष गेलं. लगेच त्याच्या डोळ्यातल्या रागाच्या इंगळ्या तिच्या सर्वांगाला डसल्या ! त्याने खूण केल्यामुळे ती भीत भीत त्याच्या जवळ गेली. त्याने खसकन् तिच्या दंडाला धरलं, आणि नदीकडे बोट दाखवून त्याने तिला जोरात ढकलून दिलं !

मग निमूवा धावतच नदीवर गेली. आणि भोपळ्यात झटकन् पाणी घेऊन आली. तिच्या हातातला पाण्याचा भोपळा पाहिल्याबरोबर दोन-तीन म्हाताऱ्या बायका उठल्या, आणि पूरियाच्या तोंडावर पाण्याचे सपके मारू लागल्या. एकीनं तिचं तोंड बळेच उघडून तिला पाणी पाजलं.

त्यानंतर बऱ्याच वेळाने पूरिया शुद्धीवर आली. भिरभिरत्या डोळ्यांनी चहूकडे पाहू लागली. अनोळखी खिल्लार पाहिल्याबरोबर साऱ्या आठवणी तिच्या डोक्यात एकदम दाटल्या, आणि तिने मोठ्याने किंकाळी फोडली !

मग झटकल्यासारखी ती उठून तटकन् उभी राहिली. आणि सैरावैरा धावत सुटली. पण थोड्याच वेळात निगूडाने तिला पुन्हा धरून आणली. आणि तिचे हात मागे करून झाडाच्या खोडाला त्याने तिला बांधून टाकलं.

निगूडाला आज रात्रीच्या अंधारात पडल्या पडल्या या साऱ्या आठवणी होत होत्या !

पूरिया फक्त एक दिवस त्याच्या वस्तीत राहिली होती. आणि त्याच दिवशी मध्यरात्रीच्या काळ्याकुट्ट अंधारात ती तिथून सटकली होती, बेपत्ता झाली होती.

त्यानंतर निगूडा अक्षरशः वेड्यासारखा भटकला होता. चारी दिशा त्याने उलथ्या पालथ्या घातल्या होत्या. पुन्हा उदगा आणि तो वडीगाच्या वस्तीवर गेले होते. परंतु त्या जागेवर आता वडीगाची वस्तीच राहिलेली नव्हती !

पूरिया कुठे गेली हे त्यांना समजेना. पूरियाच्या शरीराचा स्पर्श अजून त्याच्या छातीला, दंडांना चिकटून राहिलेला होता. तिला उचलून आणली तेव्हाचा तिच्या श्वासातला गंध अजून त्याच्या मस्तकात घुमत होता. तरीही तिनं त्याला काहीच दिलेलं नव्हतं !

परंतु तिचं पळून जाणं त्याच्या वस्तीला, त्याच्या शौर्याला काळीमा लावण्यासारखं होतं. त्याच्या पौरुषाला लाथाडण्यासारखं होतं नि आव्हानही देण्यासारखं होतं !

पूरिया हातची गेल्यापासून त्याला काहीही सहन होत नव्हतं. तो नेहमीपेक्षा जास्तच रागीट झाला होता. नेहमीपेक्षा जास्त खुनशी, क्रूर पण झाला होता.

निमूवाला तर सावलीजवळही तो थरकू देत नव्हता. शिकारीला त्याच्या बरोबरीला ती असली आणि तिच्याकडून एखादी जरी क्षुल्लक चूक झाली की, तेवढ्यावरूनच तो तिच्यावर खूप चिडत होता. तिला बेदम मारीत होता ! बेसुमार फटके खाऊन ती विव्हळायला लागली की, तिला तिथेच टाकून तो पुढे चालू लागत होता.

परंतु निमूवाने त्याचा सहवास सोडला नव्हता. काहीही झाले तरी तिला त्याची राणी व्हायची इच्छा होती. साऱ्या वस्तीत डौलानं मिरवायचं होतं ! त्या एकाच गोष्टीकरीता ती सारं काही सहन करीत आली होती, पुढेही सहन करीत राहणार होती. सतत निगूडाला चिकटून राहण्याची एकही संधी ती सहसा गमावीत नव्हती.

आणि आजची रात्र तर केवढी महत्त्वाची होती. निगूडा वस्तीचा राजा झाला होता. सारी वस्ती आनंदाने फेसाळून निघाली होती. हैदोस घालून नाचली होती. निगूडाच्या कणखर छातीच्या बळावर विश्वासून आता गार झोपली होती. परंतु निगूडाला मात्र झोप येत नव्हती ! आणि निमूवाही तळमळत होती !

निगूडा राजा झाला होता. पण निमूवा राणी झाली नव्हती. निदान अजून तरी झाली नव्हती !

रात्र हळूहळू पुढे पुढे सरकत होती. काळ्या आभाळातल्या चांदण्या चटकत होत्या. काही शुभ्र ढगांचे विरविरीत पुंजके पळत होते. आणि रात्र मोठमोठ्याने भिरभिरत होती ! तशातच निमूवा झोपडीच्या उकाड्यातून हळूच बाहेर आली. तिनं एकदा तिखट कानांनी वस्तीची आणि आसपासची संपूर्ण चाहूल घेतली. आणि मग निगूडाच्या श्वासाच्या तालावर ती हळूहळू वडाच्या झाडाकडे चालू लागली. तेव्हा तिची छाती तटतटत होती. मस्तकात गरम गरम प्रवाह वाहात होते. आणि पोटात कुठे तरी काही तरी होत होतं!

झाडाजवळ आल्यावर हळूच ती निगूडाच्या जवळ येऊन बसली. बराच वेळ तशीच बसून राहिली. मग जरा वेळाने तिने त्याच्या दंडावर मांडी टेकली, आणि साऱ्या शरीरभर कसले तरी प्रवाह खेळवू लागली. निगूडा मात्र थंडपणे अंधारात कुठेतरी पाहात राहिला होता. त्याच्या थंडपणामुळे ती बरीच निर्धास्त झाली होती. नाहीतर त्याच्या बेदम माराची तिला भीती होतीच ! मग त्याच्या छातीवर रेलून त्याच्या लांब लांब केसातून ती हात फिरवू लागली. पण मग ती जेव्हा त्याच्याशी अधिकच लगट करू लागली तेव्हा निगूडा एकदम गरजला.

तरीही ती आपले गाल त्याच्या छातीवरून फिरवीतच राहिली.

परंतु त्यामुळे निगूडा रंगात येण्याऐवजी अधिकच तापत चालला होता. एका तिरीमिरीत त्याने निमूवाचा दंड इतक्या जोराने दाबला तरीही निमूवा बळेच थंड राहिली. त्याच्या अपेक्षेप्रमाणे त्या दाबामुळे ती दगडाचा फटकारा बसलेल्या खोकडाप्रमाणे ओरडेल आणि पळत सुटेल ! पण तिनं ते सारं सहन केलं होतं ! त्यामुळे तो एकदम चमकला. आणि तिच्या धैर्याची मनातल्या मनात स्तुती करू लागला. त्या थोडयाशा आवेगामुळेच तो किंचित ढळला.

आणि त्याने एकदम तिला कडकडून मिठी मारली !

परंतु दुसऱ्याच क्षणाला भानावर आला आणि चित्त्याप्रमाणे हाताचे पंजे फिसकारून त्याने तिला दूर भिरकावली !

तो तिला पेलणारा तर नव्हताच ! ¤

: ४ :

निगूडाच्या हिसडयासरशी निमूवा दूर भिरकावली गेली. तिच्या डोक्याला वडाच्या झाडाची एक लोंबती पारंबी ठकसन् लागली. आणि मस्तकातून आरपार कळा निघाल्या. डोळ्यांपुढे अंधारी आली, आणि विव्हळण्याचा एक करुण स्वर तिच्या तोंडावाटे बाहेर पडता पडता थबकला. जिभेवरच गोठून गेला.

तिच्या कमकुवतपणाचा स्वर निगूडाच्या कानावर पडला असता तर पुन्हा तिची धडगत नव्हती. त्यानं पुन्हा तिला तिथं येऊन कुचलं असतं, खूप पिटलं असतं ! निगूडासमोर कुणीही दुबळयासारखं वागलेलं त्याला खपत नसे, हे निगूडा वस्तींतल्या साऱ्यांनाच माहीत होतं.

दोन दिवसांपूर्वीचाच एक प्रसंग ताजा होता. अंधार पडल्यावर एक लांडगा खुसखुसत कुठून तरी वस्तीत शिरला. आणि एका कोंबडयाला बचकीत दाबून जाताना पिरूनं पाहिलं. लगेच तो बारा वर्षाचा पोर हातात दगड घेऊन त्याच्या मागे धावला. माऱ्याच्या टापूत आल्याबरोबर त्याने दगडाचा बतका लगावला. लांडग्याच्या तो पोटात बसल्यामुळे त्याच्या तोंडातून कोंबडं निसटलं आणि पंख झाडून पळू लागलं. तशी चवताळलेला लांडगा पुन्हा मागे फिरला. हे सारं काही क्षणातच घडलं. मागे फिरलेला लांडगा जवळ आलेला पाहताच ते पोर प्रथम जरा घाबरलं. आणि मोठ्याने ओरडलं. तेवढयांत वस्तीत धांवधाव झाली. त्या धमालीत लांडगा निघून धूम पळत सुटला. पार दिसेनासा झाला.

पण मग निगूडाने पिरूलाच खूप चोपलं. तो भ्याडासारखा ओरडला म्हणून निगूडाचा संताप झाला होता. पिरूला खूप पिटूनही शेवटी त्याचं समाधान झालं नाहीच.

—त्यांचा असा समज होता की, ज्या शत्रूसमोर भित्रेपणाची कृती होते, तो शत्रू आपल्या सर्व जातवाल्यांना हा भ्याडपणा जाऊन सांगतो आणि मग ते सारे मिळून हल्ला करायला येतात. आता तो लांडगा आपल्या जातवाल्यांना हे निश्चित जाऊन सांगणार आणि आपल्या वस्तीवर नेहमी लांडग्यांचे हल्ले होत राहणार अशी निगूडाची खात्रीच होऊन बसली !

मग त्या तसल्या अंधारात, भ्यालेल्या स्थितीत असलेल्या पिरूला निगूडाने अर्धा मैल दूर असलेल्या नदीवर जायला सांगितलं आणि नदीच्या पाण्यात धोंडा भिजवून धोंडा वाळण्याच्या आत पळत माघारी यायला सांगितलं.

'जा ?ऽ'

तो मोठ्याने पिरूवर ओरडला. पिरूला त्याच्या पेटलेल्या अंगावर डोळयांकडे पाहण्याचे धैर्य झाले नाही. खाली जमिनीवर दृष्टी खिळवून ते पोर लटलट कांपू लागलं ! तेवढयात रिशा झोपडीतून बाहेर आली. डोळयावर उजव्या हाताचा पंजा ठेवीत ठेवीत जवळ आली निगूडाकडे पाहून म्हणाली,

'काय झालं ?'

'भेतंय कार्ट !'

'ऑं ? भेतंय ? कशाला ?'

'लांडग्याच्या पिल्लाला ?'

— आणि पुन्हा पिरूकडे पाहून पहिल्यापेक्षा दुप्पट जोरात तो ओरडला,

'जाऽऽ !'

आणि पिरू ढसाढसा रडू लागला. त्याला पाहताच म्हातारपणामुळे लटलट कापणारी रिशा एकदम ताठ झाली. निगूडाच्या शक्तीचा जणू तिच्यांतच संचार झाला. आणि एकदम तरातरा चालत पिरूजवळ जाऊन तिने त्याचे मनगट पकडले. ते गरकन पिळून त्याची पाठ आपल्याकडे ओढून घेतली. पाठीत एक गुद्दा ठेवून दिला !

आता पिरू पूर्ण निराधार झाला. त्याची भीती वाळून कोळ झाली. आणि तो निमूटपणे एकटाच, अंधारात चालत नदीवर गेला. भिजलेला धोंडा वाळण्याच्या आत धावत माघारी आला !

त्याला आलेला पाहिल्याबरोबर निगूडाची छाती फुलली. आणि धावत दोन हात पुढे जाऊन त्याने पिरूला कमरेला धरून वर उचलले. दोनतीन वेळा वर भिरकावले आणि जसेंच्या तसे झेलले. आणि त्याच्या तोंडून उद्‌गार निघाला,

'गब्रूऽ!'

जिद्दीला पेटला म्हणजे निगूडा अत्यंत वाईट माणूस होता. परंतु त्याच्याच हिमतीवर साऱ्या जीवांचं संरक्षण आधारित होतं. निमूवाला त्याचा हा स्वभाव आणि त्याची किंमत पटलेली होती !

म्हणून मग ती तशीच गुपचुप त्याच ठिकाणी रात्रभर पडून राहिली. अगदी स्वतःच्या धपापणाऱ्या श्वासाची देखील चाहूल तिनं त्याला लागू दिली नाही.

पुन्हा मग अर्धी रात्र उलटून गेल्यावर ती हळूच त्याच्याजवळ आली. त्याच्याजवळ झोपली. अगदी त्याला लगटून झोपली. आणि केव्हा तरी झोपेच्या स्वाधीन झाली.

दिवस उगवायच्या अगोदर ती सारी वस्ती उठली. शिकारी लोकांनी आपापली हत्यारे उचलली. बाया उठून त्यांच्या खाण्याची तयारी करू लागल्या. बारकी मुलं रडू लागली. त्यांना त्यांच्या आया गपागप छातीला लावून शांत करू लागल्या. मग मोठी मुलं उठली. नदीच्या तीरावर परसाकडेला गेली. नदीत आंघोळी करता करताच

पृष्ठ ३४ वर



# विमा भागीदाराचा

म. अ. दळवी

एका प्रशांत बंगल्यात भर रात्री दिवा लुकलुकताना दिसला. काहीसा उंचावर असलेला बंगला होता तो. थोडाफार शहराबाहेर. तळात पोलीस चौकी होती. गस्तीवर असलेल्या पोलिसानं तो प्रकाश पाहिला अन आपल्या अधिकाऱ्यांना त्याबद्दल निवेदन केलं. त्यांनी क्षणभर त्या प्रकाशाची हालचाल पाहिली आणि त्वरीत कुमक घेऊन त्या बंगल्याला वेढा घातला. आणि अगदी अल्पावधीत चोराला मुद्देमालासह चोरताना अटक केली. तत्पूर्वी तेथे परिसरात अनेक चोऱ्या घडल्या असल्यामुळं चोराला पकडल्यामुळं काही उसंत सापडेल असं चौकीवरल्या सर्वांना वाटलं. पण तसं घडणार नव्हतं.

चोरानं आपली चोरीची ही पहिलीच खेप आहे वगैरे अनेक गोष्टी आपणास सावरण्यासाठी सांगितल्या. पण एकूण जबानी घेताना जे काही दुवे सापडले ते त्या संरक्षक दलाच्या इसमांना महत्त्वाचे होते. तसेच त्यांना कित्येक दिवस कार्यान्वित ठेवणारे होते. त्या जबानीत तो अमूक एका ठेकेदाराकडं सुतारकाम करीत असे. आपल्या पाठीला जबर दुखापत झाल्यामुळं आपलं काम सुटलं आणि चोरी करण्यास प्रवृत्त झालो. आपला ऋग्णालयावर विश्वास नसल्यामुळं इलाज आपला आपणच केला. दुखापत कोठे आणि केव्हा झाली या प्रश्नाचं त्याचं उत्तर होतं, 'सेंटपीटर्स चर्चमध्ये काम करताना.' त्यानं नंतर दिवस सांगितला.

अधिकारी महाशयांनी कोणतंही आश्चर्य व्यक्त केलं नाही. पण चोरीचं फक्त गुन्हेगाराचं काम नव्हतं हे त्यांना एकदम आठवलं. त्या दिवशी चर्चच्या शिखरावरून पडून गवंड्याचा मृत्यु झाला होता. वैद्यकीय तपासणीत गवंड्याला नैसर्गिक अपघात होऊन मृत्यु आला नव्हता. त्याच्या डोक्यावर प्रहार करून त्याला ढकलून दिल्यामुळं मृत्यु आला होता. तो तर यानं—या चोरानं—केला नव्हता ना ?

गवंडी, चोरानं सांगितलेल्या ठेकेदार इसमाचा आपल्या व्यवसायातील भागीदार होता. वर्षापूर्वी ही निर्घृण घटना घडली होती. तो ठेकेदार नंतर दुसरीकडं गेला होता. त्या चोराला त्याचा ठावठिकाणा माहीत नव्हता.

त्या चौकस अधिकाऱ्यांच्या त्वरीत लक्षात आलं होतं की, त्या चोरानं सांगितलेलं सर्वच काही खरं असेल पण हा सर्व प्रकार खोलवर कुठंतरी रुतला आहे. खुनाशी तर त्याचे निकटचे संबंध आहेत.

गवंड्याची विधवा त्या चर्चजवळच राहात होती. त्या घटनेनंतर ती बरीच सुस्थितीत असावी. तिच्या घरी ते अधिकारी एक दिवस पोचले. त्यांनी त्या ठेकेदाराबद्दल आणि पकडलेल्या चोराबद्दल विचारपूस केली. ठेकेदाराबद्दल ती बोलावयास तयार होती. पण चोराबद्दल तिनं खूपच घृणा दाखविली. चौकशीनंतर ते परतले.

भेटीत तसं विशेष कळलं नव्हतं. पण नवऱ्याच्या विम्यातून तिला विशेष पैसे मिळाले नव्हते. त्या ठेकेदाराशी तिची विशेष सलगी असावी. तिच्या सुस्थितीबद्दल ते एक कारण असावं. पण त्या ठेकेदाराबद्दल त्यांचं मत विशेष चांगलं बनलेलं नव्हतं. एक काम सोडून दुसरं पत्करणं नि एक शहर सोडून दुसरीकडं नव्यानं जाणं हे लक्षण या ठेकेदाराचं त्यांच्या लक्षात आलं. त्याबद्दल विशेष माहिती त्यांना आता हवी होती. त्याचवेळी अनुषंगानं त्यांच्या मनात विचार आला होता तो हा की आपल्या ठेकेदारीतून तो पैसा मिळवीत होता की कसं? तसं त्यांच्या माहितीत हेही आलं होतं की कर्ज करून अथवा हाती घेतलेलं काम अर्ध सोडून तो पळ काढीत असे.

त्याचा पत्ता मिळवून ते त्याच्या कचेरीत एक दिवस उपस्थित झाले. त्यानी त्या चोराबद्दल माहिती विचारली. 'वाह! त्या माणसाला मी केव्हाही नोकरीस घ्यावयास तयार आहे. असा कामाचा माणूस मिळणं कठीण!' त्या चोराच्या पाठीला इजा त्या ठेकेदाराच्या कामावर असताना झाली होती त्याबद्दल विचारलं पण विशेष समाधानकारक उत्तर मिळालं नाही. पण तो गृहस्थ काहीतरी त्या घटनेमागं दडवीत होता हे त्याच्या चेहऱ्यावरच्या अविर्भावावरून हेरलं होतं. ते दोघे एकमेकात काहीतरी गुपीत दडवीत आहेत असा निष्कर्ष त्यांनी काढला.

त्यांनी त्या गवंड्याच्या विधवेबद्दल विशेष काही माहिती मिळते का हे अजमावण्याचं ठरविलं. त्या ठेकेदाराबद्दल तिला विशेष आस्था का आहे? त्या चोराबद्दल विशेष घृणा का आहे? त्यांनी तिच्या परिसरातील इतर स्त्रियांकडं मोठ्या दक्षतेनं चौकशी केली. त्या चौकशीतून त्या गवंड्याच्या तथाकथित अपघाती मृत्यूनंतर तो ठेकेदार त्या विधवेकडंच राहू लागला होता. त्यांची विशेष सलगी होती. तो चोर त्याचा कामगार होता. तो वरचेवर तेथे या ना त्या निमित्तानं यावयाचा, तो ठेकेदार त्यावेळी मोठ्या उदारतेनं पैसे वाटावयाचा. तेव्हा या तिघांमध्ये खचितच पाणी मुरतं आहे. गवंड्याला त्या ठेकेदारानं आपला व्यावसायिक भागीदार केलं होतं, ते का? त्या विधवेला खूश करण्यासाठी तर तसं त्यानं केलं नसेल ना? किंवा भागीदारीतून काही अवैध लाभ त्याला उठवावयाचा नव्हता ना?

त्या विधवेला विम्याचे विशेष पैसे मिळाले नव्हते. आणि ठेकेदाराबद्दल मिळालेली माहिती यांच्या अनुषंगानं त्यांच्या मनात एक विचार आला. त्या ठेकेदारानं विम्याचे काही व्यवहार आपल्या व्यवसायात केले असावेत काय? त्या दृष्टीने त्यांनी चौकशी सुरू केली. त्यांना असं आढळलं की त्यानं त्या गवंड्याचा पन्नास हजारांचा विमा उतरवला होता. दुसऱ्या एका शहरात त्यानं त्याच्या सांप्रतच्या भागीदाराचा ऐंशी हजाराचा विमा उतरवला होता. आता त्यांना चौकशीतून विशेष असं चित्र स्पष्ट होऊ लागलं होतं. गवंड्याचा खून या पैशासाठी घडला होता. त्याच्या विधवेला हे ठाऊक नव्हतं. पण तो खून कुणी केला होता त्या चोरानं की त्या ठेकेदारानं? पण हे कळावयाचं कसं?

त्यांनी पुन्हा एकवार त्या विधवेला भेटावयाचं ठरविलं. तिला त्यांना पाहून काही बरं वाटल्यासारखं दिसत नव्हतं. पण त्यांनी तिला विश्वासात घेऊन हटकलं, 'आपणास हे ठाऊक आहे का की ते एका दुसऱ्या विदुषीबरोबर राहतात?'

त्यावर ती एकदम खवळली, 'खरं की काय? मला त्यांनी लग्नाचं अश्वासन दिलं आहे!'

त्या पन्नास हजाराच्या विम्याबद्दल हटकलं असता तिला त्याबद्दल काहीच माहिती नव्हती असं दिसून आलं. तिला त्या विम्याच्या पैशांतून एक फुटकी कवडीही मिळाली नव्हती. या उभय महत्त्वाच्या माहितीमुळं ती आता त्या ठेकेदाराबद्दल साशंक झाली होती. आपण या व्यवहारात फसलो आहोत हे तिला कळून चुकलं होतं. त्या ठेकेदाराबद्दल तशी तिला फारशी माहिती नव्हती. तो जर्मन असावा असं तिला वाटत होतं. अन् तो चोर घरी आला की ठेकेदाराकडून लठ्ठ पैसे घेतल्याशिवाय तो जात नसे. त्याला नोटा मोजताना तिनं एक-दोन वेळा पाहिलंही होतं. पैसे असे त्याला का दिले जात हे तिला माहीत नव्हतं.

ही माहिती त्यांच्या दृष्टीनं महत्त्वाची होती. आता त्यांनी दोन बाजूंनी चौकशी आरंभली. तो ठेकेदार जर्मन आहे का हे पहाणं. त्याची पूर्वपीठिका अवगत करून घेणं. ही एक बाजू. त्या चोराला रक्कम लाभण्याचा हेतू जाणवून घेणं. त्या पन्नास हजाराच्या विम्याची त्याला माहिती आहे का हे जाणून घेणं. ही दुसरी बाजू. त्याप्रमाणं माहिती गोळा करताना त्यांना असं आढळून आलं की, तो ठेकेदार जर्मन होता. त्या ठेकेदाराचं खरं नाव त्यांना मिळालं होतं. पूर्वी त्याला कारावासाची शिक्षा झालेली होती. फसवणुकीचा आरोप त्यावेळी त्याच्यावर शाबीत झाला होता. त्या विधवेचा तर्क तो जर्मन असावा हे सिद्ध झालं होतं. त्या ठेकेदाराच्या नव्या भागीदाराशी चौकशी करता त्याचा ऐंशी हजाराचा विमा उतरण्यात आला आहे हे ठाऊक नव्हतं, असं त्यांना आढळलं. त्या चोरानं आपणावर खुनाचा आरोप लादला जाईल या जाणीवेनं या प्रकरणातील आपली खरीखुरी हकीकत त्यांना सांगितली ती अशी :

"मी संध्याकाळी त्या दिवशी वेळेवर काम आटोपून घरी परतलो होतो. गवंडी आपलं काम विजेच्या दिव्याच्या प्रकाशात करीतच होता हे आपण जाताना पाहिलं होतं. रस्त्यात आपल्या एका ओळखीच्या इसमाचं थोडंसं काम करावयाचं आहे याची आठवण होऊन आपली अवजाराची पिशवी आणण्यासाठी चर्चमध्ये परतलो. चर्चमध्ये नाताळ जवळ येत होता म्हणून विशेष गीतं आणि संगीताची तालीम मोठमोठ्यानं चाललो होती. मी चर्चच्या दाराशी पोचलो तेव्हा तेथे अंधार होता. धाडकन काहीतरी पडलं नि सिमेंटची बादली पालथी होऊन सांडलेली लक्षात आली. तेवढ्यात काळोखातून कुणीतरी मला पकडलं. माझं तोंड हातानं घट्ट दाबून धरलं. मी चकारशब्द कोठेही बोलता कामा नये अशी धमकी मला ऐकू आली. मी गप्प राहिलो. त्या कोसळण्याच्या आवाजानं चर्चमधून माणसं बाहेर आली; पोलीस आले; अग्निशामक दलानं ते प्रेत खाली उतरवलं. सारं शांत झाल्यानंतर मला अडकवून ठेवणाऱ्या माणसानं मला मुक्त केलं. मी साऱ्या प्रकरणात गप्प रहावयास पाहिजे. पोलिसात जाता कामा नये. मला वर्षभर याबद्दल अमुक एक रक्कम देण्याचं त्या व्यक्तीनं कबूल केलं. ती व्यक्ती दुसरी-तिसरी कुणी नसून ठेकेदार स्वतः होती!"

खून ज्या गवंड्याच्या हातोड्यानं केला गेला, तो जवळच्याच कालव्यांत अमुक ठिकाणी टाकण्यात आला ती जागाही त्या चोराला

कळली होती. ती त्यानं दाखविली. तिथं गळ लावून पहाता तो हातोडा सापडला. चोर आता खरं बोलत होता, हे सिद्ध झालं होतं. एवढा पुरावा मिळताच त्यांनी त्या ठेकेदारास आपण जर्मन असून बनावट डच कागदपत्र करवून डच नागरिक असल्याचं सांगताच तो ठेकेदार रागानं लालबूंद झाला. पण त्यांनी त्याची जर्मन पूर्वपिठिका सांगताच तो नरम आला. त्यांनी त्याला खुनाच्या आरोपाखाली त्याचं मूळ जर्मन नावानं अटक केली. त्यानं आपल्याकडून या खून प्रकरणात आणि अनुषंगानं विमाकंपन्यांस फसविण्यात खूप उडवाउडवी केली पण ती सफल झाली नाही. कारण त्याच्या एकेकाळच्या कामगाराची आणि आता चोरीचा आरोप असलेल्या इसमाची साक्ष त्याला घातक होणार होती हे त्याला पूर्ण कळून चुकलं होतं.

त्याच्यावर यथायोग्यवेळी न्यायालयानं खुनाचा आरोप शाबीत केला. ते ऐकून कुणाला विशेष समाधान झालं असेल तर ते त्या विधवेला होय. आता संपूर्णतः नमलेल्या त्या ठेकेदाराचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. वर्षभरानं खरा; पण खुनाचा शोध समाधानकारक लागला याबद्दल सर्वत्र कौतुक निर्माण झालं होतं हेही तितकंच खरं होतं ! कारण एका गुन्ह्यांतून दुसऱ्या गुन्ह्याचा शोध लागला होता.

[ आधारित ]


## *आता आयुर्विम्याच्या क्लेमचे रक्कम वसुलीचे काम आमच्यावर सोपवा*

**बँक ऑफ महाराष्ट्रकडून आपली आणखी एक सेवा**

सर्व प्रकारच्या आयुर्विमा क्लेम-वसुलीचे काम आपणाकरिता आम्ही करू. विमा-पॉलिसी परिपूर्ण झाल्यामुळे उद्‌भवणारी अथवा विमाधारकाच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली वसुली असो, आपण फक्त आयुर्विमा महामंडळाचे फॉर्म्स (तक्ते) योग्यप्रकारे भरून आमच्याकडे सुपूर्द करा. पुढील जबाबदारी आमची.

**ही सेवा फक्त खालील शाखांतून उपलब्ध होईल.**

: शाखांची नावे :

१. अहमदनगर २. अकोला ३. अमरावती ४. औरंगाबाद (सिटी) ५. भंडारा ६. भीर ७. चंद्रपूर ८. धुळे ९. जळगांव १०. कोल्हापूर ११. सिताबर्डी (नागपूर) १२. नांदेड १३. नाशिक (सिटी) १४. नाशिक रोड १५. उस्मानाबाद १६. परभणी १७. रत्नागिरी १८. सांगली १९. सातारा सिटी २०. पी. जी. कोल्हापूर २१. ठाणा (स्टे. रोड) २२. ठाणा (इ. रोड) २३. वर्धा २४. यवतमाळ २५. बडोदा २६. अहमदाबाद २७. हैद्राबाद २८. देवास २९. इंदूर ३०. उज्जयनी ३१ दुर्ग ३२. ग्वालियर ३३. बंगलोर (सिटी) ३४. बेळगाव (सिटी) ३५. नवी दिल्ली ३६. पणजी (गोवा) ३७. डॉ. आंबेडकर रोड (मुंबई) ३८. भवानी शंकर रोड (मुंबई) ३९. फोर्ट-मुंबई ४०. गिरगांव-मुंबई ४१. गोखले रोड-मुंबई ४२. रानडे रोड-मुंबई ४३. बाजीराव रोड-पुणे ४४. कॅम्प-पुणे ४५. डेक्कन जिमखाना-पुणे ४६. कर्वे रोड-पुणे ४७. लक्ष्मी रोड-पुणे ४८. शिवाजीनगर-पुणे ४९. टिळक रोड-पुणे ५०. पुणे विद्यापीठ.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

**हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २**




प्रखर सूर्याचा अर्धगोल. खाली करपून तांबडी जांभळी पडलेली पृथ्वी. दुसरं काही नाही. सूर्य इथं उगवतो तो उन्हाचा स्फोट करीतच. डोळे दिपवीत लख्कन् आकाश पेटते. ज्वाळा नसलेला वणवा धग्धगू लागतो. तवा तापावा तसे दगड तापतात, माती तापते, वरून आणि खालून. जिकडे तिकडे उघडे बोडके सुळके. उन्हानं पाडलेल्या भेगांची भेसूर नक्षी. धगधगणाऱ्या घळी, मनस्वी उकाड्यानं अंगावर झुडूप ठेवणंही पृथ्वीला नकोस वाटतं.

उन्हानं बेहोश झालेली पृथ्वी इथं आवाजही करीत नाही. इथं खरं निसर्गाचं राज्य आहे. माणसाला स्वतःचं महत्त्व वाटत असेल तर त्याला इथं आणून ठेवावं. लक्षावधी वर्षांचा काल त्याला इथं साठवून ठेवलेला दिसेल. येथील दऱ्याखोऱ्यांच्या तप्त भांड्यातून काळाची वाफ होऊन अडकून राहिलेली आहे. इथे आल्यावर माणसाला आपण किती क्षुद्र आहोत हे कळेल. आपले आयुष्य किती अल्प आहे ! आपले कर्तृत्व किती बिंदुमात्र आहे ! आपण पेटवलेल्या पहिल्या शेकोटीची आणि पहिल्या बाँबची ऊष्णता किती क:पार्थ आहे.

अशा या प्रदेशावर सूर्या खालोखाल राज्य आहे गिधाडांचं, लांडग्यांचं, कोल्ह्यांचं. येथे गिधाडांच्या नजरा तीक्ष्ण झालेल्या आहेत. लांडगे जास्त क्रूर आणि अधिक धूर्त बनले आहेत, त्यांना तसं व्हावंच लागलं ताहे. इथे मधून मधून दिसणारा निवडुंगाचा फडही चिवट, क्रूर, धूर्त बनलेला आहे. असल्या उष्णतेत नाहीतर तो वाढणारच नाही. इतरांच्या जिवाला इथले हे प्राणी जितकं भय घालतात तेवढं त्यांच्या जिवालाही आहे.

आवाज न करता गिधाड वर घिरट्या घालीत असतं. आकाशातून त्याचं सरकणं किती संथ मुलायम वाटतं. पण काही भक्ष्य दिसताच ते जेव्हा खाली झेपावतं तेव्हा जमिनीवरची धूळ उडवीत वादळासारखं ते भक्ष्याला उचलून पुन: वर झेप घेतं. भक्ष्याची तडफड आणि त्याची भयामुळं झालेली मृतवत अवस्था-इतका भीषण देखावा कुठे नसेल. केव्हातरी ते खाली येऊन उंचवट्यावर बसून आपल्या वाटोळ्या बबुळांनी खालचा प्रदेश निरखीत असतं. घोडं किंवा जनावर किंवा माणूस जरासं चाचरत, हेलकावत चालू लागलं की त्याचे डोळे अधिक लुकलुकतात. हा प्राणी काही वेळानं पडणार ही त्याची खात्री असते.

होय. अमेरिकेतील या रखरखत्या प्रदेशात माणसं येतात, माणसाबरोबर त्यानं पाळलेली जनावरं. कधी ती पलीकडच्या सुपीक प्रदेशात जाण्यासाठी हा वैराण प्रदेश ओलांडीत असतात. कधी ती चुकून या टेकड्यांत व घळीत सापडून वाट न मिळाल्यानं हिंडत राहतात. उन्हाचा तडाखा, तहान व भूक त्यांचा बळी घेतं. मग उडालेल्या धुळीनं झाकीपर्यंत त्यांची हाडं जागोजागी पडून राहतात. ती हाडं पाहून चुकलेल्या प्रवाशांचा अर्धा धीर खचतो. येथील मूळचे रेड इंडियन लोक या प्रदेशाच्या आसपासही फिरकत नाहीत. या प्रदेशात गेलेला कधी परत येत नाही हे त्यांना ठाऊक आहे. या प्रदेशावर क्रूर दैवतांचे राज्य आहे अशी त्यांची समजूत आहे.

अशा या प्रदेशात कुठेतरी डोंगराच्या कपारीत सोन्याचा साठा आहे-अगदी उघड्यावर. सर्वत्र ही समजूत होती. ती खरी किंवा खोटी असेल कुणाला नक्की ठाऊक नव्हतं. पण ती खरी निघावी असे सर्वांना वाटत होतं. रेड इंडियन लोकांत या सोन्याच्या आख्यायिका

झाल्या होत्या. मुळात या लोकांना सोन्याचे महत्त्व नव्हते. अमेरिकेत वसाहत करण्यास आलेल्या गोऱ्या लोकांना त्याचे जे महत्त्व होते त्याची त्यांना कल्पना नव्हती. हे रेड इंडियन लोक त्या सोन्यानं आपली देवळं मढवीत. इकडे तिकडे त्याचे पत्रे लावीत. त्या धातूची न विटणारी चकाकी त्यांना शोभेसाठी हवी असे, इतकंच.

पण गोरे लोक आले व गोऱ्यांच्या जगात सोन्यानं वाटेल ते मिळतं हे त्यांच्या लक्षांत आलं. सोने जवळ असेल तर रेड इंडियन माणसाला गोऱ्यांत महत्त्व येतं. गोऱ्यांनी पराभूत केल्यावर हे लक्षात आलं. पण अजूनही असा साठा कुठे कळला तर तो बोलावयाचा नाही हे त्यांचं सर्वसाधारण धोरण होतं. कारण असा साठा कळताच त्या मागोमाग गोऱ्यांच्या टोळधांची रीघ सुरू होते व सोन्याचा शोध घेत घेत ते तो प्रदेश वसती करून आपला करतात. तेथल्या रेड इंडियन लोकांना हलावे लागते. आपला प्रदेश सोडून जाण्याइतकं कोणतं मोठं दुःख रेड इंडियन लोकांना नसतं म्हणून असा सोन्याचा पूर्वापार ठाऊक असलेला साठा ते कुठे बोलत नाहीत. त्या साठ्याच्या भागात माणूस जाताच मरतो. तेथील सोन्याचे रक्षण करणाऱ्या देवता सदैव जागृत असतात अशा लोककथा त्या सोन्याभोवती निर्माण करून गोऱ्यांना त्या प्रदेशापासून ते दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

पण गोऱ्यांच्या संमतीनं काही रेड इंडियन्स जसे दारू प्यायला शिकले तसे काही सोन्यावर तितकाच लोभ करू लागले. त्या दिवशी ऐन उन्हातून आपल्या तट्टावरून जाणारा तो म्हातारा रेड इंडियन त्यातलाच होता. वय सत्तरीला आलेले. अंगभर सुरकुत्या पडलेल्या. उन लागू नये म्हणून डोक्यावर फडकी गुंडाळलेली. सबंध अंग जेवढं वस्त्रात लपेटता येईल तेवढं लपेटलेलं. पायांत इंग्रजी पद्धतीची तुमान. गोऱ्या लोकांत वावरलेला तो कळत होता. घोड्यावरची मांड या वयातही बळकट होती. खोगीराला बंदूक खोचलेली होती. या प्रदेशात ती हवीच. एक पाण्याचे डबडे लटकत असलेले. पण त्यांतले पाणी संपलेले वाटत होते. उन्हातून तो बेदरकार चालला होता. त्याला या लोकांत डोंगरात असलेल्या सोन्याबद्दलच्या दैवी कोपाच्या आख्यायिका मान्य नसाव्यात आणि असल्या तरी ते सोने डोळ्याने पाहायला मिळाल्यावर मरायला तो तयार होता. बस् सोन्याचा साठा उघड्या कपारीत झळाळतोय हे डोळ्यांना एकदा मरणापूर्वी पहायला मिळालं तरी पुरे. त्याची बायको मेलेली होती. मुले मोठी होऊन स्वतंत्र झालेली होती. आपलं हे सोन्याचं वेड त्यांना मान्य नव्हतं—त्याला ठाऊक होतं.

पण सोन्यापुढे त्याला कुणाची पर्वा नव्हती. जगाची नव्हती. देवाची नव्हती. आपल्या लोकांत त्यानं जे ऐकलं होतं त्यावरून तो सोन्याचा शोध घ्यायला निघाला होता. एखाद्या गोष्टीभोवती आपले लोक किती भुतं-खेतं उभी करीत. तिचे अस्तित्व त्यांनी असे किती झाकले तरी ती गोष्ट असते हे त्याला ठाऊक होतं. त्याची श्रद्धा रेड इंडियनांची होती पण तगमग गोऱ्यांची होती. एखादा गोरा माणूस पेटून निघावा तसा तो सोन्याचा शोध घेण्यास निघाला होता.

तो या देशातला, या देशातील सर्व तऱ्हेची हवा त्यानं पचवली होती. येथलं भयाण उनही, उन्हात अन् पाण्याशिवाय दिवसांवर दिवस रहायच, वेळ आली तर घोड्यावर झोपायचं, या वैराण प्रदेशात जीव तगवून ठेवण्याच्या सगळ्या युक्त्या त्याला ठाऊक होत्या. आत्महि सूर्याला शरीराचे शक्य तेवढे कमी भाग तापवायला देत, चेहरा खाली करून तो चालला होता. लगाम घोड्याच्या मानेवर सैल होता. आपलं सुरकुतलेलं शरीर म्हाताऱ्यानं मुरडून एवढंसं केलं होतं. डोळे मिटलेले होते. त्याच्या मनात काय होतं कुणास ठाऊक? सोनं मिळाल्यावर काय करायचं हे असेल. किंवा कुणी अडॅम्स नावाच्या माणसानं हे सोने पाहिले कळल्यावर त्याचे आपल्या लोकांनी डोळे काढले हे त्याला आठवत असेल. आपल्या हाती आलेला एक नकाशा! कातड्याच्या तुकड्यावर काढलेला. त्यावरचे लहान सुळक्यांचे डोंगर, एक लहान तलाव. एक उंचच उंच सुळका आणि सुळक्यामागे काढलेला सूर्य. त्यावरून ही जागा आपणास सापडेल असे त्याला खात्रीनं वाटत होते. त्याला तलाव आठवत असावा. फक्त सोने मिळाल्यावर आपल्या लोकांच्या तावडीत न सापडण्यासाठी त्याचे मनात बेत चालले असावेत, आणि त्याही आधी आपला पाठलाग कुणी करू नये व हाती घास येत असता हिसकावला जाऊ नये. आपल्याजवळचा नकाशा अडॅम्सचाच असावा ही त्याची खात्री होती. सोने पहाताच त्याने तो केला असावा. मग आपल्या लोकांनी पकडून त्याचे डोळे काढले असावेत. तो नकाशा ज्याच्या हाती आला त्याने नष्ट केला नसावा.

म्हाताऱ्याच्या मनात, घोड्यावर पेंगत जात असता आणखीही खूप विचार चालू असावेत. पण अचानक त्याची खाली असलेली मान एकदम ताठ झाली. वन्य प्राण्याइतकेच त्यांचे श्रवणेंद्रिय तिखट झाले होते. त्या कानानं टापांचा आवाज ऐकला होता. आपला पाठलाग होतोय त्याची खात्री झाली, त्याने इकडे तिकडे पाहिले, उन्हानं बेजार झालेले तट्टू कितीही हाणून उपयोग नव्हता. म्हाताऱ्याच्या मनात आलं. आणि ज्या टापा ऐकू येत होत्या त्या ताज्या दमदार घोड्याच्या होत्या, इकडे तिकडे पहाता पहाता एक लहानसा उंचवटा व शिळा त्याला दिसली, म्हाताऱ्यानं आपलं घोडं तिकडे वळवलं, घोड्यावरून उतरून तो शिळेआड झाला, त्याने बन्दूक काढली आणि सरसावून मागून येणाऱ्या स्वाराची वाट पहात बसला.

टापा जवळ आल्यावर म्हाताऱ्यानं मान वर करून डोकावलं, जांभळ्या पोषाखातला शेरिफ मॅकेन्ना त्यानं ओळखला. शेरीफचा बिल्ला इतक्या दुरूनही त्याच्या छातीवर चकाकताना दिसत होता, कुणीतरी आपल्या जवळच्या नकाशाची बातमी शेरिफ मॅकेन्नाला दिली! म्हाताऱ्याची खात्री पटली, त्याने पुन्हा शिळेवरून डोकावून पाहिले. मॅकेन्ना एकटा होता, नेम धरून त्यानं गोळी झाडली, त्याची गोळी हुकली. मॅकेन्नाला म्हातारा ओळखत होता. अतिशय धैर्यवान, सरळ असा तो शेरीफ होता. अनेक गुंडांना त्यानं पाणी चारले होते व आपल्या भागात कायद्याची आब राखली होती. आपणास तो सोन्याच्या मागे जाऊ देणार नाही ही त्याची खात्री होती. त्यानं मॅकेन्नावर गोळ्यांचा मारा सुरू ठेवला.

खाली उतरलेल्या मॅकन्नाला हा गोळीबार अनपेक्षीत होता. या रणरणत्या निर्मनुष्य भागात आपल्यावर गोळी येईल ही कल्पना त्याला नव्हती. पण गोळी येताच थंडपणे तो खाली उतरला आणि झटकन एका उंचवट्याआड घोडा नेऊन त्यानंही बंदूक सरसावली. मग ज्या उंचवट्या मागून गोळी आली तिला तो वळसा घालण्यासाठी निघाला. दबत दबत तो गोळी मारणाऱ्याच्या मागे येऊ

लागला. आपला शेरिफचा बिल्ला गोळी झाडणारास दिसला असलाच पाहिजे व तरीही गोळी आली त्याअर्थी हा कुणीतरी गुन्हेगार असला पाहिजे. गावात खून करून पळून आला असला पाहिजे. किंवा या भकास भागात तो आला त्याअर्थी येथील सोन्याच्या मागे तो असला पाहिजे. आणि सोन्याच्या मागे असणाऱ्या बद्दलचा आपला तिटकारा त्याला ठाऊक असला पाहिजे.

शेरीफ मॅकेन्ना आपल्या गर्द जांभळ्या सदऱ्यात एक उमदा पुरुष होता, उंच, तल्लख, नेमबाजीत निष्णात. त्याने अजून लग्न केले नव्हते. एखाद्या तरुणीबद्दल विचार करायला त्याला फुरसतच मिळाली नव्हती. त्याने आपले कार्यक्षेत्र ठरवले होते. काहीं माणसे कायदा मोडण्याच्या वृत्तीनेच जन्माला आलेली असतात. काही कायद्याचा अमल करायला जन्माला येतात. मॅकेन्ना शेरीफ न होता गुरे पाळता, शेती करता, एखादे उपहारगृह काढता तर त्याने खूप पैसा मिळवला असतता. पण जन्मसः तो सामाजिक माणूस होता. गुरांचे कळप असलेल्या प्रांतात, गुरे चोरणारे त्या धंद्याचा किती नाश करतात हे त्याने पाहिले होते. सोने सांपडलेल्या भागात जुगार, दारू व वेश्या यांचे थैमान असलेली गावे निर्माण झालेली त्याने पाहिली होती, कुटुंब वत्सल माणसांना अशा गावात राहणे गुंडांनी अशक्य केले होते. ही जी अमेरिका तयार होत होती ती त्याला नको होती. मनापासून सरळ व्यवसाय करणारे, मुलांबाळांना नीट शिकवण्याची इच्छा असणारे, अशा संसारी लोकांची उद्योगी गावे त्याला इथं वसलेली हवी होती. पण ती वसवण्यात गुंडांना तोंड देण्यास पुष्कळदा नागरिक अपुरे पडलेले त्यानं पाहिले होते. त्याचा आनंद गुंडांचे पारिपत्य करून या नागरिकांचे जीवन निर्वेध करण्यात होता. म्हणूनच या उजाड भागात सोने असले तर ते तसेच रहावे असे त्याला वाटत होते. आपल्यावर गोळी झाडणारा त्या सोन्याच्या मागे असलेला माथेफिरू आहे याची त्याला खात्री झाली होती. आपण अडवू म्हणून आपल्याला गोळी घालणारा तो माथेफिरू नव्हे तर काय ? सोन्याचे वेड माणसांना पशू कसे करते हे त्यानं पाहिले होते. सोने शोधण्यापायी सर्वस्व घालवून बसलेले, कायमचे व्यंग घेऊन आलेले आणि प्राणासही मुकलेले कितीतरी होते आणि सोने ज्यांना खरोखरीच मिळाले ते किती थोडे ! जर या साऱ्यांनी सरळ उद्योग-धंदा केला असता तर तेवढ्या श्रमांत, मिळालेल्या सोन्याच्या चौपट प्राप्ती त्यांना झाली असती. सोने हा नव्या वसणाऱ्या अमेरिकेला शाप होता.

वळसा घेऊन मॅकेन्ना गोळी झाडणाऱ्याच्या बगलेनं आला. म्हातारा गोंधळून उभा होता. शेरिफ कुठून येतोय त्याला कळेना. मग कळले पण उशीरा. झटकन वळून त्यानं गोळी झाडली. पण त्या आधी मॅकेन्नाच्या गोळीनं त्याचा वेध घेतला.

म्हातारा गोळी लागताच घोड्यावरून घसरू लागला मॅकेन्नानं पुढं होऊन त्याला सावरले. म्हातारा त्याला चांगला ठाऊक होता. तसा तो वाईट नव्हता. पण अनेकदा दारूनं झिंगून पडलेला दिसे. म्हाताऱ्याला उचलून मॅकेन्नानं उघड्यावर आणलं. त्याचा अंगरखा फाडून गोळी गेलेली जागा त्यानं पाहिली. जखमेतून रक्त उसळत होतं. ते बंद करण्यासाठी त्यानं तिथं बोळा दाबला. मग बुधल्यातील पाणी पाजले. काहीतरी गरम द्यायला हवे म्हणून त्याने चूल पेटवली. कॉफी करून त्यानं म्हाताऱ्याला पाजली. मग म्हाताऱ्याचे खिसे व पिशवी तो चाचपूं लागला. म्हाताऱ्याच्या खिशातला कातड्या-वरचा नकाशा त्याच्या हाताला लागला. नकाशा बाहेर काढून मॅकेन्ना घडी उलगडीत असता, म्हाताऱ्यानं डोळे उघडले. मॅकेन्नाच्या हातात आपला नकाशा पाहून तो म्हणाला,

'थांब मॅकेन्ना ! तो नकाशा पाहूसुद्धा नकोस. माझ्यावर कोसळला, तसा तुझ्यावर त्याचा शाप कोसळेल. या नकाशापायीच मी आत्ता मरतो आहे.'

पण मॅकेन्नानं नकाशा उलगडला. एकदा त्यावर नजर टाकली. खूपशा सुळक्यांच्या टेकड्यामध्ये एक तळे होते. तळ्यापासून दूर एकटा एक उंच सुळका होता. त्या सुळक्यामागे सूर्य दाखवला होता. एकदा नकाशा पाहून मॅकन्नानं तो चुलीत टाकला आणि म्हाताऱ्या-कडे पाहिलं. त्याच्या ध्यानात आलं; म्हाताऱ्याचा प्राण गेलेला आहे. वाकून त्यानं खात्री करून घेतली. त्याच्या मनात आलं, आयुष्याच्या शेवटी तरी बिचाऱ्याला सोन्याचा मोह किती वाईट हे कळले.

म्हाताऱ्याचा दफनविधी करण्याच्या उद्योगाला तो लागला. त्याला पुरण्यास त्यानं जागा शोधली आणि तो खड्डा खणू लागला. खड्डा खणताना नकाशात दाखविलेली जागा आठवीत होता. त्याला तो तलाव आठवला. तेथल्या घळी आणि तो एक उंच सुळका आठवला. पण तेथे सोने असेलच हे कुणी सांगावे. नकाशे पुष्कळ असतात.

तो म्हातारा रेडइंडियन नकाशा घेऊन सोने शोधायला निघालाय. ही बातमी तो या ओसाड भागात शिरला नसेल तोच भोव-तालच्या लोकात पसरली होती. कदाचित तेथल्या गिधाडापैकी एकानं येऊन ती सांगितली असावी. जितकी ही बातमी योग्य ठिकाणी पसरेल इतकं त्याला खाद्य मिळण्याचा संभव होता. आणि ती बातमी त्याच्या दृष्टीनं कोलोराडोला कळली हे त्याच्या दृष्टीनं किती योग्य झालं होतं.

कोलोराडो हा त्या भागातला प्रख्यात गुंड होता. त्याची टोळीच होती. प्रत्यक्ष काम करून पैसा मिळविण्यापेक्षा जे काम करतात त्यांची संपत्ती हिसकावणं हे सोपं असं त्याच्या लक्षात आलं होतं. पिस्तुलाच्या धाकावर हवं ते मिळविता येतं. लोक जिवाला फार भितात हे त्याच्या ध्यानात आलं होतं. जर एखादे दिवशी चार लोक अंगावर उलटून आले तर काय होईल असं त्याच्या मनात अनेकदा येई. मग आपण जिवाला भिऊन पळू. पण तसे चार नागरीक एकत्र येणं शक्य नव्हतं. आपला दमदाटीचा धंदा निर्वेध होता.

वेलबुट्टयांचं जरीचं काम केलेलं जाकिट, त्याचा आवडता पोषाख होता. तसा तो दिसायला रूबाबदार होता. मिशा पिळतांना अधिकच रुबाबदार दिसे. त्याची नेमबाजी उत्तम होती. तो ताकदवान, चपळ होता. त्याच्या व्यवसायात या गोष्टींची जरूरच होती. तो लहरी होता. कुणी त्याला फार उदार समजत. कुणी कमालीचा दुष्ट समजत. आपल्या तावडीत कुणी सापडला की तसाच तो दुष्टपणानं हसे. मग त्याच्या क्रूरपणाला सीमा नसे. सोन्याचे लोभी पुष्कळ असतात पण त्याच्या इतका लोभी कुणी नव्हता.

एक म्हातारा रेड इंडियन सोन्याच्या जागेचा नकाशा घेऊन निघालाय, एवढंच कळलं नाही तर शेरिफ मॅकेन्ना त्या दिशेने

निघाल्यावर तेही त्याला कळलं. पण मॅकेन्ना कुठं जातो यापेक्षा म्हातारा कुठं जातो हे कोलोराडोला जास्त महत्त्वाचं होतं. आपल्या टोळीला घेऊन म्हतारा ज्या हॉटेलात खाण्यापिण्यासाठी थांबे त्या हॉटेलात तो शिरला. म्हाताऱ्याची व हॉटेलवाल्याची दोस्ती त्याला ठाऊक होती. हॉटेलवाला उतारवयाचा होता. त्याला एक लग्नाची मुलगी होती. ती हॉटेलच्या कामात बापाला मदत करी. म्हातारा रेड इंडियन या छोटया कुटुंबाचा दोस्त होता. तो पुष्कळदा बाप–लेकीशी गप्पा मारताना दिसे. कधी रात्रीचाही मुक्काम करी. कोलोराडोची खात्री होती की म्हाताऱ्यानं निघण्यापूर्वी हॉटेलवाल्याला कुठं जातो सांगितलं असेल.

पण हॉटेलात शिरल्यावर एकदोन प्रश्नातच कोलोराडोच्या लक्षात आलं की हॉटेलवाल्याकडून आपल्याला हवी ती माहिती कळणार नाही. आपल्या मनासारखं कुणी वागलं नाही की कोलोराडोचा संताप चढे. आताही तो विलक्षण चिडला. एकेक मिनिट महत्त्वाचं होतं. प्रत्येक मिनिटाला पुढे गेलेला म्हतारा आणखी पुढे जात होता. कमरेचं पिस्तुल काढून कोलोराडोनं हॉटेलवाल्यावर धरलं तरीही तो बोलेना, तेव्हा त्यानं गोळी झाडली.

हा प्रकार पाहात असलेली मुलगी आपला बाप गोळी लागून पडत असता किंचाळत त्याच्याकडे गेली. गोळी वर्मी लागली होती व तिच्या बापाचा प्राण गेला होता. कोलोराडोच्या एकदम ध्यानात आलं की या मुलीचा आपल्याला उपयोग होईल. निदान तिला इथं मागे ठेऊन चालायचं नाही. शेरिफ किंवा गावातले लोकही आपल्या मागावर येतील. हिला नेल्यावर आपल्याला शेरिफला नि लोकांनाही नमवता येईल.

बापाच्या कलेवरावर पडून शोक करणाऱ्या लेकीला त्यानं हिसक्यासरशी उठवून बाहेर उभ्या असलेल्या घोडयाकडे ओढलं. आणि तिला एका घोडयावर घालून टोळीसह कोलोराडो म्हाताऱ्याच्या आणि सोन्याच्या मागे निघाला.

म्हाताऱ्याची वाट त्यानं बरोबर शोधून काढली आणि तो जेव्हा त्या ठिकाणी पोहोचला तेव्हा मॅकेन्ना म्हाताऱ्याचं प्रेत पुरण्यास खड्डा खणीत होता. त्या कामात तो असताच कोलोराडोच्या टोळीनं त्याला वेढलं. बंदुकीच्या धाकाखाली कोलोराडोनं त्याच्या कमरेतलं पिस्तुल काढून घेतलं. बंदुक घेतली. मग म्हाताऱ्याच्या प्रेताचे खिसे, याच्या तट्टावरच्या पिशव्या चाचपून पाहिल्या. त्याला हवा तो नकाशा मिळाला नाही तेव्हा तो मॅकेन्नाकडे वळला. मॅकेन्ना शांत उभा होता. त्याच्या शांतपणानं कोलोराडोचा राग अनावर झाला. 'नकाशा कोठे आहे?' विचारीत त्यानं निःशस्त्र मॅकेन्नाच्या तोंडावर ठोसे लगावले. त्याच्या पोटात लाथ हाणली. तरीही मॅकेन्ना बोलेना, तो एकदाच म्हणाला,

'नकाशाचं मला ठाऊक नाही.'

तेवढयात कोलोराडोची नजर चुलीकडे गेली आणि जवळजवळ राख झालेलं नकाशाचं कातडं त्याला दिसलं. दुष्ट स्वार्थी माणसासारखा कोलोराडोचा संताप होता. नकाशा जाळलेला दिसताच पडलेल्या मॅकेन्नाला त्यानं लाथेनं मारण्यास सुरुवात केली. मग जरा वेळाने तो शांत झाला. नकाशा जाळला असला तरी आपला हेतू अजून फसलेला नाही हे त्याच्या लक्षात आलं. नकाशा जाळण्याआधी मॅकेन्नानं पाहिला असणार. त्याच्या डोक्यातला तो नकाशा आपल्याला काढून घ्यावा लागणार इतकंच. सोने शोधण्यासाठी त्यालाच वाटाडया करावा.

मॅकेन्नाला घोडयावर बांधून कोलोराडो निघणार तोच त्याच्या टोळीतला एक रेड इंडियन जवान बंदूक सरसावून उभा राहिला. मॅकेन्नाच्या गोळीनं मेलेला म्हातारा तिथेच टाकून कोलोराडो निघालेला पाहून त्याने अडवलं होतं. मेलेला म्हातारा त्यांच्या जातीतला प्रमुख होता व त्याला मानानं पुरणं हे त्याचं कर्तव्य होतं. कोलोराडोजवळ गोऱ्यांबद्दलही माणुसकी नव्हती. रेड इंडियन लोकांना तो क्षुद्र मानी. म्हाताऱ्याचे प्रेत त्याने कुत्र्यासारखे टाकून जावे हे त्या रेड इंडियन तरुणाला आवडले नव्हते.

त्या तरुणानेच दिलेल्या दमामुळेच कोलोराडोने म्हाताऱ्याचं प्रेत बरोबर घेऊन ते मानानं त्याच्या गावाबाहेर पुरण्यासाठी संमती दिली. शिवाय त्याला आपल्या टोळीत भांडणे नको होती. त्याच्या मतानं रानटी माणसाचा तो एक मूर्ख हट्ट होता.

कोलोराडोच्या टोळीची छावणी या उजाड प्रदेशाच्या हद्दीवर पण गावापासूनही खूप दूर एका गुहेत होती. लहान उंचवटयात ही गुहा होती. भोवतालच्या झाडीत छपलेली होती. आपल्या टोळीच्या लोकांना इथे राहता यावे यासाठी सर्व सोयी गुहेत केलेल्या होत्या. एक रेडइंडियन तरुणी टोळीतील लोकांच्या खाण्यापिण्याकडे बघे. तिला मदतीला रेडइंडियन गडी होते. या गुहेतील एका भागात कैद्यासाठी तळघर केलेले होते. तळघरात उतरण्यासाठी वरून एक विवर तयार केले होते. या विवराच्या भोकावर मोठा वजनदार दगड ठेवलेला होता. एका रेडइंडियन जवानाकडे हा दगड उचलण्याचे किंवा ठेवण्याचे काम होते. कोलोराडो सधन गावकऱ्यांना इथे आणून डांबून ठेवून पैसे काढी.

मॅकेन्नाला बांधून कोलोराडो गुहेशी आला आणि तेथील मंडळींत धावपळ सुरू झाली. मॅकेन्नाला घोडयावरून उतरवून आत आणून एका खांबाला बांधण्यात आले, बांधल्यावर कोलोराडोने पुन्हा त्याला ठोसे लगावून विचारले–

'मॅकेन्ना! सोन्याची जागा दाखवणार की नाही?'

मॅकेन्नानं जोरानं नाही म्हणून मान हलवली. त्याचे डोळे गुहेतल्या अंधाराला सरावू लागले होते. कोलोराडोनं आपला जीव घेतला तरी सोन्याची जागा आपण त्याला दाखवणार नाही हे त्याच्या मनात पक्कं होतं. ज्या टोळीबद्दल तो ऐकत होता तिची गुप्त जागा त्या टोळीतील माणसं, कैद होऊन का होईना त्याला पहायला मिळाली होती. आपली येथून सुटका झाली की त्याचा उपयोग होईल. कोलोराडोच्या टोळीनं गावात उच्छाद मांडला होता. आपण येथून सुटू हा त्याला विश्वास वाटत होता.

पण अंधाराला डोळे सरावल्यावर कोपऱ्यात दुडपून पडलेली हॉटेलवाल्याची तरुण लेक त्यानं पाहिली तेव्हा मात्र तो चरकला. आपल्या फिरतीत अनेक वेळा त्या हॉटेलमध्ये त्यानं पेय घेतले होते.

तिचा बाप सरळमार्गी सच्छील माणूस होता. या लेकीशीही तो पुष्कळदा बोलला होता.

कोलोराडोनं रेडइंडियन तरुणीला खूण केली. तिनं हॉटेलवाल्याच्या

लेकीला हातातील खंजिरानं टोचून उभे केले वखजीर तिच्या पाठीशी लावून ती उभी राहिली. कोलोरोडो म्हणाला,–

'मॅकेन्ना ! जर तू सोन्याचे ठिकाण दाखवले नाहीस तर तिच्या पाठीत खंजीर जाईल.'

मॅकेन्ना म्हणाला,–

'तू हिला पळवून आणलीस ?'

'हो.'

'असं कुणाला पळवणं गुन्हा आहे. तुला याबद्दल शिक्षा होईल.'

कोलोराडो हसला. तो म्हणाला,

'इथं मी कायदा आहे. मी देईन तो न्याय. तू सोन्याची जागा सांग नाहीतर ही पोरगी नाहक मरेल.'

'हिच्या बापचं काय झालं ?'

कोलोराडो दुष्टपणानं पुन्हा हसला, म्हणाला, 'त्यानं माझ्यावर बंदूक उगारली. माझ्या इच्छेआड आलेला टिकत नाही.'

मॅकेन्नानं जरा विचार केला. हॉटेलवाल्याच्या लेकीचा झगा गुंडांशी मस्ती झाल्यानं फाटला होता. तिला यांनी धुळीत फेकली असावी. तिच्या अंगावरचे डाग सांगत होते आणि सर्वात म्हणजे ती भयंकर भेदरली होती. डोळे ताठ करून ती एकटक पहात होती.

कठोर नजरेनं मॅकेन्नानं कोलोराडोकडे पाहिलं. स्त्रियांना आणि मुलांना कुणी त्रास दिला की मॅकेन्नाचा संताप अनावर होत असे. अशी वेळ स्त्रीवर आली की जीवाची भीती बाजूला ठेवून तिला रक्षण दिलं पाहिजे असं त्याचं मत होतं. जर अशा वेळी स्त्रीच्या बाजूनं कुणी उभा राहिला नाही तर गुंडांचे फावेल आणि गावे उजाड होतील. त्याची हीही खात्री होती की कुणी अशा गुंडगिरीविरुद्ध छातीठोक उभा राहिला तर गुंडही वचकतील. काही करून या मुलीचे रक्षण करण्याचे त्यानं ठरवलं. तो म्हणाला–

'कोलोराडो ! तिला सोड. मी तुला सोन्याची जागा दाखवतो.'

आपला डाव यशस्वी झाल्याच्या आनंदानं कोलोराडो हसला.

'ठीक ! तुला शहाणपण आलं. पण तिला सोडणार नाही, उद्या आपण निघणार आहोत. ती आपल्याबरोबर राहील.'

गुहेत बंदिस्त अशी एकच जागा होती. कोलोराडोनं मॅकेन्नाला आणि हॉटेलवाल्याच्या मुलीला त्या जागेत कोंडून ठेवलं. मॅकेन्नाच्या दृष्टीनं ते बरचं झालं होतं. या मुलीला आता धीर देता येईल. शब्द बोलता येत नव्हता इतकी ती मुलगी भेदरली होती. तिला खोलीत टाकल्याची शुद्ध दिसत नव्हती. तिला आपलीही ओळख पटत नाही हे त्याच्या ध्यानात आलं. काही संबंध नसता तिला या संकटात पडावं लागलं याचं त्याला फार वाईट वाटलं. पूर्वी तिच्या बापाच्या हॉटेलात गेलं असता ती चटपट पदार्थ आणून देई–ती तल्लख होती. बाप तिला 'जो म्हणून हाक मारी. तिच नाव जोन होतं त्याला आठवलं. तिच्याजवळ जाऊन तो म्हणाला–' जोन ! मला ओळखलंस ? मी शेरिफ मॅकेन्ना ! बोल काहीतरी बोल. मी तुमच्या हॉटेलात रोज येत असे.'

पण तो जवळ येऊ लागताच ती भेदरून कोपऱ्यात गेली. मॅकेन्ना पुन्हा म्हणाला,–

'जोन ! मी शेरिफ मॅकेन्ना. नीट पहा. नीट पहा. मी या गुंडांपैकी नाही. मी तुला त्यांच्याहातून नक्की सोडवीन. जरा हिंमत धर.'

हळूहळू मॅकेन्नानं जोनला बोलतं केलं. प्रथम मॅकेन्नाचा विश्वास पटताच ती खूप रडली. मग तिनं कोलोराडो हॉटेलमध्ये आल्यापासून वडिलांना मारून आपल्याला धरून आणीपर्यंतची सर्व हकीगत सांगितली. आपण तिला कसं या संकटातून सोडवणार हे मॅकेन्नालाही ठाऊक नव्हतं. पण हिंमतीनं वागलं की संकटात वाट सुचते हे त्याला ठाऊक होतं. त्यानं जोनला धीर देऊन शांत केलं.

दोघे झोपली. मॅकेन्नाही थकला होता. या बंदिस्त जागेत रात्रीही संकट येईल ही त्याला कल्पना नव्हती. त्याला हे ठाऊक नव्हतं की कोलोराडो जरी सोन्याच्या लोभानं पेटलेला असला तरी त्याचे हस्तक किंवा नोकर यांच्या मनात सोन्याच्या लोभाबरोबर दुसरीही पापे असण्याचा संभव होता. तो ऐन झोपेत असता त्याच्या खोलीच्या तक्तपोशीच्या विवराचा दगड बाजूला झालेला त्याला कळला नाही आणि कोलोराडोचा रेडइंडियन जवान हस्तक त्यातून लोंबकळत खाली उतरल्याचेही ध्यानात आले नाही. जोनच्या किंकाळीने तो जागा झाला. रेडइंडियन जोनचा हात धरून तिला जवळ ओढीत होता. मॅकेन्नानं चपळाईनं उठून त्याच्या कमरेला मिठी मारली व त्याला ओढले.

रेडइंडियन जवान तयारीनं आला होता. त्यानं कमरेचा चाकू काढला. तेव्हा विळखा सोडून मॅकेन्नानं कमरेचा पट्टा सरसावीत बकलानं त्याला फटके देण्यास सुरुवात केली. या मारामारीचा शेवट होण्यापुर्वीच कोलोराडो दंगा ऐकून आत आला व त्याने रेडइंडियनला पिस्तुलाच्या धाकात आणले. रेडइंडियन जवान आला तसा परत उडी मारून विवरांत वर गेला व पुन्हा विवरावर दगड बसला.

मॅकेन्नाच्या ध्यानात आलं की या गुंडाबरोबर असतांना वाटेल ते संकट गुदरेल. त्यानंतर तो झोपला नाही. पहारा देत जागा राहिला.

येथे काहीही प्रसंग गुदरेल असं मॅकेन्नाला वाटलं होतं ते बरोबर होतं. सकाळी दोघांना बाहेर काढल्यावर कोलोराडोच्या लोकांनी निघायची संपूर्ण तयारी केलेली त्याला दिसली. घोडी, पाण्याच्या व दारूच्या बुधल्यांनी, अन्नधान्यांनी लादलेली होती. मॅकेन्नासाठी व जोनसाठी एक अशी दोन घोडी तयार होती. कुदळफावडी घेतलेली होती व सोने ठेवण्यासाठी पोती.

पण कोलोराडोला जे वाटत होतं की नकाशा नाही तरी नकाशा पाहिलेल्या मॅकेन्नानाला घेऊन सोने शोधण्याच्या आघाडीला आपण आहोत व कुणाला ते कळेपर्यंत सोनं पोत्यात भरून आणू ही बातमी सर्वत्र झाली होती. कोलोराडोसारख्या दुसऱ्या टोळ्या सावध झाल्या होत्या. त्यातल्या एका टोळीनं गुहेतून निघण्यापूर्वीच कोलोराडोला गाठले.

या टोळीचा प्रमुख होता एली वालाच. साधी पँट व सैलसा कोट आणि कलती फेल्टहॅट घातलेला माणूस साधा बँकेतला कारकून वाटावा असा होता. पण गुंडगिरीस तो तोडीसतोड होता. गुहेशी येताच त्याने कोलोराडोचा रस्ता रोखून धरला व दुरूनच तो ओरडला.

'कोलोराडो ! तुझा मित्र आलाय एली वालाच. मित्रांना घेऊन आलाय. सोने शोधायला तुला मदत करायला.'

कोलोराडोनं डोकावून बाहेर पाहिलं. समोर रस्त्यावर हातात पांढरे निशाण घेऊन एली वालाच उभा होता. एलीच्या मनातला

डाव त्याच्या लक्षात आला. सोन्याचं ठिकाण आपल्याला ठाऊक झालंय अशी त्याची कल्पना दिसते. आता तो आपली पाठ सोडणार नाही. सोन्यात हा वाटा आल्याचं कोलोराडोला मुळीच खपलं नाही. पण त्याला ठाऊक होतं की एली आपल्यावर दोस्ती लादल्याशिवाय राहणार नाही. त्याची माणसं बंदुका घेऊन छपून असतील. ती आपल्याला बाहेर पडू देणार नाहीत.

कोलोराडोनं मनातला राग गिळला. त्याने मॅकेन्नाला पुढे करीत म्हटलं,—

'आमच्या बरोबर कोण आहे बघ—वाटाडचा.'

'शेरिफ!' एली ओरडला. 'वावा! आता तर सगळं कायदेशीर होणार'

मॅकेन्ना ओरडून म्हणाला,—

'एली! मी इथं जुलमानं राहिलो आहे. जुलुमानं वाटाडचा झालो आहे.'

'ठीक ठीक.' एली म्हणाला, 'जुलुमानं आलास तरी सोनं मिळेल ना? तुझाही हिस्सा असेलच.'

'मी त्या सोन्याला हातही लावणार नाही. त्या सोन्यावर शाप आहे. आणि तिथं सोनं आहे हेही खोटं आहे.'

'शेरिफ! असल्या गोष्टींवर तुझा विश्वास आहे?'

'होय! या सोन्यापायी एक म्हातारा मेला. एकाचे डोळे गेले.'

एली जोरानं हसू लागला. म्हणाला,—

'हो! तो डोळे गेलेला ॲडॅम्स आमच्याबरोबर आहे. डोळे जाऊनही त्याची सोन्यावरची श्रद्धा गेलेली नाही. एकदा त्याने ते सोने पाहिले आहे, आता त्याला ते स्पर्श करून बघायची इच्छा झाली आहे. खरं म्हणजे त्याची इच्छा पुरी करायला मी तुमच्यात आलो आहे. काय, कोलोराडो, आंधळचाची इच्छा पुरी करणार का? आम्ही आत येऊ का?'

एली बोलत असता झाडात लपलेला त्याचा एक माणूस पुढे येऊन दोन पिस्तुले रोखून उभा राहिला होता. कोलोराडोने एलीला आत येण्याची खूण करताच आपले काम झाले असे समजून तो वळला. वळताच कोलोराडोनं कमरेचं पिस्तुल काढून त्याच्या पाठीत गोळचा घातल्या.

एलीला तो म्हणाला,—'एली! हा माझा माणूस फितूर होऊन तुझ्याकडे आला व मी सोन्यामागे निघाल्याची वर्दी त्यानंच तुला दिली. हा तुझ्याशीही उद्या फितुरी करील म्हणून मी त्याला मारला. तुझी हरकत नाही ना?' पण एलीला त्याचं काही वाटलं नव्हतंच. तो जरा उर्मट झालाच होता,' हा खून पहात असलेल्या मॅकेन्नाच्या मात्र मनात आलं—सोने सापडण्याच्या आधीच यांच्यात खून होऊ लागले. आणखीही होतील. एली आला ते बरंच झालं. त्याला जोनसह आपली सुटका होणार याची खात्री वाटू लागली.

एली आत आल्यावर गुहेसमोर उघडचावर एक छोटं संमेलनच झालं. एलीनं आपल्याबरोबर विविध माणसांचा संग्रह आणला होता. त्यानं एकेकाची त्याच्या कर्तबगारीसह ओळख करून दिली. त्यातला एक संपादक असतो, दोन शिकारी असतात, एक पाद्री असतो आणि सोने पाहून आल्यावर रेडइंडियनांनी डोळे काढलेला ॲडॅम्स असतो. पाद्री मोठी तत्त्वे सांगतो. आणि ॲडॅम्सने सोने पाहिल्याची हकीगत सांगून सर्वांना नवा त्वेष आणला, त्यातील तरुण लोकांना तर तो देव वाटू लागला.

मॅकेन्ना मात्र थंड राहिला होता. सोने सापडेल याच्यावर त्याचा विश्वास नव्हता. एलीनं बरोबर आणलेल्या शहरी लोकांबद्दल तर त्याला कीव वाटू लागली. उन्हातान्हात तडफडत हे हकनाहक मरणार. आणि तसे मेले नाहीत तर हे गुंड त्यांना मारणार. गप्पा संपून सर्वजण निघाले तेव्हा त्याला रहावले नाही. एलीबरोबरच्या शिकाऱ्यांजवळ जाऊन तो त्यांना म्हणाल,—'सोने वगैरे काही नाही. सगळे थोतांड आहे. तुम्ही भलत्या ठिकाणी येऊन पडला आहात. अजून वेळ गेली नाही; अशीच घोडी वळवून आपल्या घरी जा. हे सगळे गुंड जमले आहेत.'

पण चांगला सल्ला ऐकण्याच्या स्थितीत ते नव्हते. ते फक्त हसले. आणि एकही मागे न फिरता सोन्याचा शोध सुरू झाला.

सोन्याकडचा या मंडळींचा प्रवास सुखाचा होणार नाही याची चिन्हे दिसू लागली. एलीनं शहरातून आणलेला पाद्री, बातमीदार, शिकारी मंडळी या उन्हातान्हातल्या प्रवासाला सरावलेली नव्हती. पाद्रचाला जेव्हा तू सोन्यामागे का? असं विचारलं तेव्हा त्यानं आधी सांगितलं होतं की रोममध्ये सोन्याचे चर्च होते तसे अमेरिकेत या सोन्याचे चर्च आपण बांधणार आहोत. जेव्हा काही वेळानं कोलोराडोच्या मागे लागलेल्या पोलिसांनी हल्ला केला तेव्हा त्याचा बळी पडला. पोलिसांचा प्रमुख सावालास हा अतिशय धूर्त माणूस होता. कोलोराडो व एली या गुंडाबरोबर काही साधे नागरिक बघून त्याला नवल वाटले. मॅकेन्नाही त्यांच्याबरोबर का हे त्याला कळेना. तो नेहमी बोडका असे व त्याने केस साफ तासून गोटा केलेला होता. आडव्या देहाचा, रुंद हाडाचा, जरा क्रूर असा तो माणूस होता. कोलोराडोनं जोनच्या बापाचा खून केला व आपण त्याला पकडायला आलो आहोत हे खरे. पण ही शहरी माणसे का?

लौकरच त्याला हे कोडे सुटले. हे दोन गुंड सोन्याच्या शोधाला निघाले आहेत. आणि सोन्याच्या जागेचा पत्ता त्यांना लागला नसला तरी नकाशा मिळालेला आहे. सोन्याच्या मागे जाणाऱ्या दोन गुंडांप्रमाणेच या पोलीसप्रमुखाच्या डोक्यात सोन्याचे विचार सुरू झाले.

पोलिसांच्या हल्ल्यांतून जखमी न होता किंवा जीव न जाता जे राहिले ते पुढे निघाले. आपल्या प्रदेशांतील सोन्याच्या साठचामागे ही टोळी निघालेली आहे हे रेडइंडियन लोकांना कळले होते. सात आठशे वर्षांपूर्वीपासून हा सोन्याचा साठा त्यांना ठाऊक होता. त्यांच्या पूर्वजांनी त्यातले सोने देवळाच्या शोभेसाठी आणलेही होते. त्यांच्यापैकी अगदी निवडक पुढाऱ्यांना ती जागा ठाऊक होती आणि पुढे गोरे लोक आल्यावर तर त्यांनी ती अधिकच गुप्त ठेवली. फक्त दोघा गोऱ्यांनी ती जागा पाहिली होती व दोघांचा शेवट वाईट झाला होता. यापुढे कुणाही गोऱ्या माणसाला तिथे येऊ द्यावयाचे नाही हा त्यांचा निश्चय झाला होता.

त्या निश्चयापोटी कोलोराडोला अडविण्यासाठी रेडइंडियनांनी त्यांच्यावर हल्ला केला. शिपायांच्या हल्ल्यापेक्षा हा फार निर्घृण होता. रेडइंडियन लोक कधी समोरून एका बाजूनं शत्रूवर येत नसत. शत्रूभोवती संपूर्ण फेऱ्या घालीत, फेरे आवळीत ते हल्ला करीत. हल्ला करतांना जेवढा ओरडा करता येईल तेवढा करीत. वेगाने

शत्रूच्या छावणी भोवती घोडी नेत ते घोड्याच्या एका बाजूला शरीर उलटे टांगून घोड्यांच्या पोटाखालून शत्रूवर बाण मारीत किंवा गोळ्या झाडीत जात. शत्रू मध्ये गर्दी करून असल्यानं कुणाला ना कुणाला तरी नेम लागेच. पण ते स्वतः वेगाने धावत असल्यानं शत्रूचा नेम चुके.

यावेळीही त्याच तऱ्हेचा हल्ला करून कोलोरॅडो व त्याच्या बरोबरीच्या लोकांना त्यांनी म्हणता म्हणता उधळून लावले. एली बरोबरचे अननुभवी घाबरून सरळ रेडइंडियनांच्या माऱ्यात गेले. भराभर एकेक छातीत घुसलेल्या बाणाशी झगडत घोड्यावरून कोसळू लागला. त्यांचा सोन्याचा शोध इथंच संपला.

या धुमाळींत सुटून जाण्यास योग्य संधी आहे. असे पाहून मॅकेन्नानं जोनच्या घोड्याचा लगाम धरला. जिकडे थोडीशी वाट दिसली तिकडे तो वळवून त्यानं आपला व तिचा दोन्ही घोडे जोरात सोडले. मागे न पहाता रेडइंडियनांची फळी फोडून दोघं तुफान निघाली.

पण तोपर्यंत रेडइंडियन आपली शेवटची भीषण फेरी मारून परत फिरले होते. टोळी पैकी कोलोराडो, एली, रेडइंडियन जवान एवढेच काय ते वाचले होते.

हल्ल्याची दंगल चालू असता कोलोराडोचं लक्ष मॅकेन्नाकडे होतं. धमालीचा फायदा घेऊन तो पळून जाण्याचा प्रयत्न करणार. रेडइंडियन जाताच त्याने चौफेर नजर टाकली आणि एका दिशेला काही अंतरावर त्याला जोन दिसली.

त्याने एलीला खूण करून घोडा मॅकेन्नामागे सोडला. त्याच्या तेज घोड्यास ते अंतर कापण्यास फार वेळ लागला नाही. मॅकेन्ना एकटा असता तर त्याला सापडला नसता. पण जोन बसलेलं तट्टू अगदी ओझे वाहण्याच्या कामाचं होतं. एली, कोलोराडो आणि रेडइंडियन जवान तिघानी त्यांना घेरलं. पुनः ते कैद होऊन सोन्याची वाट चालू लागले.

आतापर्यंत माणसानी ओढवलेल्या संकटाला ते तोंड देत होते. आता खळाळती नदी समोर उभी राहिली. त्यांना वाटलं होतं तसा त्यांचा पाठलाग अजून संपला नव्हता. ते नदीकडे वळताच रेडइंडियनही त्यांच्या मागे लागले. ते नदीकाठी पोहोचले तोच त्यांच्या मागून आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. मॅकेन्नानं कोलोराडोला आपल्याला आपली बंदूक परत देण्यास सांगितलं. पण त्यानं ती दिली नाही. रेडइंडियन लोकांच्या हातून वाचण्यास तरी ती हवी होती. मॅकेन्नाला ठाऊक होतं की आपण रेडइंडियनांच्या ताब्यात सापडलो की, ते तिथल्या तिथं आपल्याला ठार मारतील. त्यांच्या म्हाताऱ्या पुढाऱ्याला आपण मारलं होतं. त्यांचा तो राग होता. म्हाताऱ्यानं आधी आपणावर गोळी झाडली. हे त्यांना सांगायलाही ते सवड देणार नाहीत. शिवाय सोन्याच्या जागेकडे चाललेल्या टोळीबरोबर आपण सोने लुटायला चाललो आहोत असा ते अर्थ घेतील. त्यांची तीही गैरसमजूत दूर करता येणार नाही.

सगळे नदी काठावर आले. नदीला पाणी खूप होतं आणि ते भोवरे करीत खळाळत वहात होतं. सुदैवानं तीरावर एक तराफा उभा होता. दौडत आणलेले घोडे तसेच त्यांनी तराफ्यावर चढवले, रेडइंडियन जवानानं दोर तोडला आ'ण वावटळीत सापडावा तसा तराफा पाण्यातून निघाला—हेलकावत. घोडे गांगरून मस्ती करू लागले. रेडइंडियनांनी तीरावरून सोडलेला एक बाण एका घोड्याला लागला. वेदनेनं घोडा नाचू लागताच तराफा कलंडू लागला. कसेतरी ते समोरच्या किनाऱ्यावर पोहोचले. रेडइंडियन्स परत फिरले. मॅकेन्नाची खात्री होती की पाणी कमी असलेल्या जागेकडून ते नदी ओलांडून परत हल्ला करतील.

त्यांचा रात्रीचा मुक्काम डोंगरात कोंडलेल्या एका तळ्यावर पडला. ते तळे सापडताच कोलोराडो खूश झाला. सोन्याच्या जागेजवळ तळे होते. तेव्हा रस्ता चुकलेला नव्हता. ते तळ्यापाशी पोहचले तेव्हा सूर्य कलला होता. दिवसभराच्या उन्हातान्हांतनं झालेल्या धावपळीमुळे तळ्याचे ते निळेकाळे पाणी पाहताच मॅकेन्नाला शांत वाटलं. त्याने कपडे काढले आणि तो जोनला घेऊन तळ्याकडे निघाला. मागोमाग रेडइंडियन मुलगीही आली. तिघे पाण्यात उतरले.

इतरवेळी मॅकेन्नाच्या जी गोष्ट सहज लक्षात आली असती ती आता आली नाही. रेडइंडियन मुलगीही जोनबरोबर पाण्यात उतरली होती. मॅकेन्ना अंगावरील धूळ घासून काढीत होता. तेवढ्यात जोनची धडपड त्यानं ऐकली. पाण्याखाली बुडी घेतल्यावर जोनवर रेडइंडियन पोरीनं हल्ला केला होता व तिला पाण्यातच दाबून ठेवून मारायचा यत्न करीत होती. एका झेपेसरशी मॅकेन्नानं पाण्यात सूर मारला आणि रेडइंडियन मुलीला पाण्यात ढकलून जोनची सुटका केली.

जळफळत रेडइंडियन मुलगी पाण्याबाहेर येऊन पोशाख बदलण्यास गेली. तिचा जोनवर हल्ला हे मॅकेन्नाला नवल होतं. आपल्यावर डोळा असल्यानं ती जोनचा मत्सर करीत असेल हे त्याच्या स्वप्नातही नव्हतं. आता तिच्यावरही नजर ठेवायला हवी. त्याला या प्रवासातला एक प्रसंग आठवला. जेव्हा उन्हानं बेजार होऊन तहानेनं व्याकूळ झाल्यावर जोन घोड्यावरून कोसळली तेव्हा कोलोराडोनं 'मरू दे तिला' म्हणत घोडा पुढे नेला. त्यावेळी रेडइंडियन मुलीनंही जोनकडे तुच्छतेनं पाहून घोडा दामटला होता. आपण जोनसाठी थांबलो ते तिला आवडलं नव्हतं. आपण थांबल्यावर कोलोराडोनं आपल्यावर पिस्तुल उगारलं. आपण पिस्तुलाची पर्वा न करता जोनशी वाकून तिला वर उचललं. कोलोराडोला म्हटलं, 'तू हवं तर पिस्तुल झाड. पण मग सोन्याचा शोध इथंच संपेल. जोनला घेतल्याशिवाय मी पुढे जाणार नाही.'

मग जोनला आपण आपल्या बुधल्यांतलं पाणी पाजलं, सावध केलं. धीर देऊन तिला बरोबर घेतलं. जोनची आपण काळजी घेत होतो व रेडइंडियन पोरगी जळफळत पहात होती—तेव्हापासूनच तिच्या मनात मत्सर जागा झाला होता. आता त्यानं रात्रभर सावध रहाण्याचं ठरवलं.

जोनचं सर्वदृष्टीनं संरक्षण करायला त्याला जागं रहायलाच हवं होतं. कारण फक्त कोलोराडो असा होता की ज्याला सोन्याशिवाय लोभ नव्हता. पण त्याच्या भोवतालच्या माणसांच्या इतर वासनाही पेटलेल्या होत्या. त्याला वाटू लागलं काही करून सोन्याच्या जागी पोहोचण्यापूर्वी जोनची इथून सुटका झाली पाहिजे. मध्ये फक्त ही रात्र होती. पहाटे निघून नकाशातील जागेशी ते सूर्योदयाला पोहोचणार होते. नकाशा अनेक नकाशांप्रमाणे खोटा निघणार व सोने असणार नाही ही त्याला खात्री होती. आणि तेथे गेल्यावर सोने मिळाले

नाही की चिडलेला कोलोराडो आपल्याला व जोनला गोळ्या घालून मारणार हे नक्की होतं. ही रात्र वैऱ्याची होती. रात्रीच्या अंधारात जोनला सोडवून नेण्याचा विचार त्याच्या मनात आला. पण रेड-इंडियन जवानाचा पहारा चुकवून निशस्त्र असता जाणं शक्य नव्हतं.

अजून अंधार पडला नव्हता. इतक्यात पहाऱ्यावरचा रेड इंडियन तरुण धावत आला नि त्यानं सैनिक येत असल्याचं सांगितलं. कोलोराडो, एली, मॅकेन्ना जरा पुढे होऊन पाहू लागले. खरोखरच सैनिक येत होते. पण कोलोराडोवर पहिला हल्ला झाला तेवढे नव्हते. फक्त तिघे होते. गुंड म्हणून कोलोराडोला पकडायला निघालेला टेली सावालास होता. तिरप्या उन्हात त्याचं मुंडण केलेलं डोकं चकाकत होतं व त्याच्याबरोबर फक्त दोन शिपाई होते. सावालासनं फक्त दोन सैनिकांनिशी यावं याचं मॅकेन्नाला नवल वाटलं. एकतर तो खरा धैर्यवान असला पाहिजे किंवा पहिल्या हल्ल्यात कोलोराडोचे सर्व साथीदार मारले असे त्याला वाटत असावे. काही असो तो आला आहे व आपण त्याचा फायदा घेतला पाहिजे. तो कोलोराडोला म्हणाला,–

'जोनला मी सावालासकडे धाडून देतोय. तिचे फार हाल झाले आहेत. तो एका सैनिकाची सोबत देऊन तिला परत सुखरूप धाडील. मी सोन्याची जागा येईपर्यंत इथं आहेच ओलीस. पुढची वाट कठीण असल्यास तिची अडचणही होईल.'

कोलोराडोनं जरा विचार केला. जोनची आता खरी अडचणच होती. शिवाय सावालास हल्ला करणार असला तर त्याचा तेवढाच एक सैनिक कमी झाला. तो म्हणाला,–

'ठीक आहे जाऊ दे तिला.'

मॅकेन्नाने तिला जायला सांगितले. ती टेकाड उतरून जाताच मॅकेन्ना म्हणाला,–

'कोलोराडो! माझी बंदुक मला परत दे. हल्ला आला तर माझा उपयोग होईल. आणि तशीच गोळी खाऊन मरण्याची माझी इच्छा नाही.'

कोलोराडो म्हणाला, 'ठरल्याप्रमाणे सोन्याची जागा दाखवलीस की हत्यार देईन. हल्ला आला तर आम्ही तिघे पुरे आहोत.'

आता जोन सावालासपर्यंत जाऊन पोहोचली होती. मूक सिनेमा पहावा तसे ते दिसत होते. मागे वळून जोननं मॅकेन्नाकडे निरोपाचा हात केला. मग ती सावालासला आपणास कसे परत धाडले हे सांगू लागली असावी. सावालासने ते ऐकून घेतले. मग त्याने दोन शिपायांकडे वळून काहीतरी हुकूम सोडला. शिपाई वळले. जोनही वळून त्या शिपायांमागे जाऊ लागली. तेवढ्यात सावालासनं पिस्तुल काढलं आणि पिस्तुलाचे दोन बार कानावर येण्याआधीच दोन्ही शिपाई घोड्यावरून खाली कोसळले. सावालासनं आपला घोडा वळवीत जोनला काहीतरी म्हटलं. मग तिच्या बुजलेल्या घोड्याचा लगाम धरून त्याचंही तोंड वळवीत तो जोनला घेऊन येऊ लागला.

टेकडावरून पाहणाऱ्यांना हे नाटक काय झाले हे कळेना. सावालास टेकाड चढून वर येण्याची वाट पहात ते थांबले. हा प्रकार पाहून सर्व तऱ्हेचा कृतघ्नपणा केलेला कोलोराडोही थक्क झाला. टेकाड चढून आलेला सावालास लांबून म्हणाला,–

'कोलोराडो! मी तुमच्यांत सामील व्हावयाला आलोय. आणखी एक भागीदार आल्यानं सोनं काही कमी होणार नाही.'

जोनला पुढे घालून तो येत होता. डोळ्यासमोर घडलेल्या भीषण खुनांनी ती सुन्न झाली होती. मॅकेन्नानं पुढं होऊन तिला जवळ घेतले. सावालास म्हणाला,–

कोलोराडो! तुझ्यामागे तू निघाल्यापासून मी आहे. पण एवढा मोठा लवाजमा घेऊन तू निघाला होतास! आता तो कमी झाला हे बरे झाले, बाजारबुणग्यांचा या कामात काय उपयोग. मी तुझा घेतलेला माग अधिकाऱ्यांना कळवा असं मिष करून प्रत्येक मुक्कामाला दोन दोन शिपाई परत धाडीत आलो. शेवटचे दोन शिपाई परत गेले असते तर मी एकटा का राहिलो याचा संशय त्यांना आला असता. म्हणून त्यांना मी ठार केले.'

मग भोवताली पहात तो म्हणाला, 'कोण कोण आहेत इथं? वा! नाकानं कांदे सोलणारा मॅकेन्नाही सोन्यामागे आहे. सोन्याचा लोभ कुणाला सुटलाय!'

मॅकेन्ना म्हणाला,

'मी फक्त वाट दाखवायला आहे आणि हिचं रक्षण करायला. सोन्याची जागा दाखवली की कोलोराडो माझी बंदूक मला परत देणार आहे व जोनला घेऊन मी परत जाणार आहे.'

'ठीक? तेवढाच एक भागीदार कमी झाला. काय कोलोराडो मी तुमच्यात आलो समजू ना.'

'होय! आणखी एकानं काही होणार नाही.'

रेडइंडियन जवानाला पहाऱ्याला ठेवून सर्व मंडळी उघडचावर आपापल्या आवडीप्रमाणे जागा शोधून झोपली. मॅकेन्नानं एका कातळावर अंथरूण पसरलं. पलीकडे काही अंतरावर जोनला जागा करून दिली. त्यापलीकडे रेडइंडियन तरुणी झोपली. दिवसभराच्या कष्टानं सारेच थकले होते. आडवे होताच सर्वजण निद्रेच्या आधीन झाले.

मॅकेन्ना अपरात्री दचकून जागा झाला. अंथरुणावरून उठून बसला तो इकडे तिकडे पाहू लागला. दुसऱ्या क्षणाला तो ताडकन उठला. जोन झोपली होती तिथं हालचाल झाली होती. एका उडीसरशी तो जोनजवळ गेला आणि जोनला चाकू मारण्यास उगारलेला रेडइंडियन तरुणीचा हात त्याने वरच्यावर धरला. एका धक्क्यासरशी त्याने तिला दूर लोटले. तेवढ्यात गडबड ऐकून जागा झालेले कोलोराडो, सावालास, एली धावत आले होते. कोलोराडोने रेडइंडियन तरुणीला तिच्या या तसल्या उपद्व्यापाबद्दल शिव्या घातल्या.

त्यानंतर अवसेस उठून निघेपर्यंत काही झाले नाही. पहाटे-आधीच्या अंधारातच सगळी मंडळी स्वार झाली. सूर्योदयाच्या आधी नकाशात दाखवलेल्या सुळक्याच्या पायथ्याशी त्यांना पोहोचावयाचं होतं. तिथे सूर्योदयाचे वेळी काय घडेल याची मॅकेन्नाला कल्पना नव्हती. पण म्हाताऱ्याजवळच्या त्या नकाशात सुळक्याशी सूर्य उगवलेला दाखवला होता. नकाशात सूर्य कुणी दाखवीत नाही. नकाशातला तेवढाच मुद्दा मॅकेन्नाला विचित्र वाटत होता. त्या सोन्याच्या जागेशी सूर्योदयाचा काहीतरी संबंध आहे एवढे त्याला सारखे वाटत होते. बघू या! तिथं गेल्यावर काय ते ठरेल.

सगळे पहाटेला सुळक्याच्या पायथ्याशी येऊन पोहोचले. त्यांच्या हाताना उघडे बोडके डोंगर होते. आणि फुललेल्या आकाशावर

त्यांची शिखरे काळी दिसत होती. खडकामातीच्या या दरीत पक्षीसुद्धा नव्हता. वाराही थांबला होता. इतका ध्वनीहीन भाग पृथ्वीवर अन्य कोठे नसेल. मॅकेन्नाच्या मनात आलं जणू उघडे बोडके डोंगर व जमीन, तापण्यासाठी सूर्याची वाट पहात होते.

हळूहळू प्रकाश वाढू लागला. काळं आकाश रंग घेऊ लागलं. डोंगरांचा रंग उजळ होऊ लागला. श्वास रोखून सर्वांच्या नजरा सुळक्याकडे होत्या. सुळक्यामागचे आकाश पिवळे झाले. मॅकेन्ना स्वतःशीच हसत म्हणाला–हेच ते सोने. मग तेवढे आकाश पांढरे पडू लागले. सूर्य सुळक्याकडे चढू लागला. आता दूरदूरच्या डोंगरांवर उन्हाचे कवडसे दिसू लागले. उन्हे डोंगरावरून खाली उतरू लागली. प्रदेशाचा भकासपणा उघड होऊ लागला. पण अजून सावल्यांमुळे डोळ्यांना त्रासदायक वाटत नव्हता. सावल्या बुटक्या बुटक्या होऊ लागल्या. आता सूर्य सुळक्याशी येऊन पोहोचला होता. सर्व नजरा ताठ होऊन पहात होत्या. एकदम सगळ्या सावल्या धुतल्या गेल्या. लखकन सर्व दरी उन्हानं पेटून निघाली. दिपलेल्या डोळ्यांनी सूर्याकडील नजरा काढल्या. दरीत फक्त एकच सावली उरली होती. त्या उंच सुळक्याची लांबलचक काळीभोर, आणि पाहता पाहता ती सावली धावू लागली. कुणी मागे लागावं असं धावत सावली पळू लागली. तिनं सपाट दरीचा मधला भाग ओलांडला आणि ती बाजूच्या डोंगरावर चढू लागली. आणि ती तशी चढताना पाहताच मॅकेन्नाच्या लक्षात नकाशातील सूर्याचे मर्म आले. तो सावलीमागे धावू लागला. सगळे त्याच्या मागे धावत निघाले.

सावली अर्ध्या डोंगरावर येऊन कुणी अडवावं तशी थांबली आणि सूर्य पुरता सुळक्यावर आला. सावली पुढे धावत आली त्याहून अधिक वेगानं मागे पळत नाहीशी झाली.

सावली थांबली ती जागा मॅकेन्नानं लक्षात ठेवली होती. धापा टाकीत तिथे सर्व पोहोचले. सावली थांबली तिथं डोंगरात एक विवर होतं. खालून कुणालाही ते कळणं शक्य नव्हतं. मॅकेन्नामागे सर्व त्या विवरात शिरले.

विवर आरपार होतं. सर्वांना घोड्यांवरून उतरावं लागलं इतकं ते बुटकं होतं. जागोजागी माती कोसळली होती. कातळ पुढे आले होते. त्यातून वाट काढीत सारे पलीकडे गेले. आता डोंगराच्या बाजूनं रस्ता पुढे गेला होता. एका बाजूला दरी होती आणि चहूबाजूला डोंगर होते. हळूहळू रस्ता उतरू लागला. सर्वांना सोने पहाण्याची घाई झाली होती. पण घोडी हळू चालवावी लागत होती.

सोन्याच्या लोभापेक्षा रेड इंडियन मुलीला, मॅकेन्नाचा मोह अधिक असावा, दोन वेळा तिनं आपल्या मार्गातला जोनचा काटा काढण्याचा यत्न केला होता. आता डाव्या हाताची खोल दरी पहाताच पुनः तिचा मत्सर उसळून आला. त्या दोघी बाजूबाजूनं जात होत्या. एकदम तिनं जोनला पुढे घातलं आणि हातातील चाबकाचा विळखा तिच्याभोवती घालण्याचा यत्न केला. मग तिच्याशी येऊन ती तिला घोड्यावरून कड्याखाली लोटण्याचा प्रयत्न करू लागली. जोननं तिच्या हातातला चाबूक ओढला. तिच्या लक्षात आलं की, या मारामारीत कुणीतरी एक कड्याखाली जाणार. तिनं रेड इंडियन मुलीला गच्च धरलं आणि आपला घोडा वळवून तिला लोटण्यास सुरुवात केली. बाकीच्या घोडेस्वारांबरोबर मॅकेन्ना पुढे गेला होता. आपल्या बळावरच हे द्वंद्व जिंकावं लागणार हे जोनच्या ध्यानात आलं. तिनं जोरानं रेड इंडियन मुलीला धक्का दिला. आपण जोनला सहज ढकलू या आवेशात असल्यानं जोनच्या धक्क्यानं तिचा तोल गेला. ती खोगीराला धरून तोल सांभाळायला पाहू लागली. जोननं खोगीराचे तिचे हात सोडवले व लकटून दिले.

मग मात्र आपल्या हातून काय झाले याची कल्पना येऊन ती सुन्न होऊन ऐकत उभी राहिली. कड्याखाली गेलेल्या रेड इंडियन मुलीचा आवाजही ऐकू आला नाही. थरथर कापत जोन घोड्यावर चढली. आणि पुढे गेलेल्यांना तिनं गाठलं.

मागे कुणाचं काय काय झालं हे बघण्याची शुद्ध कोलोराडोला किंवा कोणालाच राहिली नव्हती. घोडे भराभर वळणं घेत उतारावरून उतरत घळीकडे चालले होते. अजून पायथ्याचा भाग दिसत नव्हता. दुरून इथे ओढा वहात येत असावा असा भास होत होता, पण तो ओढा कोरडा होता. पावलापावलाला जो तो उत्सुकतेनं इकडे तिकडे पहात होता.

एकदम उतार थांबला आणि समोर उंच गेलेले डोंगर उभे राहिले. सर्वांनी नजरा तिकडे केल्या आणि सारेच पुतळ्यासारखे स्तब्ध उभे राहिले. समोरच्या डोंगराचा पायथ्याचे भाग उन्हात सोन्याचं तेज दाखवीत लखाकत होते. उन त्या भागावर कुठेही ठरत नव्हते. तलवारीवर तळपावं तसं ते तिथल्या सोन्याच्या भिंतीवर तळपत होतं. डोंगराच्या पायथ्यापर्यंत सपाट माती होती. आणि ती मातीही सोन्यानं भरलेली होती.

या देखाव्यानं स्तब्ध झालेले हे माणसांचे पुतळे दुसऱ्या क्षणाला जिवंत झाले. सोने ! एकजण मोठ्यानं ओरडला. घोड्यांना टाचा दिल्या गेल्या आणि मधल्या मातीवरून उसळी घेत घोडी सोन्याच्या धुळींतून सोने उधळीत चालू लागली. त्यांचे पाय सोन्याचे झाले, केसांवर सोनेरी रंग चढले आणि त्यावरील स्वार उड्या मारून खाली उतरले व सोन्याची धूळ अंगावर घेऊ लागले. ते आणखी पुढे गेले. इथं वरून आलेला ओढा ओला होता आणि चिखल सोन्याच्या होता. त्या चिखलातून जात असता सगळे सोन्यानी बरबटले. कोलोराडो आरोळ्या ठोकू लागला. एली आनंदाने बेहोष झाली. कॅप्टनही..

आणि मग जो तो जागा निवडून ओढ्यापलीकडे गेला आणि सोन्याचे दगड वेचून घोड्यावरच्या पिशवीत भरू लागला सोन्यापायी इतक्या संकटात सापडलेली जोन, सोन्यानं पिवळी होताच वेडी झाली. तिनं मॅकेन्नाच्या गळ्याला मिठी मारून म्हटलं,

" बघ ! बघ ! आता आपल्याला हवं ते करता येईल. या सोन्यानं जग विकत घेऊ. "

मॅकेन्ना सगळ्यांचे हर्ष पहात शांत होता. त्यानं तिचे गळ्यातले हात काढीत म्हटले,

' जोन ! वेडी होऊ नको. आठव या सोन्यापायी किती लोक मेले. तुझ्यावर काय काय प्रसंग गुदरले आठव. सोन्याचा मोह सोड.,

तो हे बोलत असताच कुणीतरी वेदनेनं ओरडलं, दोघांनी तिकडे पाहिलं. रेडइंडियनानं एलीवर चाकू फेकला होता. छातीत घुसलेला चाकू आवळीत एली सोन्याच्या नदीत पडत होती.

तेवढ्यात कॅप्टनने हातातला सोन्याचा मोठा दगड वर करून

दाखविला. कोलोराडोनं त्याच वेळी पिस्तुल काढलं आणि कॅप्टनवर गोळी झाडली. तोही सोन्याच्या चिखलांत कोसळला.

मग कोलोराडो सोने गोळा करण्यासाठी खाली वाकला. वाकता वाकता तो थबकला. रेडइंडियन तरुणाची हाक त्याला ऐकू आली.

'कोलोराडो!'

मॅकेन्नानंही चमकून वर पाहिलं. आणि त्या रेड इंडियनाच्या डोळ्यांत त्याला सोन्याचा मोह न दिसता दुसरंच काही भयंकर दिसलं तो जोनला म्हणाला,–

'जोन! टाक ते दगड. आता आपली पाळी येईल. इथे सर्वांचे खुन पडतील. आधी येथून पळ काढू चल! त्या डोंगराकडे धावायला लाग. मी आलोच.'

जोनही आता घाबरली होती. ती धावू लागली. रेडइंडियन तरुण कोलोराडोला म्हणताना तिनं ऐकलं, –

'कोलोराडो! सोनं खाली टाक. इथून एक गुंजभरही सोनं कुणी न्यायचं नाही. काल रात्री मला स्वप्न पडलं–येथून सोने हलवता येणार नाही. कुणी नेले तर भयंकर दैवी कोप होईल. रात्रभर मी जागा होतो. हे आमच्या देवाचं सोनं आहे. हे कुणीच न्यायचं नाही.'

कोलोराडोनं एकदा वर पाहिलं. आपण सोनं टाकीत आहोत अशा आविर्भावात सोन्याचे उचललेले दगड त्यानं खाली टाकले आणि त्याच हालचालीत कमरेचा चाकू काढून फेकला. एक किंचाळी मारून रेडइंडियन तरुण खाली कोसळला.

मग कोलोराडो सोने वेचण्यासाठी पुन्हा वाकला. त्याच्या एकदम ध्यानात आलं की मॅकेन्नाची हालचाल नाही. ताठ होऊन त्यानं पाहिले. मॅकेन्ना नि जोन दोघे सोन्याचा डोंगर चढून पळून जात होती.

हातातला खडा टाकून कोलोराडो त्यांच्याकडे धावला. हे सोने पाहिलेला एकही येथून निसटता कामा नये. त्यानं ठरवलं होतं. हे आपलं एकट्याचं रहायला हवं. रात्रीच्या एका मुक्कामात मॅकेन्नानं त्याला विचारलं होतं–'कोलोराडो! एवढं सोनं मिळाल्यावर तू त्याचं काय करणार?' त्यानं खिशातून जुने वर्तमानपत्राचे कात्रण काढून दाखवले होते, कात्रणात पॅरिसचा फोटो होता. तो दाखवून कोलोराडो म्हणाला होता, 'मी पॅरिसला जाऊन राहणार.'

'ही जागा आपल्याला एकट्यालाच ठाऊक आहे. पॅरिसला राहून सोनं संपलं की इथं यायचं नि पुन्हा घेऊन जायचं.'

पण हा मॅकेन्ना त्या बेताची घाण करीत होता. तो आणि ही जोन. दोघांनीही इथून निसटून जाता उपयोगी नाही.

कोलोराडो धावत त्यांच्या मागे गेला आणि डोंगर चढू लागला. तिथं सरळ कड्यासारखा भाग होता. तिथे खोबणी मिळेल तेथे बोटं नि पाय रोवीत मॅकेन्ना नि जोन चढत होती. जोन पुढे होती व तिचा पाय निसटताच मॅकेन्ना धीर देऊन ढकलीत होता. कित्येक जागी केवळ बोटांच्या जोरावर शरीर उचलावं लागत होतं. जोनच्या हातात गोळे येऊ लागले होते. मधूनच रांगत, तिला वर ढकलीत मॅकेन्ना चढत होता. श्वास जोरानं होऊ लागले होते. इथून पाय निसटताच खाली कोलोराडो चाकू घेऊन तयार होताच.

कसे तरी दोघेवर चढून आली व धापा टाकीत उभी राहिली. तेवढ्यात कोलोराडो वर आला. वर येताच खिशातला चाकू काढून तो मॅकेन्नावर-धावला. त्याचा उगारलेला हात धरून मॅकेन्नानं पिळला. चाकू खाली पडला.

मग दोघे एकमेकाना ठोसे मारू लागले. बुटानं मारू लागले या द्वंद्वांत कसले नियम नव्हते, काहीही करून दुसऱ्याला मारायचं त्यांच्या समोर ते चढून आले तो कडा होता. मागे शिळा होती. प्रत्येकजण दुसऱ्याला कड्याकडे लोटायला पहात होता. एकदा कोलोराडो पडला आणि अगदी कड्याशी गेला. पण उठून त्यानं पुन्हा हल्ला केला आणि त्याच्या ठोशानं झोक जाऊन मॅकेन्नाचे डोके मागच्या शिळेवर आपटून सुन्न झाले. कोलोराडो आता त्याचा निकाल लावायला अंगावर आला. तेवढ्यात मॅकेन्नानं डोकं हालवीत त्याचा ठोसा निवारला. पुन्हा एकदा एकमेकांना ठोसे मारून दोघेही शिणून बाजूला पडले आणि धापा टाकू लागले.

तेवढ्यात मोठा गडागगाट ऐकू आला. जमीन हादरली. चमकून तिघांनी इकडे तिकडे पाहिले. पुनः गडगडाट झाला डोक्यावरील शिळेवरची माती खाली पडू लागताच, मॅकेन्नानं झटदिशी उडी घेऊन जोनला ओढलं आणि तिच्या अंगावर आपलं शरीर धरलं.

पण माती पडतच राहिली. सगळे डोंगर थरथरू लागले. आता वरून दगड पडू लागले. कोलोराडो घाईनं उठला आणि कड्याकडे धावून जेथून ते वर आले तिथून उतरू लागला.

मॅकेन्नानंही जोनला ओढीत उतरण्याच्या जागेकडे नेलं. भूकंप सुरू झाला होता. रेडइंडियनांची श्रद्धा होती त्याप्रमाणे या सोन्याला अभिलाषेने हात लागाच त्यांचा देव कोपला होता? असेलही. विचार करायला क्षणही नव्हता. या डोंगरातून बाहेर पडलं तरच धडगत होती. तिला पुढे करून आलेली अवघड वाट मॅकेन्ना उतरू लागला. ती उतरणं चढण्याइतकेच कठिण होतं. चढताना कोलोराडोचे संकट मागून येत होतं. आता त्याहूनही मोठे भूकंपाचे. कोलोराडोचेही आता सोन्याकडचे लक्ष उडाले होते. तो भराभर उतरत होता. तो तळाशी उतरला. तिथंच डाव्या हाताला तळापासून भिंत सोन्याने भरली होती. पण आता तिकडे नजरही न टाकता उतरताच तो धावत सुटला. त्याचे पाय सोन्याच्या धुळीत रुतत जात होते. मग ओढ्यांतील सोन्याच्या दलदलीतून, सोन्याचा चिखल तुडवीत तो गेला. त्याच्या पावलांच्या आसपास सोन्याचे दगड पडले होते. पण तो खाली न वाकता, एकही दगड न उचलता धावत होता. मॅकेन्ना व जोन तळाशी पोचली, तेव्हा तो आपल्या घोड्याशी पोहोचला होता.

मागोमाग मॅकेन्ना व जोनही आपापल्या घोड्याकडे धावले. तिन्ही घोडी दरीचा तळ वेगाने ओलांडू लागली. गडगडाट वाढतच होता. तिघानाही कल्पना नव्हती असे एक दुसरे संकट त्यांच्यावर कोसळायला निघाले होते. आपल्या देवाचे सोने उचलायला आलेल्या या उपऱ्यांचा निःपात करायला रेडइंडियनांची टोळी निघाली होती. दरीचा तळ तिघे ओलांडीत असता समोरून ती टोळी आरोळ्या देत उतरू लागली.

तेवढ्यांत पुनः मोठा गडगडाट झाला. जमीन हादरू लागली आणि भेगा पडू लागल्या. दरडी कोसळू लागल्या. पुढे येणारे रेडइंडियन थांबले आणि त्यांनी घोड्यांची तोंडे वळवून पळायला सुरुवात केली.

आता सारखे गडगडाट होत होते. वर चढायच्या पायवाटेवर माती व दगड कोसळत होते. कुणी हलवावे तसे डोंगराचे सुळके हलू लागले. कोलोरोडो पुढे होता. मागे जोन व मॅकेन्ना होते. वरून पडणारे दगड टाळीत पडलेल्या दगडांवरून घोडी उडवीत, प्रत्येक क्षणाला गाडले जाण्याच्या धास्तीला तोंड देत ते बोगद्याच्या तोंडाशी आले. त्यांच्या मागे मोठा गडगडाट झाला आणि ते आलेल्या डोंगराला मोठी भेग पडली होती. ते आलेली वाट माती दगडानी भरून गेली होती. तो बोगदा कोसळला तर! प्रत्येकाच्या मनांत ती धास्ती होती.

ते बोगद्यांत शिरले. बोगद्याचा माथा थरथरत होता. वरून माती दगडांचा वर्षाव होत होता. मॅकेन्नाने एकदा मागे वळून पाहिले. त्यानी सोडलेला सोन्याचा डोंगर गदगदा हलत होता. पहाता पहाता त्याचे तुकडे होऊन कोसळू लागले. ज्या सोन्यावरून ते चालत आले तो सगळा भाग पडलेल्या कड्याने झाकून टाकला.

ते बोगद्यात शिरले तेव्हा उत्पातांनी शीग गाठली. सगळी दरी नाचू लागली आणि दरीचा खड्डा पडलेल्या डोंगरांनी भरू लागला. जिकडे तिकडे मोठमोठ्या भेगा पडल्या आणि तिघे गुहेबाहेर आल्यावर शेवटचा प्रचंड गडगडाट होऊन पृथ्वी शांत झाली. जणू या उपऱ्या तिघांना बाहेर काढताच रेडइंडियन लोकांच्या देवतेनं आपले काम झाले समजून डोंगर लोटणे थांबवले.

तिघांनी बेफामपणं घोडे दामटले. डोंगरापासून दूर आल्यावर कोलोराडोनं घोडा एकदम थांबवला. संकट टळले होते. पण मागे शेरीफ मॅकेन्नाचे संकट उरले होते. अगदी हातात आलेले सोने तर गेलेच. उरले काय तर शेरिफाचा ससेमिरा. क्रोधानं मागे वळून कोलोराडो म्हणाला.

'मॅकेन्ना! मी आपल्या वाटेनं चाललो. तुला हिम्मत असली तर मला अडव.'

मॅकेन्ना हसला. तो म्हणाला,–

'कोलोराडो! तू कोठेही जायला मोकळा आहेस. तू आणि मी एका मोठ्या संकटातून वाचलो आहोत. एकाच संकटात सापडले मित्र असतात. आपण काही काळ तरी मित्र होतो. तू कोठेही जा. यापुढे तरी सरळ जीवन जग.'

कोलोराडोनं एकदा तुच्छतेनं मॅकेन्नाकडे पाहून घोडा वळवला. आणि टाच मारली.

जोन घोड्यावरून उतरली होती. तो ही उतरला. ती पांढरी फिकट पडली होती. तिने धावत पुढे होऊन मॅकेन्नाला मिठी मारली.

मग तिला समोर धरून मॅकेन्नानं तिच्याकडे पाहिलं. तिच्या अंगावर जागोजागी सोन्याची धूळ चिकटली होती. टिचक्यांनी उडवीत तो म्हणाला,,

'लोकात जाऊ तोपर्यंत सोन्याचा एक कणही दिसू देऊ नको. हे सारे विसर. ही दरी, हे सोने. सारे विसरून जा. कुठे बोलू नको.'

पण मॅकेन्नाला एक गोष्ट ठाऊक नव्हती. कोलोराडोनं क्रोधाच्या भरात मॅकेन्नाच्या घोड्यावर स्वार होऊन टाच मारली होती. आणि त्याचे स्वतःचे सोन्याचे दगड व धूळ यांनी लादलेले घोडे मॅकेन्नाशी राहिले होते. ते घोडे आपल्या पाठीवरील ओझ्यामुळे काय काय आपत्ती निर्माण झाल्या याची जाण नसल्याने खाली मान घालून गवत शोधीत होते!

□ □ □




## वर्गणी

¤ 'चित्र, वार्ता पुस्तक' ही पुरवणी महिन्यातून दोनदा, साप्ताहिक माणूस व्यतिरिक्त प्रसिद्ध होईल.

¤ या पुरवणीची वार्षिक वर्गणी रुपये पंचवीस वेगळी पाठवावी.

¤ साप्ताहिक माणूस वर्गणीदारांसाठी पाक्षिक पुरवणी वर्गणीत वीस टक्के सवलत ठेवली आहे.

¤ म्हणजे साप्ताहिक माणूस वर्गणीदारांनी आपला वर्गणीक्रमांक कळवून फक्त वीस रुपये चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी वार्षिक वर्गणीप्रीत्यर्थ पाठवावेत.

—व्यवस्थापक

# पाक्षिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. १ ते १५ जानेवारी १९७४

### केंद्रीय मंत्रिमंडळात किंचित बदल व मतभेद

भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, भारत व काही केंद्रीय वरिष्ठ मंत्री यांचा मकर राशीबरोबर संबंध आहे. अजून एक पंधरवडा रवी हा राजा ग्रह मकर राशीला बारावा आहे. मात्र हा बारावा रवी एवढ्याशा अल्पकाळात देखील प्रचंड उलथापालथ घडवून आणू शकेल. हा रवी एवढे दडपण वाढवील की, इंदिराजींना मंत्रिमंडळात बदल करण्याची आत्यंतिक गरज भासेल. एखादा जवळचा सहकारी दूर सारावा लागेल. असला दुःखद प्रसंग निर्माण होण्याची शक्यता आहे. मतभेद चव्हाट्यावर येतील. वृत्तपत्रांतून ते गाजतील. एखादी उच्च पदस्थ महत्त्वाची व्यक्ती भ्रष्टाचारांच्या आरोपांनी गाजेल. देशभर त्याचे नाव गाजेल. अनैतिक व भ्रष्टाचारांची प्रकरणे उजेडात येतील. देशभर पुनः असंतोषाची लाट उसळेल. सरकार दडपशाही करील. महाराष्ट्राच्या बाबतीत काही अनुकूल घटना घडतील. अनेक दिवस भिजत पडलेले प्रश्न सुटण्यासारखी अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. मुख्य मंत्री वसंतराव नाईक यांचे राजकीय वजन वाढेल. मुख्य मंत्री देवराज असे थोडेफार स्थिर होतील. कर्नाटक-महाराष्ट्र वाद 'समंजस' वळण घेतील. आर्थिक क्षेत्रात मात्र अराजकसदृश परिस्थिती निर्माण होईल. नियोजन मंडळात मतभेदाची लागण होण्याची शक्यता.

**मेष : व्यवसायात अभिवृद्धी**

तुमच्या भाग्यस्थानी रवी ही एक अद्वितीय घटना आहे. रवी हा अंतरीक्षातील सर्व ग्रहांचा सम्राट आहे. त्याची अनुकूलता लाभली की तुम्हाला काय हवे? दुसरी तशीच अत्यंत अनुकूलता म्हणजे राशीवर असलेला मंगळ. रवी-मंगळाचा त्रिकोण म्हणजे यश आणि अभिवृद्धीच होय. कोणतेही क्षेत्र असो, त्याचप्रमाणे कोणताही विभाग असो, सुवर्णाचे तेजस्वी कण हाती घेऊनच तुम्ही उभे राहणार आहात. या वेळेचा हा काळ असा आहे की, हाती मृत्तिका कण घ्या की त्याचे सोने होणार आहे. तुमच्या महत्त्वाकांक्षेचा वारू इतक्या वेगाने घोडदौड करणार आहे की, यशसिद्धीला दहा दिशा देखील त्याला अपुऱ्या पडाव्यात. तुम्ही उद्योगपती असाल तर परदेशांत तुमचा उद्योग सुरू करण्याची अनेक दिवस मनात असलेली योजना यावेळी ध्यानी मनी नसताना प्रत्यक्षात येईल. वरिष्ठ सरकारी क्षेत्रात तुमचे नाव गाजत राहणार असून शासनातील उच्च व्यक्तीचा वरदहस्त तुम्हाला लाभणार आहे. सारांश नव्या वर्षाची सुरुवात जिकडे तिकडे तुमचे यश व सफलता उधळीत येणार आहे. नोकरीत तुमच्या इच्छा-अपेक्षा पुऱ्या होतील. नोकरीत बदल होईल. संशोधकांना अफाट कीर्ती मिळण्याचा योग आहे. एखादी व्यक्ती लॉटरीच्या बक्षिसाची धनी होईल. **महिलांस** : तुम्ही उच्च पदवी घेतली असेल तर सरकारी नोकरीत एखाद्या उच्च पदी नियुक्ती होईल. कुमारिकांचे विवाह जमतील. ◻

**वृषभ : पैशाची चणचण संपेल**

तुम्हाला मंगळ बारावा आहे. तो यावेळी तुमच्यावर बराच नाराज आहे. शिवाय रवि सारखा तेजस्वी ग्रह तुमच्यावर रुसला आहे. तो तुम्हाला फक्त हवा तेवढा पैसा देईल व तुमच्या विरुद्धच्या कारवायात सामील होईल. आधीच सध्या तुमचे हितचिंतक चारी दिशानी तुमच्या प्रतिष्ठेला व यशाला सुरुंग लावायला टपलेले आहेत. मात्र असे असले तरी त्यापैकी कुणालाच यश येण्यासारखे घडणार नाही. तुम्ही फक्त सावध असावे व कुलदेवतेची आराधना करावी. म्हणजे तुम्ही यातून निभावून जाल. यावेळी कोर्टात चालू असलेले स्थावराचे वाद मात्र न्यायाच्या कसोटीवर सुम्ही हिरीरीने लढवा. यश तुमचे आहे. स्थावर व जंगम मिळकत वारसा हक्काने मिळेल. अनपेक्षित पैशाची देखील शक्यता आहे. त्याचप्रमाणे महत्त्वाच्या कामगिरीनिमित्त तुमची यावेळी परदेशीवारी घडणार आहे. नोकरीच्या दृष्टीने फारसे अनुकूल असे काही नसले तरी वरिष्ठांचा थोडाफार कृपाकटाक्ष तुमच्यावर पडेल. बेकारांना चांगली नोकरी मिळाली नाही तरी त्यांच्यामागे लागलेली बेकारीची वणवण संपेल. कलावंतांना मात्र दैवाचे लेणे लाभणार आहे. कीर्ति व पैसा दोन्हीही त्यांना लाभणार आहेत. वरिष्ठ राजकारणी लोकांनी गुप्त शत्रू ओळखावे. लक्ष ठेवावे. यावेळी प्रामुख्याने तब्येतीला जपावे. दीर्घ मुदतीचा ज्यांना आजार आहे त्यांनी जास्त काळजी घ्यावी. **महिलांस** : वृद्ध व मध्यम वयाच्या महिलांना धार्मिक तीर्थयात्रा घडेल. नोकरीत अनुकूलता. ◻

**मिथुन : संसारात पदार्पण**

तुमच्यापैकी अनेकजण गुडघ्याला बाशिंग बांधून उभे आहेत. त्यांच्या डोक्यावर मंगलाक्षता पडणार आहेत. आजवर जे अडथळे येत होते ते दूर होतील. ठरून राहिलेले विवाहदेखील झटपट पार पडतील. यावेळच्या या ग्रहांचे वैशिष्टच असे की जोडीदार अनुरूप व एकमेकाला आवडणारे असतील. ज्यांचे प्रेमविवाह व्हावेत अशी खटपट (प्रेमाची) होती त्यांना पालकांची सहज त्रासाशिवाय अनुमती मिळेल. काही भाग्यवान असे ठरतील की त्यांना प्रेमसंबंधात

यश मिळेल. अनेकांचे नवे संसार यावेळी सुरू होणार आहेत. घटस्फोटापर्यंत आलेली प्रकरणे आपसात मिटून त्यांचे मीलन होईल. दुसरा शनी व भाग्यस्थ गुरु यांचे काही बाबतीत सहकार्य मिळणार आहे. आर्थिक स्थिती थोडीफार सुधारेल. कर्जाचा डोंगर वाढला नाही तरी कमी मात्र होणार नाही. गरजेपुरते पैसे मिळतील. पैसे नाहीत म्हणून प्रतिष्ठेला तडा जाणार नाही. नोकरीच्या दृष्टीने हा पंधरवडा प्रतिकूल नाही. पण धाडस करू नये. वरिष्ठाबरोबर मतभेद व्यक्त करू नयेत. फट् म्हणता ब्रह्महत्त्या असा प्रकार होईल. वरिष्ठ तुमच्यावर नाराज असतील. स्वतःचे काम काळजीपूर्वक करा. चुका होण्याची शक्यता आहे. दि. २ ते ७ या काळात अधिक भावनावश होऊ नका. संताप वाढणार आहे. क्रूर विचार मनात येईल. त्याला आवर घाला. नव्या नोकरीसंबंधीचा विचार तूर्त बाजूला सारा. उद्योग व्यवसायात काही तात्कालिक स्वरूपाच्या अडचणी निर्माण होतील. प्रकाशन व्यवसायात व मुद्रण व्यवसायात माघार घेण्याची पाळी येईल. नव्या नव्या योजनांच्या आहारी सध्या जाऊ नका. औषधी व्यवसाय ठीक चालेल. **महिलांस :** साडेसाती अजून संपलेली नाही याची जाणीव ठेवा. रवी-शनी प्रतियोग गैरसमज वाढवील. काळजी घ्या. ◻

## कर्क : विरोधक थंडावतील

चंद्राचा चंचल व रसिक स्वभाव तुमच्यात उतरलेला असतो पण त्याचबरोबर कोणताही व कधीही ठाम निर्धार होत नाही. मन सतत हेलकावत असते. विचार बदलत असतो व कुणाच्या ना कुणाच्या दडपणाखाली तुम्ही काम करीत असता, सध्या शनी बारावा आहे व रवी सहावा झाला आहे. हा योग तेवढासा अनुकूल नाही, मात्र हा रवी एकच काम करणार आहे आणि ते म्हणजे शत्रू व विरोधक यांचा बीमोड करणे. एवढ्यापुरते तुम्ही आक्रमक धोरण आखा. आजवर ज्या ज्या लोकांनी तुम्हाला छळले, त्रास दिला त्यांच्याकडे या रवीची क्रूर दृष्टी वळणार आहे. तुमचे क्षेत्र मोकळे होणार आहे. त्रासदायक ठरलेला वरिष्ठ राजीनामा देऊन निघून जाईल. उद्योग व्यवसायात व एखाद्या महत्त्वाच्या उत्पादन क्षेत्रात तुम्हाला स्पर्धक आणि विरोधक उरणार नाही. तुमची मक्तेदारी निर्माण होईल. राजकारणात विरोधकाचा काटा निघेल. निवडणूक असेल तर तुमचे यश हमखास समजा. स्पर्धकांचे डिपॉझिट देखील जाईल. तुम्ही कारखानदार व उद्योगपती असाल तर नव्या उद्योगाचा परवाना मिळेल. भागिदारीत नवा उद्योग सुरू होईल. मजूर पुढाऱ्याला मोठा मान मिळेल. लेखकांना सरकारी सहाय्य मिळेल. शिक्षकांना अनुदान मिळेल. कलावंताना पैसा व कीर्ती मिळेल. उपेक्षित कलावंताची उपेक्षा संपेल.पत्रकारांना सरकारी पाहुणचार लाभेल. **महिलांस :** अजून गुरु अनुकूल आहे. कौशल्याने वागल्यास इच्छा पुऱ्या होतील. नोकरीत प्रगती होईल. ◻

## सिंह : प्रतिष्ठा उंचावेल


सिंह राशीच्या व्यक्तींना तसे पाहिले तर गेले अनेक दिवस हळूहळू अनुकुलता लाभत आहे. पण तरीदेखील कुठेतरी काही तरी खुपत आहे. असमाधान वाटत आहे. कुठेतरी उणीव असल्याची जाणीव होत आहे. राजकारण असो, समाजकारण असो नाही तर नोकरी व्यवसाय असो, काहीशी उपेक्षा व असामाधान आहे.पण मित्र हो, मला कळवायला अत्यंत आनंद होतो की या पंधरवड्यापासून तुमचा सारा अंधार संपला आहे. उपेक्षा, निराशा इतिहासजमा झालेली आहे. आता कोणती संधी मिळत नाही, असे म्हणण्याची संधी तुम्हाला राहाणार नाही. कर्तबगारी दाखवायला नवे नवे मार्ग उपलब्ध होणार आहेत. नोकरी असो की स्वतंत्र धंदा असो, व्यापार असो की शेती असो, यश हाती लागणार आहे. नोकरीत कष्टदायक बदली रद्द होणार. तुमचे आवडते काम तुम्हाला मिळेल. सरकारी नोकरीत असाल तर कामाचा ताण वाटेल. पण चीज होईल. इंजिनियरिंग कारखान्यातील सर्व प्रकारचे नोकर सौंदर्य प्रसाधनाच्या उद्योगातील नोकर वर्ग खुष होईल असा एखादा निर्णय घेतला जाईल. विमान वहातूकीतील नोकर वर्गास मात्र फार त्रास होणार आहे. या राशीच्या रेल्वे नोकरांनी आपला प्रश्न वरिष्ठांबरोबर तडजोडीने मिटवावा. त्याचा फायदा होईल. राजकारणात मात्र खूप मोठी प्रतिष्ठा मिळणार आहे. नेतृत्व मिळणार आहे. प्रवासाचा व सत्काराचा योग येणार आहे. **महिलांस :** परीक्षेत यश मिळेल. वधू परीक्षेत देखील वरचा नंबर लागेल. ऑफिसर व्हाल. ◻

## कन्या : थोडे सुख–थोडे असमाधान

कन्या राशीला तब्येतीच्या दृष्टीने सर्व बाजूंनी धारेवर धरीत असलेला मंगळ अजून आहे तेथेच असल्यामुळे कोणतेही 'धैर्य' तुम्ही दाखवू शकणार नाही. तुमचा धर्म नाजूक व बराचसा अवसानघात करणारा. स्वतःचा व दुसऱ्याचा देखील, आठवा मंगळ फक्त या तुमच्या 'गुणाला' हवी तशी साथ देत आहे. कोणत्याही नव्या संधीचा पेला तुमच्या ओठाकडे येता येता दूर सरकत आहे. गेले कित्येक दिवस हे चालू आहे. पण माझ्या मित्रांनो, ही अगतिक व केविलवाणी स्थिती याच पंधरवड्यापासून विरघळू लागणार आहे. 'धैर्यधर' बनण्यासारखे सामर्थ्य तुम्हाला दिव्य शक्ती देणार आहे. तुम्ही दैववादी आहात, देव-धर्म मानणारे आहात. या श्रद्धेचे फळ आता तुमच्या पदरी पडणार आहे. नोकरी, व्यवसाय, राजकारण, सार्वजनिक कार्य, लेखन, प्रकाशन वगैरे कोणतेही क्षेत्र असो, तिथे प्रगती दिसणार आहे. यश व सफलता डोकावणार आहे. नोकरीत कामाचे चीज होऊन थोडेफार 'धन' मिळणार आहे. तुमचा दर्जा वाढून हाताखाली नोकर-चाकर मिळतील. खाजगी नोकरीत मालकांची मर्जी संपादन होईल. प्रमोशन मिळेल. दुय्यम व्यवसाय थंडावला असेल तर त्याला ऊब मिळेल. चौथा रवी रहायला जागा देईल. बंगल्याची इच्छाही पुरी होईल. चार पैसे हाती घोळतील. **महिलांस :** भावनेच्या आहारी जाऊ नका. मनावर ताबा ठेवा. अपयश नाही. ◻

## तूळ : कर्तबगारीची घोडदौड

शुक्र धर्माची तुमची वृत्ती त्याच बाबतीत जास्त तीव्र असते. रसिकता व स्नेहार्द्रता याचा एक सुंदर संगम तुमच्या ठायी असतो. राशीत आता हर्शल येऊन स्थानापन्न झाला असून प्रतिकूल असलेला रवी तिसरा आला आहे. सुखस्थान मात्र अजूनही खळबळ उत्पन्न




# आपण असे आहात

वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे आपल्या कुंडलीत केतू असेल तर एक दिवस, मनात वैफल्याची भावना निर्माण झाल्यामुळे आपण आत्महत्या करण्यास प्रवृत्त व्हाल.

(पण थांबा, असा अविचार करू नका. फेकून द्या ती डायझोनची बाटली. स्वतःच्या प्राणाची किंमत त्या यत्किंचित ढेकणा एवढी आपण समजा काय ?)

आपल्या जीवनात दुःखाचे असे काही प्रसंग येतील की ते पचविणे आपणास फार कठीण जाईल. आपण दुःखाने अक्षरशः वेडे व्हाल. आपणास मानसिक क्लेश भोगावयास लावणे हेच या केतूचे प्रधान कार्य आहे.

मंत्रतंत्र, जादूटोणा, चेटूक–करणी, मोहिनी विद्या, इंद्रजाल विद्या, गारुडी विद्या, सर्पांचे खेळ, भानामतीचे प्रयोग इत्यादी घाणेरड्या व आघोरी विद्या शिकण्याचे वेड आपल्या डोक्यात शिरेल व त्याप्रमाणे थोडी विद्याही आपणास अवगत होईल. मग ते विद्यारूपी शस्त्र कुणावर तरी चालविण्याचा तुम्हास मोह होईल. मग हा मोह वाढत जाऊन आपण दुसऱ्यास उपद्रव देणे सुरू कराल व त्यामुळेच आपणास एखादे दिवशी 'शेरास सव्वा शेर' भेटून आपली विद्या आपणावरच उलटलेली दिसेल. प्रतिस्पर्ध्याने मारलेली 'मूठ' आपणावर आघात करून जाईल व आपण भडाभडा रक्त ओकू लागाल. आपणास ती 'मूठ' परतवून लावता आली तर ठीक, नाहीतर क्षणार्धात आपण यमसदनास जाल. सबब असल्या अघोरी विद्येच्या नादी लागू नका.

साप, विंचू, पिशाच्चे व वीष हे आपले शत्रू समजावे.

आपण आजारी पडाल त्यावेळी झोपेत आपणास पिशाच्च दर्शन होईल व ते आपल्या मानगुटीस बसून आपला गळा दाबीत आहे असे आपणास दिसेल. आपण भीतीने किंकाळी फोडाल परंतु आपल्या तोंडून आवाज बाहेर फुटणार नाही. त्यामुळे आपण फाड्कन जागे व्हाल व आपल्या अंगास दरदरून घाम फुटेल. भीतिने आपण थर थर कापू लागाल. अशा अनेक वेळा घडलेल्या प्रकाराने आपण खंगत जाल. डॉक्टरी उपायांचा काहीच उपयोग होणार नाही. औषधे लागूच पडणार नाहीत. याला कारण हा केतू आहे. त्याची पीडा संपताच आपण पूर्ववत व्हाल.

आपले वैवाहीक जीवन सुखाचे असणार नाही. आपली पत्नी कजाग असेल. अथवा पती 'राक्षस' असेल. आपली पत्नी आपणास बेलाशक दुरुत्तरे करील व आपणांकडून खेटरांनी 'पाद्यपूजा' ही करून घेईल. अशा प्रकारे 'दिवसा लढाई व रात्रीचा तह' या तत्त्वास अनुसरून आपला संसार-शकट चालू राहील. आपणास मूत्र-पिंड, गुप्तइंद्रिय त्याचप्रमाणे आपल्या पत्नीच्या गर्भाशयात विकृती निर्माण होऊन त्यावर शस्त्रक्रीया करावी लागेल. शिवाय पत्नीला प्रदर, धुपणी आदी विकार हैराण करील ते वेगळेच.

तात्पर्य असे की हा केतू आपल्या जीवनावरील 'Black Spot' समजावा.

**एन. आर. साळवी**, पनवेल

---

करीत राहणार आहे. मुखात मीठ पडणे, आईच्या मुखात व्यत्यय येणे, आईची ताटा-तूट घडणे, अशा घटना अजून काही काळ घडत राहणार आहेत. प्रामुख्याने मातृसुखात उणीव भासणे हेच मुख्य दुखणे राहील. त्याचप्रमाणे जागेच्या दृष्टीने देखील अजून थोडा काळ प्रतिकूलच आहे. नव्या जागेचा प्रयत्न सध्या करू नका. असलेले घर विकू नका. नवे घर वा जागा घेऊ नका. या प्रश्नात कोर्टकचेरी तर अजिबात करू नका. पण एवढी प्रतिकूलता सोडली तर एकंदरीत हा पंधरवडा अनुकूल व तुमच्या कर्तबगारीचा वारू घोडदौडीकडे नेणाराच ठरेल. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिपथात येऊ लागतील. जे अशक्य वा अप्राप्य वाटत होते ते प्राप्त होईल. तिसरा रवी तुमचे सामाजिक स्थान उंचावणार आहे. मान व प्रतिष्ठा मिळवून देणार आहे. बौद्धिक क्षेत्रात काही तरी दिव्य भव्य असे घडवणार आहे. महत्त्वाकांक्षेचे स्फुलिंग फुलवून प्रज्वलित करणार आहे. नोकरीत वरिष्ठ जागी तुमचे स्थान पक्के करणार आहे. कलाक्षेत्रातील व राजकारणा-तील लेखनाबद्दल मोठा गौरवास्पद प्रसंग तुमच्या बाबतीत निर्माण होणार आहे. पैसा चांगला मिळेल. **महिलांस :** मनःस्वास्थ्यात सुधारणा दिसेल. सार्वजनिक कार्यात गौरव होईल. ◻

**वृश्चिक : सावधगिरीची आवश्यकता.**

तुमच्या राशीची कर्तुमकतुम शक्ती म्हणजे मंगळ आणि तो मंगळ सहाव्या स्थानी अत्यंत समर्थ अवस्थेत आहे. त्यामुळे तुमच्या बाबतीत एक अतिशय जमेची बाजू म्हणजे कुणीही स्पर्धक वा विरोधक तुमच्या पुढे टिकू शकणार नाही. अर्थात याला राजकारणाचे क्षेत्र अपवाद राहील. तुम्ही राजकीय नेते असाल वा त्या क्षेत्रात तुम्ही मोठे पद भूष-वीत असाल तर तेथे एक प्रकारची चमत्का-रिक स्थिती तुमच्याबाबतीत निर्माण होणार आहे. तूळ राशीत हर्शल आहे. तो बराच काळ तेथे राहाणार आहे. हा बारावा हर्षल अनपेक्षित स्वरुपाच्या त्रासदायक घटना घडवीत राहील. खर्च व तोही नक्त स्वरू-पाचा सतत मधून मधून उद्‌भवत राहील. एखादी जामिनकी अंगाशी आणील नाही तर लहानशा आजारासाठी ढीगभर पैसा उधळून जाईल. चैनबाजी – व्यसने यांच्यासुद्धा तुम्ही आहारी जाल. पत्नीच्या संबंधाबाहेर इतर

ठिकाणी जाण्याचा मोह कटाक्षाने टाळा. त्यातून डोकेदुखी व त्रास निर्माण होईल. लग्नाच्या बाबतीत थोडी विचारपूर्वक पावले टाकणे आवश्यक आहे. तूर्त प्रवासाचा बेत सोडून द्या. दि. ४ ते ९ ह्या मुदतीत नोकरीत वरिष्ठांबरोबर मतभेद होतील. वरिष्ठांकडून बोलून घ्यावे लागेल. दि. १० ते १३ आर्थिक व्यवहारात गुंतागुंत निर्माण होईल. व्यापारी व्यवसाय वादळात सापडेल. **महिलांस :** संताप व मनस्ताप करून घेऊ नका. देवीची उपसना करा. ◻

## धनू : प्रगतीकडे वाटचाल.

बारावा रवी बदलून पहिला झाला तेव्हापासूनच खरे तर तुम्हाला अनुकूलता निर्माण झाली आहे. पण इतर काही ग्रह प्रतिकूल असल्यामुळे अपेक्षित वेग येत नाही. पाचवा मंगळ सामर्थ्य देत आहे तर सातवा शनी संसारातील अगतिकता नष्ट करीत आहे. संसारात अडचणी मात्र येत नाहीत असे नाही. मुलांना आजार, मुलांबद्दल काळजी, पत्नीला अकस्मात आजार असे काही तरी घडत असेलच. पण हे सारे दुसऱ्या टोकाकडे जाऊन तुम्हाला निराश व्हावे लागणार नाही. उलट आता तुमची उदासीनता कमी कमी होऊ लागेल. नवे काही करण्यासाठी उत्साहाचे वारे तुमच्या मनाला स्पर्श करू शकतील. नोकरीत असो की स्वतंत्र धंदा असो आता कोणताच त्रास तुम्हाला होऊ शकणार नाही. गेले अनेक महिने पत्नीच्या वा एखाद्या स्त्रीच्या संबंधात तुम्हाला शारिरीक त्रास होत असेल तर तो आता समूळ नष्ट होणार आहे. दि. २ ते ५, दि. ७ ते १० व दि. १३ ते १५ हा काळ लक्षात ठेवा. महत्त्वाचा आहे. लॉटरी, रेस यामुळे एकदम पैसा मिळेल असा योग आहे. आर्थिक स्थितीला अनुकूल कलाटणी मिळाणारा असा हा काळ आहे. नोकरीत स्थानांतर घडेल. वरची जागा मिळेल. महत्त्वाचे स्थान प्राप्त होईल. एखाद्या धंद्याचे तुम्ही अनपेक्षित 'मालक' बनाल. स्थावर मिळकतीचा प्रश्न सुटेल. **महिलांस :** कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न प्रामुख्याने मार्गी लागेल. सुस्वरूप तरुणाशी संबंध येईल. ◻

## मकर : गुंतागुंत वाढेल.

तुमच्या राशीत गुरू हीच काय ती एकमेव जमेची बाजू. बरे तो गुरू तरी तुम्हाला उपकारक ठरतोय म्हणावे तर तेथेही निराशाच. ग्रहांची प्रतिकूल परिस्थिती असली की आकस्तळेपणा करून, रागावून वा स्वतःशीच तडफडून काही उपयोग होत नाही. प्रतिकूलतेची लाट डोके खाली दाबून डोक्यावरून जाऊ द्यावी लागते. सध्याची तुमची परिस्थिती अगदी तशीच आहे. कोल्हापूरच्या अंबाबाईची आराधना करीत स्वस्थ बसा. कुणाला दोष देऊ नका व कुणाशी वितंडवाद घालीत बसू नका. नोकरीच्या बाबतीत चुका होऊ नये याची डोळ्यात तेल घालून काळजी घ्या. विशेषतः पैसा व हिशोब याची कामे ज्यांच्याकडे आहेत त्यांनी अत्यंत सावध रहावे. दि. २ ते ५ व दि. ९ ते १३ हा काळ सावधगिरीचा आहे. पैसा चोरीला जाणे धाकदपटशाच्या मार्गाने पैसा लुबाडला जाणे किंवा फसवले जाणे अशासारख्या घटना नोकरीत घडतील. वरिष्ठाच्या मनात कमालीची संशयी वृत्ती तुमच्याबाबतीत निर्माण होईल. तुम्ही आयकर, विक्रीकर भरीत असाल तर त्यासंबंधात अप्रतिष्ठा होण्याचा प्रसंग येईल. पण कुलदेवतेच्या कृपेने तुमची अप्रतिष्ठा होणार नाही. कुणीतरी आयत्यावेळी मदतीसाठी उभेरहातील. उद्योगाच्या बाबतीत नुकसानकारक काळ आहे. व्यापारी लोकांनी बेकायदेशीर वागू नये. कोर्टकचेरीचे निकाल यावेळी विरुद्ध जातील. लेखी करारात त्रास होईल. **महिलांस :** विवाह ठरला असेल तर तो यावेळी उरकून घ्या. संसारात थोडीफार प्रसन्नता येईल. ◻

## कुंभ : सर्वत्र यश

कुंभ राशीला रवी अनुकूल असला व राशीस्वामी शनी त्याला साथ देत असला तर कुंभ राशीची माणसे जगाच्या, समाजाच्या अग्रभागी झळकत असतात. दाही दिशांचे डोळे त्यांच्याठायी केंद्रीभूत झालेले असतात. स्तुती, कौतुक, गौरव, मान, प्रतिष्ठा इत्यादी सारे वैभव व त्यांना दो करानी मिळत असते. असा अद्वितीय वा असामान्य काळ सध्या तुमच्याच वाटचाला आहे. सध्या ज्या आघाडीवर राशी आहेत त्यात कुंभ रास अग्रस्थानी आहे. कुंभ राशीला दि. १४ जानेवारीपर्यंत रवी अकरावा आहे. तेव्हा तुमची सारी महत्त्वाची कामे त्यापूर्वी उरकून घ्या. घ्या. महत्त्वाच्या योजना त्यापूर्वी अमलात येतील अशी व्यवस्था करा. तुम्ही उद्योगपती असाल तर तुम्हाला उत्पादन वाढवायला व त्यात भरपूर लाभ व्हायला ह्या काळ अत्यंत उत्तम आहे. तेल, लोखंड व इंजिनियरिंग उद्योग याबाबतीत नियतीची संधी तुम्हाला मिळणार आहे. उद्योगी व्यक्तीला व उद्योगपतींना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळणार आहे. तुम्ही अर्थशास्त्रज्ञ असाल तर नियोजनासारख्या योजनेत तुम्हाला खास सल्लागारांची भूमिका मिळणार आहे. नोकरीत अतिशय अनुकूल काळ आहे. प्रमोशन व बढतीही मिळणार आहे. शासनात एखादे महत्त्वाचे स्थान लाभेल. आर्थिक बाबतीत अनुकूल वारे वाहू लागतील. वाईट मार्गाने पैसा मिळवण्याची इच्छा होईल. पैसा मिळेल. **महिलांस :** प्रेमात अडथळे व त्रास होईल. नोकरीत मात्र प्रगतीकारक घटना घडेल.

## मीन : कीर्तीचा योग

गुरु हा तुमचा त्राता. तो अकरावा आहे. तो तुमच्या राशीचा स्वामी आहे. पण या गुरूची सध्याची स्थिती मात्र थंड अशीच आहे. तो तसे तुमचे वाईट काही करीत नाही. पण म्हणावे तसे अनुकूलदेखील त्याच्याकडून काही घडत नाही. कारण तेवढी कर्तबगारीच त्याची नाही. नाही म्हणायला आर्थिक क्षेत्रात मात्र काही अनुकूल घटना घडू शकतील, सासुरवाडीकडून मदत मिळेल. मित्रांची मदत होईल. एखादा 'श्रीमंत' थैली तुमच्यासाठी मोकळी करू इच्छिल. प्रामुख्याने हा काळ वाङ्मय व कला या क्षेत्रात वावरणाऱ्यांचा आहे. त्यांना पैसा व कीर्ती प्रसिद्धी व प्रतिष्ठा मिळणार आहे. हौशी लेखकाला पहिली प्रसिद्धी मिळेल. वृत्तपत्र वा नियतकालिक काढण्याची खूप दिवसाची इच्छा यावेळी पुरी होईल. स्वतःसाठी प्रेस विकत घेऊ शकाल. लेखणीचे सामर्थ्य असलेला माणूस एकदम भरपूर पगाराच्या संपादकाच्या जागेवर आरूढ होईल. राजकारणात नेतृत्वाची अनुकूलता लाभेल. नोकरीत अनुकूल काल आहे. कामाचा ताण कमी होईल. तुमच्यावर लादलेली आनावश्यक कामे कमी होईल. मुदतीची कामे करावी लागतील. बेकारांचा शुभवार्ता कळेल. उद्योगात थोडीफार त्रासाची परिस्थिती राहील. पण प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. नवा लघुउद्योग गती घेईल. **महिलांस :** याच पंधरवड्याचे अनेक कामे उरकून घ्या. विवाहाचा योग आहे. ◻ ◻ ◻

## निगूडा : पृष्ठ १५ वरून

त्यांनी बरेच खेकडे पण धरले. मग वस्तीवर येऊन आपल्या आया-भोवती गोळा होऊन खायला मागू लागली.

तेवढ्यात बरंचसं मांस भाजून तयार झालं होतं. काही झाडांच्या मुळ्या आणि मोठमोठाली कंदफळंही होरपळून काढली होती. सोलून काढलेल्या कोंबड्या निखाऱ्यात चटचटत होत्या.

मुलं खायला बसली. आणि शिणकरी माणसं काखोटीला हत्यारं आणि खायचं घेऊन बाहेर पडली.

त्यानंतर बऱ्याच वेळाने तरुण पोरी आणि मध्यमवयाच्या बाया झाडांच्या सालींची तयार केलेली जाळी घेऊन नदीवर गेल्या. आणि कमरेभर पाण्यात जाळं पसरू लागल्या. गार पाण्यात अर्ध अंग भिजल्याबरोबर त्यांची सकाळची सुस्ती आणि जडपणा पार पळाला. आणि तुटक्या फुटक्या भाषेच्या साह्याने त्या आपसात बोलू लागल्या आणि दुसरीकडे मासे पकडण्याचाही उद्योग करू लागल्या.

तिथल्या इतर तरुण पोरीत आणि वयस्कर बायातही निमूवाचा विषय निघाला. निमूवा या वेळी त्यांच्यांत नव्हती. तिच्या शिणेच्या इतर चारपाच पोरी घेऊन ती निगूडाबरोबर शिकारीला गेली होती.

त्या वस्तीत कामाची वाटणी अशाच प्रकारची होती.

म्हाताऱ्या बाया दुपारच्या वेळी वस्तीतल्या लहान लहान मुलांना संभाळीत बसल्या होत्या. तशीच म्हातारी माणसंही मुलात मिसळत होती!

—आणि दूर डोंगरमाथ्याच्या टापूतून, दऱ्याखोऱ्यांतून, आणि भोवताली पसरलेल्या दाट जाळ्यातून निगूडाची टोळी शिकार हेरीत हिंडत होती. आतापर्यंत फक्त तीनचार बारके प्राणीच त्यांच्या पदरात पडले होते. निदान अजून दोन हरणं तरी मारायला हवी होती. मात्र मघापासून निमूवा कुठे तरी एकटीच बेपत्ता झालेली होती. दोन घटका उलटून गेल्या तरी तिचा पत्ता नव्हता. तेवढ्या वेळात उदगाने एक काळ्या मारला होता आणि निगूडाने तर एक हरीण जिवंतच पकडून आणलं होतं!

तेवढ्यात सारे तरुण शिकारी त्या हरणाभोवती जमले. सालीच्या सोपटांनी त्याला बांधून टाकण्यात आलं. प्रत्येकानं निगूडाचं कौतुक केलं. त्याच्या चपळाईवर सारेचजण भुलले होते. त्या गडबडीत आणखी बराच वेळ निघून गेला. परंतु अजूनही निमूवा कुठेच दिसत नव्हती. मग मात्र तिची शोधाशोध सुरू झाली. प्रत्येकजण हैराण होऊन गेला. निगूडाही जरा हबकला. वस्तीतलं एखादं माणूस असं एकाएकी नाहीसं होणं चांगलं नव्हतं, याची जाणीव त्यांच्यापैकी प्रत्येकात तीव्रतेनं निर्माण झालेली होती. तिला कुठे एकटी जाऊच कशी दिली म्हणून त्याने प्रत्येकाला जाब विचारला. प्रत्येकाने माना खाली घातल्या.

जवळच्या टोपलीत मरून पडलेले ससे होते. बाजूलाच गतप्राण झालेल्या काळ्याचं धूड तोंड वासून पडलं होतं. जिवंत हरिण बुजरे-पणानं चहूंकडे पाहात होतं. थोडंसं कुठं खुट्ट झालं की टणा टणा चारपाच उड्या मारीत होतं आणि जोरजोराने धपापत होतं.

तेवढ्यात मागून आवाज आला. मागच्या बाजूच्या डोंगरांना वळसा घालून निमूवा येत असलेली दिसली. तिच्या दोन्ही हातात मागचे पाय मोडलेले दोन दोन ससे होते. मोठ्या डौलात ती चालत येत होती.

तशा स्थितीत निमूवाला पाहताच निगूडा एदकम खुलला. आणि धावत तिच्याजवळ जाऊन त्याने तशीच तिला मिठी मारली. निमूवाच्या शौर्याचं त्याने चीज केलं!

त्या आवेगात तिच्या हातातल्या सशासकट त्याने तिला अलगद वर उचलली, आणि हवेत दोनतीनदा झेलली. ते ससेही दोनतीनदा हिंदकळले. संबंध आवेग ओसरल्यावर त्याने जेव्हा तिला खाली उभी केली, तेव्हा आनंदाच्या भरात ती वर हवेतच तरंगत होती!

त्याच वेळी निगूडाच्या कृतीकडे उदगा टक लावून पाहात होता. त्याच्या डोक्यात कुठे तरी ठणका लागला होता!

नंतर एका प्रशस्त झाडाच्या सावलीत बसून त्यांनी सकाळी बांधून आणलेलं सारं काही फस्त केलं. नदीच्या गाभाऱ्यात घुसून प्रत्येकजण पोटभर पाणी प्याला आणि हातीपायी धावल्यावर प्रत्येकजण सुस्तावून सावलीला लोळू लागला.

सर्वांच्या मध्यभागी शिकार होती. कुणी जागं राहून आसपास लक्ष देत होते, त्याचवेळी इतर डुलक्या घेत होते!

त्या भर दुपारच्या उष्ण गुंगीतच उदगा निमूवाकडे टक लावून पाहात होता. परंतु तिचं त्याच्याकडे लक्षच नव्हतं! उदगा मात्र कामवासनेनं पेटत चालला होता. निमूवा निगूडाला खेटून पसरली होती. सर्वदेखत तिने त्याच्या केसाळ छातीवर हात टाकले होते— परंतु निगूडा केव्हाच गुंगला होता. गाढ झोपेत घोरत होता.

दुपारची उन्हं कमी झाली. सर्वांच्या थोड्या थोड्या झोपा झाल्या. मग पुन्हा एकदा सारेजण पाणी प्याले. हातपाय धुऊन ताजेतवाने झाले. मोठ्या समाधानाने वस्तीकडे चालू लागले.

बरीच चाल झाल्यानंतर दिवस मावळला. प्रत्येकजण मग जपून चालू लागला. वस्तीवरचे कुत्रे भुंकू लागताच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधान सळसळू लागलं. आजचा दिवस सुखासमाधानात पार पडल्याचं ते चिन्ह होतं. शिकारी गड्यांची चाहूल वस्तीवरच्या माणसांना आधीच लागलेली होती. चहूकडे विस्तव पेटला होता. चहूकडे धूर दरवळला होता. लहान लहान पोरं रडत होती. कोंबडे खुराड्यात खुसखुसत होते. त्यांची पिलं सुद्धा 'कुक् कुक्' करताना स्पष्ट ऐकू येत होतं.

वस्तीत परत आल्यानंतर त्यांचा एक छोटा कार्यक्रम असे. वस्तीचा नायक वस्तीत दाखल झाला की, अगोदर तिथे संपूर्ण शांतता निर्माण झाली पाहिजे. मग नायक आणि त्याचे काही समवयस्क साथीदार एका उंच ओटीवर बसत. कधी कधी हा नायक मोठ्या ऐटीत एका विशिष्ट आकर्षक पवित्र्यात उभा देखील राहत असे! त्यानंतर त्याच्याभोवती वस्तीतील सारी माणसं—बाया, पुरुष, मुलं जमा होत. त्यांनी दिवसभरात जे काही मिळविलेलं असे, ते सारं निगूडाच्या पुढ्यात ठेवलं जात असे. त्याचवेळी मध्यभागी वाळक्या काट्या—फासोट्यांचा जाळ केलेला असे. त्या जळजळीत उजेडात निगूडा सर्वांच्या मिळकतीवरून नजर फिरवीत असे. त्यानंतर त्याची नजर प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावरून फिरे. काही उल्लेखनीय गोष्ट कोणी

केली असेल तर स्वतः उठून तो त्या व्यक्तीला मिठी मारी. या वेळी लहान मोठ्याचा प्रश्न उद्‌भवत नसे! मग ती व्यक्ती स्त्री असो अथवा पुरुष असो!—त्यानंतर ज्यांच्या हातून काही अपराध घडला असेल, नियमून दिलेल्या शिस्तीचा भंग झाला असेल तर त्या व्यक्तीला अत्यंत कडक शिक्षा करण्यात येई. अपराधाच्या बाबतीत दया-मायेचा प्रश्न उद्‌भवत नसे!

—ते सारं झाल्यानंतर मग सारी शिकार एकत्र केली जाई. तिचं योग्य वाटप केलं जाई. मात्र हे वाटप करताना शक्तिवान शिकारीचं काळीज वस्तीच्या नायकालाच देण्यात येई. कारण या बाबतीत त्यांचा असा समज होता की, क्रूर, अमर्याद शक्तीच्या सावजाचं काळीज खाल्ल्यानं खाणाऱ्याला तेवढीच शक्ती, क्रौर्य आणि धैर्य प्राप्त होतं!

एवढं झालं की स्त्रिया आणि मुलं आपापल्या कामाला निघून जात.

त्यानंतर दुपारी वस्तीवर राहिलेली काही वृद्ध परंतु जबाबदार माणसं निगूडाच्या भोवती जमत, आणि त्या दिवसाचा अहवाल त्याला सादर करीत!

—आता तोच अहवाल सादर करण्याची वेळ होती.

पिरंगुळा हा निगूडचा बाप. पिरंगुळा मेल्यावर निगूडा त्याच्या जागेवर आला. पिरंगुळाच्याच वयाचा एक वृद्ध केडा त्या वस्तीच्या संरक्षणाची जबाबदारी संभाळीत असे. ही माणसं शिकारीला बाहेर पडली की, वस्तीवर केडाचा अम्मल सुरू होई. दिवसभर वस्तीचं रक्षण करणं आणि दिवसभराचा सारा अहवाल राती निगूडला सादर करणं हे केडाचं काम असे.

साऱ्या वस्तीत शिकारीला जसं महत्त्व असे तसंच केडाच्या कामालाही महत्त्व असे. वस्तीचं संरक्षण होऊ शकलं नाही, शत्रूला वस्तीचा वचक वाटला नाही, तर मग त्यांच्या जीवनाला अर्थच उरत नसे! वस्तीवर धाडी आल्या तर मग राहायचं कुठ? आणि कसं? एका जागेवर आणि त्याही अत्यंत मोक्याच्या जागेवर स्थिर राहायचं म्हणजे इतर शत्रूवर वचक ठेवून राहाणंच भाग असे. कारण ही माणसं ज्या ठिकाणी वस्ती करीत असत तिथं जीविताच्या साऱ्या सुखसोयी पाहूनच करीत असत. अर्थात् समकालीनांचाही त्या ठिकाणावर डोळा असणं साहजिकच असे!

त्यामुळे शिणकरी शिकारीवर गेल्यानंतर वस्तीला आलेला ढिले-पणा हा शत्रूला नेहमीच सुवर्णसंधी असे. म्हणून मग दिवसा कधी टेहेळणीचे प्रकार तर कधी चोरटे हल्ले आणि कधी कधी तर उघड हल्ले असे प्रकार नेहमी होत असत. त्यापासून वस्तीचं संरक्षण करणं आणि आहे त्या जागी खंबीरपणे चिकटून राहण्याला फार महत्त्व असे.

त्यामुळेच रात्रीच्या या अहवालाला फार महत्त्व असे. त्या वेळी तिथली माणसं फार गंभीरपणे वागत. काही विशेष धोका निर्माण झाला असला तर मग या गांभीर्याला फारच गूढता येई!

आजचा प्रकार काहीसा तसाच होता. केडा फार गंभीरपणे आपला अहवाल सांगत होता. कारण आज निगूडा वस्तीवर टेहेळणी झालेली होती. काही परक्या माणसांनी वस्तीत विचारपूसही केली होती! आज प्रत्यक्ष काही जरी हानी झालेली नसली तरी धोका खासच निर्माण झाला होता!

वडीगाच्या वस्तीवरील माणसांनी टेहेळणी केली होती. हे ऐकल्या-बरोबर निगूडचा चेहेरा एकदम काळानिळा झाला. एकदम त्याच्या डोळ्यात रक्त उतरलं. त्याचा दुखावलेला अभिमान त्याच्या हृदयात सलू लागला! कारण त्या टेहळणीचा सारा संबंध पूरियाशी होता हे उघड होतं!

परंतु केडाने जेव्हा पुढची हकीकत सांगितली तेव्हा निगूडच्या वृत्तीत पुन्हा एकदा जोराचा बदल झाला. आणि तो एकदम जागचा उठून जाळीतल्या वाघरासारखा फेऱ्या घालू लागला! त्याचा मेंदू जोरजोराने विचार करू लागला.

कारण केडाने त्याला सांगितलं होतं की, एकदोन माणसांनी इथं पूरियाची चौकशी केली होती!

आणि ही एकच गोष्ट निगूडाला चमत्कारिक वाटू लागली.

—म्हणजे पूरिया इतक्या दिवसात अजून स्वतःच्या वस्तीवर पोहोचली नव्हती! तिची चुकामूक झाली होती ही गोष्ट उघड होती.

मग आता पूरिया कुठे असेल? दुसऱ्या एखाद्या वस्तीतल्या माणसांच्या जाळ्यात सापडली असेल काय?

पुन्हा मग त्याला त्याच एका वेडाने झपाटलं. रात्री मांस खाताना तो नेहमीसारखा खुशीत नव्हता. निमूवाने या गोष्टी मघाशीच ऐकल्या होत्या. आणि आताचा निगूडाच्या वृत्तीतला फरकही ती पाहात होती. त्यामुळे ती सुद्धा हैराण झाली होती—कारण या एकाच घटनेनं निगूडा पुन्हा तिच्यापासून दूरावला होता.

सकाळच्या तिच्या त्या शौर्याला, आणि शौर्यामुळे झालेल्या कौतुकाला आता काहीच अर्थ उरला नव्हता.

—आता पुन्हा पूरियाच्या नादाने निगूडा वेडा होणार होता!

त्याच्या त्या वेडाची लक्षणं निमूवा रात्रभर जागी राहून पाहू लागली. निगूडा तळमळत होता. आणि निमूवा भ्याल्यासारखी, भ्रमिष्टासारखी त्याच्याकडे दुरून पाहात होती. आज तर त्याच्या-जवळ जाण्याची देखील तिला भीति वाटत होती.

यावेळी तिच्या मनात मात्र निगूडापेक्षा पूरियाचेच विचार सारखे येत होते! ◻

## : ५ :

आभाळाच्या माथ्यावर चंद्र आलेला होता. सारी वस्ती निपचिप झोपलेली होती. फक्त वस्तीच्या भोवती दूरवर झाडांचा आश्रय घेऊन वस्तीतील काही माणसे नेहमीप्रमाणे टेहळणी करीत होती. निगूडा आपल्या झोपडीबाहेर येऊन नेहमीच्या झाडाच्या बुंध्याशी टेकून पडला होता. त्याला झोप येत नव्हती. झोप आली नाही, मन अस्वस्थ असलं की, निगूडा नेहमी याच झाडाखाली येऊन बसत असे.

आज तर त्याचे मन दोन कारणामुळे अस्वस्थ झाले होते.

वस्तीवर टेहेळणी झाल्यामुळे संरक्षणाचा प्रश्न समोर उभा राहिला होता. शिवाय ती टेहळणी केवळ जागा मिळविण्याच्या किंवा अन्न लुबाडण्याच्या लालसेने झाली नव्हती, तर त्या पाठीमागे पूरिया होती! शिवाय वडीगाच्या वस्तीवरील माणसांशी सामना देण्याची पाळी येणार होती. त्या वस्तीतील एक एक नग शूर होता!

निगूडाच्या मनात सारखे उलट सुलट विचार चालले होते. तो

मनाने तसाच शरीराने देखील तळमळत होता. तळमळताना तो या अंगावरून त्या अंगावर होताना अंगाखालचा वाळला पालापाचोळा चिरडला जात होता आणि रात्रीच्या शांततेत त्याचा विचित्र आवाज होत होता. दूरवर निगूडावर लक्ष ठेवून बसलेली निमूवा त्यामुळे विचलित होत होती. तो एकाएकी उठला आणि त्याला आपली चाहूल लागली तर चांगलीच हाडे मोडली असती! इतक्यात निगूडा फारच अस्वस्थ झाला. त्याने एकदा तोंडावाटे विशिष्ट प्रकारचा आवाज काढला आणि मग हळूच पण तीक्ष्ण हाक मारली,

'केऽऽऽडा!'

परंतु आतून कुठून प्रतिनिधी उमटला नाही! मग पुन: त्याने हाक जरा आणखी लांबविली,

'केऽऽऽऽऽडाऽऽऽ!'

तरीही प्रतिसाद उमटला नाही. केडा हा वृद्ध आणि अनुभवी माणूस. एखाद्या आणीबाणीच्या प्रसंगाची चाहूल आली की निगूडा त्याचा सल्ला घेत असे. आजही शेवटी याबाबतीत काय करावे याचा जेव्हा त्याला काही निर्णय घेता आला नाही तेव्हा शेवटी त्याने केडाला साद घातली परंतु केडा हा दिवसभर वस्तीवर टेहळणी करून थकला होता त्यामुळे गाढ झोपेत होता. शिवाय रात्रीच्या संरक्षणाची काळजी करण्याची त्याच्यावर जबाबदारी नसल्यामुळे तो निर्धास्त होता!

जेव्हा निगूडाने दोन हाका मारल्या आणि त्यांचा प्रतिसाद त्याला मिळाला नाही तेव्हा दूरवर नजर लावून बसलेल्या निमूवाचे काळीज हबकले! निगूडाची हाक नुसती वाऱ्यावर विरणे म्हणजे दुसऱ्या क्षणाला आकाशातून अग्निवर्षाव होण्यासारखे होते! त्यामुळे ती हळूहळू सशाच्या चालीने केडाच्या झोपडीत गेली आणि तिने त्याला हलवून जागे केले. त्याने डोळे उघडल्यावर ती म्हणाली,

'निगूडाची हाक आहे!'

हे वाक्य ऐकताच केडा खडबडून उठला आणि धावत धावत जाऊन झाडाखाली निगूडासमोर उभा राहिला. निगूडाने त्याला प्रश्न केला,

'वडीगा टेहेळणीवर होता का?'

केडाने नकारार्थी मान हलविली.

'मग कोण कोण होतं?'

'तीन चार माणसं होती!'

'तुला काय वाटतं केडा—फार भीती आहे काय?'

या प्रश्नाला केडाने नकारार्थी मान हलविली! केडाला विशेष खळखळून बोलताच येत नव्हतं. पिरंगुळाचा समकालीन केडा, परंतु पिरंगुळाच्या मेंदूचा जेवढा विकास झाला होता तेवढा केडाचा झालेला नव्हता! तो शूर होता; परंतु कल्पक नव्हता. धीमा होता. त्यामुळे बोलण्यापेक्षा कृती करण्यात त्याचा हातखंडा होता. कामापेक्षा अधिक तो कधीच बोलत नसे! परंतु बोलण्यापेक्षा त्याने हातापायांच्या, डोक्याच्या, डोळ्यांच्या ज्या हालचाली केल्या असतील आणि त्या हालचालींमधून जे अर्थ व्यक्त झाले असतील त्याला फार महत्त्व असे!

—आता भीतीचे काही कारण नाही अशा अर्थाने जेव्हा केडाने मान हलविली तेव्हा निगूडाच्या मनावरचा काळजीचा भार एकाएकी हलका झाला! त्याचे अस्वस्थ होणारे, तळमळणारे शरीर शांत झाले. बुंध्यापासून उठून तो उभा राहिला. एकदा त्याने वरच्या माथ्यावरच्या चंद्राकडे पाहिले. मग दोन्ही हात जोडून स्वत:च्या छातीवर ठेवले. त्यानंतर गुडघे जमिनीवर टेकून तो हनुमानासारखा बसला; आणि एकाच क्षणात पुन: सरळ उठून उभा राहिला. केडाच्या खांद्यावर त्याने दोन हात ठेवले. आणि धीमेपणाने चालत चालत ते झोपडीकडे गेले! ◻

: ६ :

स्वत:ला मोठ्या शिताफीनं सोडवून घेऊन पूरियाने ती वस्ती सोडली तेव्हा रात्र घुमत होती. वस्तीपासून तीन-चारशे पावलं दूर गेल्यावर पूरियाने शेवटचंच मागे वळून पाहिलं, आणि होती नव्हती एवढी शक्ती पणाला लावून ती पळत सुटली. त्या सोळा-सतरा वर्षांच्या तरुणीच्या अंगात त्यावेळी बारा हरिणींची चपळाई सळसळत होती. लहान लहान झुडुपांवरून तर धावण्याचा वेग थोडाही कमी न करता ती आठ आठ हातांच्या उड्याच टाकीत होती. या वेळी तिच्या दृष्टीपुढे दुसरं तिसरं काही नव्हतं. फक्त निगूडाची वस्ती तिला शक्य तितकी मागं टाकायची होती.

तिचं एकीकडे स्वतंत्र असलेलं आणि एकीकडे वडीगाच्या व्यक्तित्वात मिसळून गेलेलं मन निगूडाच्या धास्तीनं थरथरत होतं. क्रूर, हेकट आणि जिद्दीला पेटलेल्या, तिचं अपहरण करायचा चंग बांधलेल्या निगूडावर ती दातओठ खात होती आणि सारखी उरी फुटेपर्यंत धावत होती. रात्रीचा मिट्ट अंधार, गार वारा, अंधारात अंतराअंतरावर उभी असलेली डेरेदार झाडं, झाडांच्या खोडात निवाऱ्याला बसून किरकिराट करणारे रातकिडे आणि पुढे लांब आडव्या पसरलेल्या काळ्या कुट्ट डोंगरांची दडस थप्पी. त्या वेळी जाग्या असणाऱ्या माणसाचा चहूकडून कोंडमारा करणारं ते वातावरण होतं. त्या वातावरणात आणि तसल्या एकांतात त्या वेळी दहा माणसं जरी एकत्र असती तरी त्यांची भीतीनं गाळण उडाली असती! मग पूरिया तर एकटीच होती आणि तीही एक स्त्री!

परंतु पूरियाच्या मनात त्या वेळी भीतीचा लवलेशही नव्हता. तिला भीती फक्त एकाच गोष्टीची वाटत होती आणि ती म्हणजे निगूडाची आणि त्याच्या साथीदारांची. तिच्या पळून जाण्याची जर त्यांना चाहूल लागली असली तर ते पाठलाग केल्याशिवाय कधीच राहणार नाहीत याची तिला खात्री होती. आणि म्हणूनच ती, हा विचार मनात येताच पुन: दुप्पट वेगाने पळू लागत होती.

तिला शरीर आहे याचा जणू तिला विसरच पडला होता. दुसऱ्याच एका अती वेगवान शक्तीच्या ती स्वाधीन झाली होती. नव्हे, या शक्तीशी ती एकरूपच झाली होती.

ती किती वेळ पळत राहिली होती आणि पळताना तिने कोणकोणत्या दिशा बदलल्या होत्या याचं तिला भानच राहिलेलं नव्हतं. शेवटी पळत पळत ती एका उंच डगरीच्या पायथ्याशी येऊन थडकली. शरीरातील शक्तीच्या शिल्लक असलेल्या वेगात ती पाव डगर आपोआप चढून गेली. आणि मग एकाएकी कोलमडून तोंडावर पडली. तिच्या कपाळाला आडव्या पडलेल्या झाडाचं खोड जोरात लागलं.

त्या जबरदस्त माराने तिच्या डोळ्यांपुढे लालजर्द ठिणग्या उडाल्या आणि दुसऱ्याच क्षणाला ती बेशुद्ध झाली ! ¤

: ७ :

तिला शुद्ध आली तेव्हा तिचं सारं अंग गार गार पडलं होतं. जड झालं होतं. आणि केवळ थोडी देखील हालचाल करण्याचं त्राण तिच्यांत उरलेलं नव्हतं ! मग पडल्या जागेवरूनच वेड्यासारखी ती चोहोकडे टुकूटुकू पाहू लागली. कशापासूनही तिला काहीच बोध होईना. अशाच स्थितीत बराच वेळ गेल्यावर तिचं अंग हळू हळू गरम होऊ लागलं. दृष्टीही हळू हळू जीव धरू लागली. आणि समोर डोंगरांच्या सुळ्यावर टेकलेलं आभाळ, फाडून टाकलेल्या डुकरासारखं लाल दिसू लागलं. त्याच्याच वर एक भडक चांदणी चमकत होती. आणि दूर कुठे तरी वाहत्या पाण्याचा खळखळाट ऐकू येत होता. पाण्याचा आवाज ऐकल्याबरोबर आणि आभाळाच्या तांबड्या रंगाकडे पाहिल्याबरोबर तहानेने आणि भुकेने तिच्या पोटात कासावीस होऊ लागलं ! खाण्याची आठवण झाल्याबरोबर तिला स्वतःच्या वस्तीची आठवण झाली आणि निगूडाच्याही वस्तीची आठवण झाली.

समोर निश्चलपणे पसरलेल्या एवढ्या मोठ्या प्रदेशात तिचं एकटेपण तिला अतिशय भीति दाखवू लागलं. आणि भीतीच्या त्या पहिल्याच आवेगात तिच्या तोंडून एक भीषण किंकाळी बाहेर पडली. तिचा वेग तीराप्रमाणे त्या शांत वातावरणाला कापीत निघून गेला. आणि समोरच्या डोंगरात त्याचा प्रतिध्वनी उमटला. तिथे तिच्या किंकाळीचा आवाज अनेकपटींनी मोठा होऊन घुमत राहिला आणि मग विरून गेला. पुनः ते वातावरण शांत झालं. पूरिया टकटकत्या डोळ्यांनी चोहोकडे पाहतच राहिली.

जेव्हा संपूर्ण उजाडलं, तेव्हा दृष्टी फाटून जाईल एवढा मोठा अफाट परिसर तिच्या भोवती पसरला असल्याचं तिनं पाहिलं. किर्र झाडी, उंच डोंगर, लांबच लांब पसरलेले माळ आणि खोल दरीतून कोसळणारा पाण्याचा धबधबा ! या एवढ्या मोठ्या अफाट पसाऱ्यात पूरियाला स्वतःचं एकटेपण एकदम जाणवलं. आणि त्याच एका क्षणाला तिच्या पोटात विलक्षण कालवाकालव होऊन तिला रडू कोसळलं.

खूप रडून झाल्यावर तिचा जीव बराच हलका झाला. मग तिने जाग्यावरनं उठण्याचा प्रयत्न केला. उभी राहिल्यावर पुनः एकदा आपल्या भोवतीच गोल फिरून तिनं सभोवार पाहून घेतलं. परंतु आसपास एकही वस्ती असल्याचं तिला दिसून आलं नाही. मग मात्र तिची भीतीनं गाळण उडून गेली. आसऱ्यातून सुटून ती मृत्यूच्या दाढेत येऊन पोहोचली होती. आता कोणत्याही वेळी ती मृत्यूची शिकार होणं शक्य होतं. जेव्हा तिच्या मनांत जिवाच्या भीतीचा विचार स्पष्टपणे आला त्याच वेळी केवळ सहज प्रेरणेनं ती खाली वाकली आणि जमिनीवरचा एक भला मोठा दगड तिने हातात उचलून घेतला. मग एक एक पाऊल चालत ती पाण्याजवळ पोहोचली.

पोटभर पाणी प्याल्यावर तिला बरीच हुषारी वाटू लागली. पाण्याने गच्च भरल्यामुळे तिला लगेच जडपणा आला; आणि डोळ्यावर झोप पण येऊ लागली. रात्रभर आणि त्यापूर्वीची रात्र पण ती झोपली नव्हती ! कुठे तरी निवाऱ्याची जागा शोधण आता तिला अत्यंत आवश्यक वाटू लागलं ! मग जाता जाता तिने एका झाडाची फांदी तोडली. दगडाने तिचं एक टोक निमुळतं करून त्याला धार आणली. आणि ते हत्यार बरोबर घेऊन ती चालू लागली.

भर दुपारच्या वेळी दोन डोंगरांच्या ती खाप्यांत आली. थोडीशी आत घुसल्यावर तिथे तिला एक गार गुहा दिसली. गुहेची नुसती कल्पना आल्याबरोबर तिला विलक्षण आनंद झाला. मग अत्यंत सावधगिरीने एकएक पाऊल पुढे टाकीत ती त्या गुहेच्या अगदी तोंडाजवळ आली. तिथं संपूर्ण शांतता होती ! त्यामुळे तिचा धीर आणखी वाढला. जवळच असलेल्या एका झाडाच्या खोडाचा आधार घेऊन तिनं मग हळूच आत डोकावून पाहिलं. आणि तिचे डोळे आश्चर्याने चकाकून निघाले !

गुहेच्या गाभाऱ्यात अत्यंत अडचणीच्या जागी हिरव्यागार पाल्यापाचोळ्यांत, तीन कोवळी कोवळी कोल्हीची पिलं एकमेकांचं अंग चाटीत बसली होती ! — त्या लालचुटुक पिलांना पाहिल्याबरोबर, दुसरा कसलाही विचार मनात येण्याच्या आधी पूरिया एकदम त्यांच्यावर तुटून पडली. त्यांना घोळून तिनं मारलं आणि निर्धास्तपणे पोटाची आग विझविली ! तिच्या पोटात गरम गरम कोवळं लुसलुशीत मांस गेल्यावर तिचे सारे स्नायू ताजेतवाने झाले. आणि पुढच्या उद्योगाला लागले.

–त्या पिलांचे आईबाप आले तर त्यांच्यापासून बचाव करायला हवा होता. शक्य झालं तर त्यांची शिकारही करायला हवी होती. आणि त्या गुहेचं स्वामित्त्व कायम करून टाकायची तर अत्यंत आवश्यकता होती ! ¤

: ८ :

त्यानंतर कित्येक दिवस लोटले. पूरियावर अनेक संकटं येऊन गेली. जीव वाचविण्याकरिता आणि जीव जगविण्याकरिता तिला अनेक दिव्यातून जावं लागलं. आपल्या वस्तीचा शोध घेण्याकरिता अनेकदा तिनं मोठमोठाले धोके पत्करले; परंतु शेवटी ती एवटीच राहिली ? ती गुहाच तिचं जग होऊन बसली. जसजसे दिवस लोटू लागले तसतसा तिच्या शरिरातही बदल होऊ लागल्याचं तिला जाणवू लागलं. तिला विलक्षण खावखाव सुटली. कित्येक वेळा तर ती कसल्याही झाडांचा पाला बेलाशक ओरबाडून खाऊ लागली ! आणि नदीवर पाणी पिण्याकरिता गेली की, नदीकाठची पातळ चिकण मातीच तिला खावीशी वाटू लागली. असल्या खवखवलेल्या अवस्थेत मग कधी कधी तिला वडीगाची आठवण होऊ लागली आणि आपला एकाकीपणा फारच जाणवू लागला. तिचा हा अगतिकपणा पराकोटीला पोहोचला की, ती मग वेड्यासारखं खूप धावत सुटे, धावून धावून जीव थकला की, एखाद्या मोठ्या झाडाच्या खोडाला ती विळखा घालून त्याला कडकडून मिठी मारी ! आपल्या निराधार शरिराला तो आधार त्या वेळी तिला फार फार बरा वाटे !

पुढे पुढे तर तिच्या पोटात होत असलेली वाढ तिला स्पष्ट जाणवू लागली आणि शरीरात भरत असलेला जडपणाही तिला कळू लागला.

मग मात्र ती खचू लागली. दिवस दिवस अंधाऱ्या गुहेत पडून राहू लागली.

एकदा तर ती खूप खाऊन सुस्तावली होती. जागचं हलण्याइतकी देखील शक्ती तिच्यात उरली नव्हती. जड होऊन ती गुहेच्या तोंडाशी पडून राहिली. त्या वेळी बळीच रात्र उलटून गेली होती, तरी तिला झोप येत नव्हती. आता वातावरणात बराच बदल झालेला होता. झाडाची पानं वाळून गळून पडू लागली होती. हवेबरोबर गिरक्या घेऊन अधांतरी उडत होती. चहूकडून उष्ण वारे वाहू लागले होते. कधी कधी तर मोठमोठी वावधानं सुटत होती. सुईऽसुईऽऽ असा आवाज काढीत साऱ्या आसमंतांत थैमान घालीत होती. त्या वेगवान वाऱ्याबरोबर जमिनीवरची धूळही वर उठत होती आणि गोल सळ-नळीत आकार धारण करून चहूकडे फिरत होती. रात्रभर वारे असे मोकळे खेळत राहात होते. पूरिया या वेळी झोपेवाचून तशीच पडली होती. तेवढ्यात पलीकडच्या झाडीत काही तरी खुसखुसलं, त्याबरोबर पूरियाच्या जिवाचा थरकाप उडला. तिच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला आणि नजर तीक्ष्ण करून ती अंधारात पाहू लागली. तत्काळ उठून अधिक सुरक्षित ठिकाणी जाण्याचं देखील तिला सुचलं नाही.

दुसऱ्याच क्षणी काळ्या कुट्ट अंधारात दोन डोळे चमकले आणि पूरियाला भयाने किंकाळी फोडण्याचंही भान राहिलं नाही! ती पडली होती तशीच जमिनीला चिकटून बसली. सावज हळूहळू पुढे येत होतं. विलक्षण मंद गतीनं पुढं सरकत होतं. त्याचा रोख पूरियाच्या दिशेनंच होता. तिने तर आता जिवाची आशाच सोडून दिली होती.

ते जनावर हळूहळू पुढे सरकतच होतं. एवढ्या विलक्षण अवस्थेतही पूरियाच्या एक गोष्ट लक्षात आली होती. सावज बाहेर पडलं होतं, परंतु त्याचे पवित्रे मात्र शिकारीचे नव्हते. त्याची गती अत्यंत संथ होती. त्याच्या चालीत इतका जडपणा होता की ते कसलं तरी अवजड ओझं बाळगीत आहे असं स्पष्ट जाणवत होतं!

परंतु ते जव्हा केवळ दोन हाताच्या अंतरावर येऊन भिडलं तेव्हा तिनं त्याला संपूर्ण पाहिलं. ती एक लांबलचक वाघीण होती. पिवळी धमक आणि काळ्या पट्ट्यांनी बरबटलेली. तिचं पोट टम्म फुगलेलं होतं. मोठ्या कष्टाने ती एक एक पाऊल पुढे टाकीत होती. तिच्या चेहऱ्यावर जातिवंत क्रूरता असली तरी डोळ्यात कारुण्य झाकाळलेलं होतं. तहानेनं तिचा जीव व्याकूळ झालेला दिसत होता. पूरिया केवळ जागच्या जागीच खिळून हे सारं पाहात होती. ती वाघीण पूरियाच्या अगदी जवळून निघून गेली. परंतु तिच्याकडे तिने ढुंकूनही पाहिलं नाही. ते अवजड, पोटी भारावलेलं जनावर जेव्हा दृष्टीआड झालं तेव्हा पूरिया सावरली. आपलंही जड शरीर सावरीत गुहेच्या आत जाऊन बसली. गुहेचं तोंड बंद करून मग स्वस्थपणे, निर्धास्तपणे पडून राहिली!

गुहेचं तोंड बंद होतं तरी तिला आपल्या सुरक्षितपणाची शंका वाटत होती. डोळ्यावर झापड आली होती, तरी पापण्या मिटून घ्यायचं तिला भय वाटत होतं! न जाणो ती वाघीण सरळ आत आली तर? आणि असा विचार मनात आल्यावर तिचं मस्तक इतकं भ्रमत होतं, की प्रत्यक्ष आपल्यासमोर ती वाघीण उभी असल्याचा तिला भास होत होता! लगेच गुहेच्या तोंडावरचं झाकण कुणी तरी उघडीत असल्याचा आवाज तिच्या कानाच्या पडद्यावर येऊन आदळत होता.——आणि असा भास झाल्याबरोबर तिच्या विचारांची साखळीच तुटत होती. झोपेत एखाद्या माणसाला आपण आभाळातून खाली पडत आहोत, आणि खाली देखील जमीन नाही तर नुसता काळोख दाटलेला आहे असा भास व्हावा म्हणजे त्याच्या मनाची जशी स्थिती होईल तशी पूरियाची झाली होती!

मनाच्या अशा भयंकर अवस्थेत ती अर्धी रात्र उलटून जाईपर्यंत होती. शेवटी काय झाले ते समजण्याइतका देखील तिचा मेंदू ठिकाणवर राहिला नाही आणि केव्हा तरी तिला झोप लागली. अगदी गाढ झोप लागली.

दुसरे दिवशी दिवस उगवून खूप वर आला तरी तिला जाग आली नाही! ◻

## : ९ :

आकाशात सरासर चढलेले ढग, विचारांच्या धुंद अवस्थेत आणि अंधाऱ्या रात्रीच्या मिट्ट काळोखात निगूडाच्या आणि इतर कोणाच्याही लक्षात आलेले नव्हते. पाहता पाहता वरच्या बाजूच्या उंच डोंगरांनी ढगांना आडविलं, उकाडा वाढला. वारा पडला. आणि मधून मधून विजाही कडकडू लागल्या! जेव्हा एखादा भला मोठा कडा कोसळल्यासारखा कडकडाट झाला आणि भाल्याच्या पात्यासारखी लखकन् वीज तळपून गेली तेव्हा निगूडा एकदम भानावर आला. तडकन् उठून बसला. मग हात डोक्यावर घेऊन उगीच उभा राहिला! त्याचवेळी आकाशातून दुसरा विजेचा लोळ तुटला आणि अंधाराला फाडीत फाडीत कुठेतरी लुप्त झाला. आणि सरसरत्या प्रकाशात, सुस्तावलेल्या झोपड्या लखलखून गेल्या. जवळच डोळे उघडे ठेवून पडलेल्या निमूवाचा चेहराही उजळून निघाला!

दुसऱ्याच क्षणाला निगूडा तिच्या जवळ गेला. आता त्याच्या चेहऱ्यावर कसले तरी गांभीर्य पसरलं होतं. पूर्वीची तळमळ, तुटपुंज्या विचारांचे धागे, पूरियाच्या आठवणीचे काही प्रसंग तटातट तुटून पडले! आणि त्या ठिकाणी काळजीनं घर केलं! रात्रीच्या अंधारात काहीही दिसत नव्हतं. आता हळूहळू वादळ जोर करू लागलं होतं. मातलेला वारा झाडांच्या शेंड्यावरचे ढगळे घुसळून काढीत होता. लहान लहान झुडपं जमिनीवर लोळण घेत होती. डोंगराच्या कपारीत शिरलेला वारा कर्कश शिट्टीचा फुंकीत बाहेर पडत होता, अंधाराच्या दडस पडद्यांनाही हलवीत होता! त्या साऱ्या प्रपातात सापडलेली भेकड जनावरं चित्कारत होती. तशातच क्रूर आणि बलवान श्वापदांच्या डरकाळ्याही गगनाला भिडत होत्या, प्रतिध्वनित होऊन पुन्हा पृथ्वीवर आपटत होत्या! चहूकडून भीतीच भीती दाटत चालली होती!

मग काही वेळातच पावसाच्या सरी कोसळायला सुरुवात झाली. रपरपणाऱ्या त्या पावसाच्या ध्वनीनं पुन्हा सारं वातावरण हादरून गेलं. जमिनीला कंप सुटला. आणि पाहता पाहता पाण्याचे लोंढे सपाट जमिनीवरून वाहू लागले. आता त्या वस्तीतला प्रत्येक जीव खडबडून जागा झाला होता. एकमेकांना आरोळ्या मारू लागला

होता. चहूंकडून मदतीच्या सादा घालणं सुरू झालं. पावसाने आणि वादळाने इतका हैदोस घातला की, दोन झोपड्या क्षणार्धात आडव्या पडल्या. मुलं अंधारात कोकलू लागली. बायका एकीकडे त्यांना छातीशी धरू लागल्या. दुसरीकडे जीव सोडू लागल्या आणि मोठ-मोठ्याने गळा काढून रडू लागल्या! विजेच्या लपक्यात त्यांची भ्यालेली, थरथरणारी शरीरं उजळून निघू लागली. आणि दुसऱ्याच क्षणात अंधाराच्या जबड्यात गिळली जाऊ लागली!

—पाहता पाहता चहूकडून गुडघा गुडघा पाणी वाहू लागलं. तेव्हा निगूडा साऱ्या झोपड्यातून फिरून आला होता. बहुतेक साऱ्यांना त्याने धीर दिला होता. उदगा, बिहूडा, केडा वगैरे मंडळी एकत्र जमली होती. निराधार माणसांना सुरक्षित झोपड्यात आणून टाकीत होती. तसंच, खाण्याचे जमवून ठेवलेलं सामान एकत्र आणलं जात होतं. कंदमुळे, वाळवून ठेवलेले मासे, कासवांच्या पाठी, ससाच्या कातडीच्या वस्तू, हत्यारे आणि इतर त्याच्या दृष्टीनं महत्त्वाचं सामान भराभर हलविलं जात होतं—पाऊस दणा दणा पडतच होता. विजा कडाडत होत्या. मोठमोठाले आगीचे लोळ सटासट तुटून पडत होते.

असं सरासरी घटका दोन घटका चालू राहिलं होतं. मग पाऊस थांबला, वाराही थांबला, विजा लुप्त झाल्या. सारं वातावरण हळू हळू पूर्वपदावर येऊ लागलं. फक्त बेसुमार गारवा वाढलेला होता.

—गारवा वाढत चालला होता. आणि आता पाऊस येणार नाही असं वाटत होतं. परंतु ते खरं नव्हतं. मध्येच एखादी पावसाची सर येत होती. मांजरांची कळवंड जोरात सुरू व्हावी, आणि थांबावी; वातावरणात कालवलेले आवाज शांत व्हावेत. आणि आता सारं शांत झालं असं वाटावं. परंतु मध्येच दोन्हीपैकी पुन्हा एखाद्या मांजराने गुरगुरावे, तसे शांत झालेले आभाळ मध्येच गुरगुरत होते! आणि दूर क्षितिजावर विजेच्या बारीक तारा सळसळत होत्या.

मध्यरात्र टळून गेली तरी हे असंच चाललं होतं. वस्तीवर कोणाला झोपा येण्याचा प्रश्नच नव्हता! कारण आडवं होण्याकरिता एवढीशी देखील कोरडी जागा कुठे उरली नव्हती! परंतु भीतीमुळे देखील कुणाला झोप येत नव्हती. ती सबंध रात्र निगूडाच्या वस्तीवरच्या लोकांनी जागून काढली.

कर्ती माणसं एका बाजूस जमून पुढचा विचार करीत होती. मनात आलेले विचार एकमेकांना बोलून दाखवीत होती. त्या बोलण्याला सल्लामसलतीचे स्वरूप आलेले होते.

निगूडा आणि उदगा बोलण्यात विशेष भाग घेत नव्हते. केडा लोकांशी अधून मधून काही बोलत होता. मध्येच मागच्या त्याच्या तरुणपणीच्या आठवणीतले काही प्रसंग सांगत होता. वेळोवेळी अशा संकटांना कसे तोंड दिले, पिरंगुळा कसे वागला ते सारे तो सांगत होता.

यातच रात्र उलटली.

मग सकाळचे वारे सुटले. प्रकाश फाकू लागला. आकाश बरंच निवळलं. सूर्य उगवून थोडा वर आला. रात्रीचा सर्व उत्पात आता स्पष्ट उजेडात आला होता. तेव्हा निगूडा शांतपणे एका मोठ्या दगडावर बसला होता. दूर दिसणाऱ्या काळ्यानिळ्या डोंगरांकडे पाहात होता. चित्र झालेल्या झाडांच्या पानांकडे पाहात होता. आणि समोरून फेसाळत धोऽधोऽ वाहणाऱ्या त्या नदीकडे पाहताना त्याच्या डोळ्यातली बुबळं फिरत होती! त्या गढूळ आणि रगेल पाण्याकडे पाहताना तो भांबावून गेला होता.

रात्रीच्या वादळात कोसळून पडलेले मोठमोठाले वृक्ष त्या फेसाळ-णाऱ्या गढूळ पाण्यातून असहाय्यपणे प्रवाहाबरोबर वाहात जात होते! त्या साऱ्या परिसराचा एका रात्रीत भयंकर कायापालट झालेला दिसत होता. पृथ्वीच्या त्या साऱ्या एकदम बदललेल्या रूपा-कडे पाहण्याची निगूडाची हिम्मतच होत नव्हती. त्या साऱ्या घडा-मोडीचा त्याच्या प्राथमिक अवस्थेत असलेल्या मेंदूत अर्थच उमटत नव्हता. त्यामुळेच तो विलक्षण गलबलून गेला होता.

त्यांनी तयार केलेल्या झोपड्यांपैकी काही जमीनदोस्त झाल्या होत्या. काही वाकड्यातिकड्या झाल्या होत्या. काही माणसं दुखावली होती, काही जबर जखमी झाली होती. आणि एक म्हातारी तर बेपत्ताच होती!

आणि या साऱ्यावर निगूडाला काही उपाय सापडत नव्हता. त्याच्या डोक्यात काही उमटेना, काही उजळेना! उलट दहशतीनं त्याचं मस्तक अधिकच बधीर होऊ लागलं. दुसरीकडे त्याचा संताप वाढू लागला होता. मात्र हा संताप कोणाविरूद्ध आहे हे त्याचं त्यालाच उमगलं नव्हतं!

—त्या तिरीमिरींतच त्याने उद्गाला दोन चार हाका मारल्या.

उदगा झोपड्या झोपड्यांतू माणसांची व्यवस्था लावण्यात गुंतला होता. काही मुलं भूक भूक म्हणून ओरडत होती. बोचणाऱ्या गारव्याविरुद्ध, कापीत सुटणाऱ्या थंडीविरुद्ध, पोटातल्या न कळणाऱ्या भुकेविरुद्ध त्यांची तक्रार होती. त्यांच्या आयांनाही त्या वेळी काहीच सुचत नव्हतं. तिथलं सारं जीवनच गलबलून गेलं होतं. भीतीनं शहारून उठलं होतं. खंबीर तरुण त्यावर इलाज करीत होते. प्रत्येकाला धीर देत होते. म्हातारी माणसेही तेच काम करीत होती. त्यांनी मागे घेतलेले आणि त्यापैकी त्यांना आता आठवणारे अनुभव जसे सांगता येतील तसे ते सांगत होते. घाबरण्याचं कारण नाही म्हणून दिलासा देत होते. आणि पोरासोरांना आपल्या पाठीशी घेत होते.

—निगूडाने उदगाला मारलेल्या हाका साऱ्या झोपड्यांतून निनादल्या. आणि उदगा धावतच निगूडाजवळ गेला. त्याचं सारं शरीर ओलं झालं होतं. डोक्यातील केसामधून पाण्याच्या धारा छातीवर आणि पाठीवर ओघळत होत्या. कमरेभोवती गुंडाळलेलं झाडांच्या पानांचं वस्त्र निथळत होतं!

त्याच अवस्थेत तो निगूडाच्या समोर जाऊन उभा राहिला. उजवा पाय उचलून त्याने तिथल्या दगडावर ठेवला होता. तो सबंध पाय गुडघ्यापर्यंत चिखलात बरबटलेला होता. त्याचीही मुद्रा घाबरलेली दिसत होती. दोघेही तरणेबांड आणि निधड्या छातीचे असले तरी अनुभवाच्या दृष्टीने ते अगदी लहान बच्चे होते! म्हणूनच या प्रसंगाची भीती त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

दोघांनी एकमेकांकडे पाहिलं. दोन शक्ती एकवटल्या. मग डोळे मजळले. छात्या फुलल्या. आणि चांगली घटकाभर त्या दोघांत बरीच बातचीत झाली! त्यानंतर उदगा माघारी गेला. आणि केडाला

पृष्ठ ४८ वर

## बालनाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने ...

पृष्ठ ९ वरून

वणारे मी आणि सौ. प्रतिभा, 'लिटल थिएटर 'वाली सुधा करमरकर, 'नवल रंगभूमी 'चे नरेंद्र बल्लाळ, किशोर कला केंद्राचे कुमार शाहू अशी काही अव्यवहारी मंडळी मुंबईत आहेत. पुण्यात भरत नाट्य संशोधनमंदिर आहे, संपदा थिएटर्स आहे, नागपुरात 'रंजन' पूर्वी बालनाट्ये करी; आता 'रंगरेखा' आहे.

काही व्यवहारी मंडळींनी मुलांची नाटके करूनही धंदा करता येतो का ते पाहिले – पण त्यांचे शहाणपणही फुकट गेले. इंडियन नॅशनल थिएटर, गोवा हिंदू असो., ललितकलासाधना इ. संस्थांनी एकेक बालनाट्य करून पाहिले आणि ते वेळीच सावध झाले. पणशीकरसुद्धा गप्पा मारताना उगाच गंमत म्हणून बालनाट्यविभाग जाहीर करतात –

तर अशा या सगळ्या अव्यवहारी मंडळींची नाटके मुलांना दाखवण्यासाठी महाराष्ट्र शासन दरवर्षी एक बालनाट्यमहोत्सव रविंद्र नाट्यमंदिर या स्वतःच्या आलिशान नाट्यगृहांत भरवते. या एका चांगल्या गोष्टीसाठी शासनाला शंभर चुका माफ ! या महोत्सवांत स्पर्धाबिर्धा न घेता शासन सरळ सात संस्थांना आमंत्रण करते, त्यांना मानधन देते, बाहेरगावच्या संस्थांना तर प्रवास खर्च देते, त्यांची राहण्याची व्यवस्थाही करते. थिएटर बालका–पालकांनी सात दिवस भरून जाते. मुलांना सात नाटके एकत्र बघायला मिळतात. भलतीच मजा येते. पोरांच्या हंशाटाळ्यांनी 'रवींद्र' टवटवीत होऊन जाते. पाचसात वर्षे असे चालले आहे. गेली दोन वर्षे 'बांगला देश' आणि 'दुष्काळ'–सॉरी, 'टंचाई' असल्यामुळे हा महोत्सव झाला नाही. पण यंदा २४ ते ३० डिसेंबला तो झाला. मुख्य म्हणजे सरकार कंटाळवाणे परिसंवाद वगैरे न घेता चक्क सात नाटकेच मुलांसाठी करते, हे खूप चांगले – काहीतरी 'कन्स्ट्रक्टिव्ह.'

आता या सगळ्याच नाटकांचा दर्जा सारखा नसतो–काहीकाही तर चक्क भिक्कार असतात, हे सगळे कबूल ! पण बालरंगभूमीच्या पोरक्या पोराच्या डोक्यावरून शासन वर्षातून एकदा का होईना, पण मायेने हात फिरवते हे काही कमी नाही. शिवाय असे बघा, बालनाट्यसंस्थांचा दर्जा सुधारणार कसा ? पैशांची चणचण तर आहेच– पण गुणांचीही वाण आहे ! बालनाट्य लिहिणे कठीण आहे, पण ज्यांना ते जमते ते लोक तरी किफायतशीर प्रौढ नाटकांतून वेळ काढून नाटके लिहितील का ? कोण लिहील ? एकही नाव माझ्या डोळ्यापुढे येत नाही.

जे लिखाणाचे तेच नटांचे. 'नाइट'च्या लोभाने व्यावसायिक नाटकातल्या चिल्लर भूमिकांत अडकून पडलेले गुणी नट जिथे हौशी प्रौढ नाटकांना लाभत नाहीत तिथे बालनाट्यांना कुठून लाभणार ? तेव्हा बालरंगभूमीविषयी कळकळ असणारी, तिच्यासाठी थोडाफार त्याग करायला तयार असलेली मंडळी इथे हवीत. एरवी जमणार नाही.

आणि प्रेक्षक ? मुलांना नाटके पाहायला आवडतात. पण जे मुलांना अगत्याने नाटकांना पाठवतात असे पालक कितीसे ? शिवाजी पार्कवरचे, फार फार तर गिरगावातले थोडेसे. प्रत्येक शाळेत नको इतक्या संख्येने मुले असतात – आणि अशा शाळा मुंबई आणि पुण्यात किती आहेत ? पण बालनाट्यसंस्था आणि हा प्रेक्षकवर्ग यांच्यामध्ये उभे आहेत पालक – शाळाचालक ! त्यांना बालरंगभूमीचे महत्त्व पटेल तर ना ?

महत्त्व पटणे तर राहोच; परंतु बालरंगभूमीविषयी एक प्रकारची तुच्छता सर्रास दाखवली जाते. बाहेरच्या लोकातच नव्हे, खुद्द रंगभूमीशी संबंधीत लोकांकडूनही. 'तुमचं मुलांचं नाटक आहे ना ? मग त्याचं काय एवढं' हा सूर थिएटरवाल्यांपासून नेपथ्य करणाऱ्या सुतारापर्यंत प्रत्येकाचा असतो. आणि गंमतीची गोष्ट म्हणजे ज्या प्रौढ नाटकांसाठी ही मंडळी अटीतटीला येऊन काम करते, त्यातली सत्तर टक्के नाटके बालनाट्यापेक्षाही अधिक बालिश असतात.

कारण खरोखरीचे 'बालनाट्य' हे बहुतेकांचा गैरसमज असतो, त्याप्रमाणे पोरकटपणाचे नसतेच. जसे तमाशा हा केवळ ग्रामीण लोकांच्या रंजनासाठी नसून ती रंगभूमीचीच एक विशिष्ठ शैली आहे. 'कार्टून' म्हणजे केवळ वेडेवाकडे चित्र नसून तो चित्रकलेचा एक कठीण प्रकार आहे, त्याचप्रमाणे 'बालनाट्य' म्हणजे केवळ मुलांचे नाटक नसून तो नाट्यकलेचा एक स्वतंत्र आविष्कार आहे. परंतु बालनाट्याचे हे स्वरूप समजून घेण्याइतके प्रौढ रसिक आपल्यात कितीसे असतील ?


या साऱ्याच उणीवांमुळे, गेल्या पंधरा वर्षांत आपल्याकडे बालरंगभूमीची प्रगती विलक्षण मंद आहे. कारण ज्या संस्था बालनाट्ये करीत आहेत त्यांच्यापुढे संस्था नुसती टिकवावी कशी हाच प्रश्न आहे. तुटपुंजे सरकारी अनुदान, आणि कार्यकर्त्यांचा अमर्याद उत्साह याच भांडवलांवर हे डोलारे सांभाळले जात आहेत. म्हणून गेल्या पंधरा वर्षांत नाव घेण्यासारख्या दोन-तीन संस्था आणि पाच पंचवीस नाटके हीच बालरंगभूमीची कमाई. पण तीही दुर्लक्षणीय नव्हे. नाटके न पाहता नुसते लेख लिहिणारे आणि परिसंवाद भरवणारे जे लोक असतात, त्यांच्या ठराविक आरोपांपैकी एक : बालरंगभूमीवर निव्वळ परीकथा असतात. दुसरे काही नसतेच. आमच्या मर्यादांमध्ये दुसरे तसे पुष्कळ आम्ही करण्याचा प्रयत्न केला आहे. फार्स (अदृश्य माणूस), पॅरडी (निम्माशिम्मा राक्षस), शास्त्रीय (बल्लाळाचे 'मंगळावर स्वारी') रूपकात्मक (राक्षसराज झिंदाबाद) –हे प्रकार प्रौढ रंगभूमीवर तरी कितीसे आले आहेत ? प्रौढ रंगभूमीवर ज्या प्रतीकात्मक नेपथ्याचे कौतुक अजून चालू आहे ते नेपथ्य दहा-बारा वर्षांपूर्वीपासूनच आम्ही (निम्माशिम्मा, अचाट गावची अफाट मावशी) बालरंगभूमीवर मांडीत आलो आहोत. मुलांनाही ते समजत आले आहे.


आणखी पुष्कळ करून पाहण्यासारखे आहे. प्रश्न एवढाच की ते करायचे कुणाच्या जिवावर ? शाळांमधून 'बालनाट्यां'चे प्रयोग व्हावेत यासाठी काहीही करू न शकणाऱ्या शिक्षणखात्याच्या ? की बालनाट्याकडे तुच्छतेने पाहाणाऱ्या मठ्ठ व्यावसायिक निर्मात्यांच्या ? कोरडी भाषणे ठोकून बालनाट्यातल्या त्रुटी काढणाऱ्या बुद्धिमान टीकाकारांच्या ? 'दर परवडत नाही' म्हणून रडणाऱ्या पालकांच्या ? की 'मुलांची नाटके नकोतच. आमचा वेळ जातो.' अशी तक्रार करणाऱ्या शाळाचालकांच्या ?

–तेव्हा वाटते अधिक मूर्खपणा न करता बालनाट्यसंस्था बंदच कराव्यात !

पण पुन्हा एखादा, या महोत्सवासारखा मेळावा जमतो. मुले रंगीबेरंगी कपडे घालून चिवचिवत जमतात. टाळ्या वाजवीत, हसत, प्रश्न विचारीत, गडबड करीत नाटक पाहतात. मुलांच्या नाटकाचा दिवस दिवाळीसारखा मानतात. मग वाटते, आजच्या मुलांच्या आजूबाजूचे सगळे वातावरण काजळलेले असताना, त्यांच्यासाठी मिणमिणणाऱ्या या चार-दोन पणत्याही विझवण्याचा करंटेपणा आपण कसा करावा !









परीकथेतील
राजकुमारचे
एक दृश्य



नवल रंगभूमी निर्मित
राजाला फुटले पंख



बालनाट्याचा प्रेक्षक
यात तीस टक्के प्रौढ असतात.

# अवांतर

## शरद गोखले

फिल्म इन्स्टिटयूटचा जमाना सुरू होण्यापूर्वीची गोष्ट आहे ही. नवीन मंडळींची फिल्म लाईनमध्ये नवीन भरती करण्यासाठी 'फिल्मालय' या त्या वेळी मोठ्या असलेल्या संस्थेने एक अॅक्टिंग स्कूल चालवले होते. शिवाय काही फुटकळ प्रयत्नही चालू होतेच. अशा फुटकळ प्रयत्नातून जी मंडळी कलाकार म्हणून नावारूपाला आली त्यामध्ये विनोद खन्ना आणि लीना चंदावरकर ही महत्त्वपूर्ण नावे आहेत.

भूमिका लहान असो, मोठी असो, बरोबरची मंडळी नवीन असोत अथवा जुनी असोत, वाटचाला येईल ती भूमिका मनापासून करून वाटचाल करणाऱ्या मंडळीमध्ये वावरणारा विनोद आज गुलझारच्या 'अचानक'मुळे एकदम प्रकाशझोतामध्ये न्हाऊन निघाला आहे. अचानकसंबंधी तुम्हाला अनेक मते आढळतील–गुलझारचे अचानक सर्वांच्याच पसंतीस उतरले आहे असे नव्हे. तथापी अचानक या चित्राला नाके मुरडणारा प्राणीही विनोद खन्ना याने साकार केलेल्या मेजर रणजीतला दाद देऊन जातो. माझा भाचा एकदम फौजी आहे. अचानकमधील लष्करी भागासंबंधी तो पोटतिडकीने बोलत होता. पण विषय मेजर रणजीतकडे वळताच त्याने विनोदला मनापासून दाद दिली. साला, एकदम फौजी वाटतो. अचानकमधील प्रमुख भूमिकेसाठी प्रारंभी धर्मेन्द्रचे नाव होते. धर्मेन्द्रने रणजीत उभा केला असता तर त्याच्या अनेक चित्रपटांपैकी 'अचानक' हे एक चित्र झाले असते. तथापी पथ्थर और पायल, दो यार, चौकीदार, परछाइयाँ, गद्दार, एलान, अशा दे दनादन थाटाच्या चित्रपटामध्ये वावरणाऱ्या विनोदची या भूमिकेसाठी निवड झाली, ती प्रामुख्याने सलग तारखांची उपलब्धता पाहून. अचानकचे चित्रीकरण सुरू झाले आणि विनोद पूर्णपणे या चित्रपटामध्ये गुरफटला गेला. पडद्यावर त्याने साकारलेल्या रणजीतखेरीज त्याच्या डोक्यामध्ये काही नव्हते. स्वतः विनोद म्हणतो–माझ्या वाटचाला आलेल्या चाळीस भूमिकेपैकी सर्वोत्तम भूमिका कोणती असे विचारल्यास मी अचानकमधील मेजर रणजीतचा उल्लेख करीन. वरील मत हे अचानकच्या विविध भारतीवर गरजणाऱ्या जाहिरातीवरील मत नव्हे. तर कलाकाराचे खरेखुरे मत.


कलाकार कितीही मोठा असला तरी त्याच्या वाटचाला योग्य भूमिका यावी लागते. रायगडला जेव्हा जाग येते या नाटकापूर्वी काशीनाथ घाणेकर किंवा तो मी नव्हेचपूर्वी प्रभाकर पणशीकर–कित्येक वर्षे नाट्य व्यवसायामध्ये कलाकार म्हणून वावरत होते. मण वरील नाटकांनी तेजाळणारे यश वाटचाला आल्यावरच वरील दोन्ही कलाकारांचे नाव झाले. विनोदच्या बाबतीतही असेच म्हणता येईल. कलाकार म्हणून त्याचे बस्तान अचानक पूर्वीच चांगले बसले होते. अत्यंत तीव्र स्पर्धा असूनही वर्षाला तीन चार चित्रपट सहज वितरित होत होते. संपन्न आयुष्य जगता यावे एवढी रक्कम बँकेत जमा होत होती. पण महत्त्वाकांक्षी कलाकार एवढयाने संतुष्ट होत नाही. त्याला नावाची कदर असते. मेरेअपने मधील भूमिकेमुळे विनोदला नाव मिळाले आणि अचानकमुळे आज विनोदची स्वारी आघाडीच्या कलावंतामध्ये येऊन बसली आहे.

खास पंजाबी ढंगाने कमावलेली तब्येत, झकास उंची, काहीसा उभट उग्र चेहरा–विनोदला कोणी फिल्मी माणसाने पाहिले असते, आणि फिल्मसाठी निवड करण्याचे ठरवले असते, तर नायकाची नव्हे खलनायकाची भूमिका दिली असती. आणि त्यात काही गैर नव्हते. विनोदला पडद्यावर आणण्याचे श्रेय सुनिल दत्तला द्यावे लागेल. 'मन का मीत' हे विनोदचे पहिले चित्र. सुनिल दत्तच्या या चित्रामध्ये त्याने खलनायकाची भूमिका झकास वठवली होती. नायक होता सुनिलचा भाऊ सोमदत्त. या सोमदत्तचा पालापाचोळा झाला तर खलनायक म्हणून कारकीर्द सुरू करणारा विनोद आस्ते आस्ते नायक म्हणून रुपेरी पडद्यावर आला. सर्वसाधारणपणे कलाकार ज्यास्वरूपामध्ये प्रथम पडद्यावर येतो त्याच स्वरूपामध्ये त्याला पडद्यावर वावरावे लागते. कलाकाराचा हा 'टाईप' बदलणे निर्मात्याला आणि त्या कलाकारांच्या चाहत्यांना मुळीच पसंत नसते. पण विनोदच्या बाबतीत या महत्त्वाच्या बदलास मंजुरी मिळाली. शत्रुघ्न सिन्हा या वावटळी लोकप्रीयता मिळवणाऱ्या कलाकारासही अजूनही मंजुरी मिळालेली नाही. 'दो यार' हा तसा खास हिंदी ढंगाचाच चित्रपट. पण विनोद आणि शत्रुघ्न आमने सामने उभे राहिले. आणि चित्र एकदम तरारून उठले. मेरेअपनेच्या वेळी गुलझारसारखा खंदा आसामी कॅमेऱ्यामागे उभा होता. त्यामुळे याच जोडीचे हेच चित्र सरस उतरले तरी आश्चर्य वाटले नाही. शत्रुच्या वाटचाला आली तसली गुदमरवून टाकणारी लोकप्रियता विनोदच्या वाटचाला आली नाही. तरी दोघांची प्रगतो तशी समांतर म्हणावी लागेल. शत्रुला अजून नायक म्हणून मान्यता मिळायची आहे. गाय और गौरीमध्ये त्याचा प्रभाव पडला नाही. 'कश्मकश' नंतर त्याचे भवितव्य ठरायचे आहे. पण विनोद मात्र नायक म्हणून उभा राहिला आहे. अचानकच्या पाठोपाठ आत्माराम याच्या आरोपमध्ये विनोद प्रमुख भूमिकेमध्ये येत आहे. साजूक चेहऱ्याचा विनोद मेहरा त्याच्याबरोबर आहे. आणि

# विनोद खन्ना






मै मायके नही जाऊंगी


रो मत रानी रो मत... डायरेक्टर तो है अपने साथ..




नायिका आहे सायराबानू. विनोद सध्या जवळ जवळ आठ चित्रपटामध्ये प्रमुख भूमिका करीत आहे.

खलनायक म्हणून विनोदची लक्षणीय कामगिरी असलेले आणखी चित्र म्हणजे जे. ओमप्रकाश यांचे आन मिलो सजना. राजेश खन्ना आणि आशा पारेख यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या ' फॉर्म्युला ' चित्रपटामध्ये विनोदला खूप मोठा रोल होता. भूमिका साचेबंद असली तरी खलनायकी ढंगाच्या या भूमिकेमध्ये विनोदने स्वतःला छान झोकून दिले होते. त्याची ही भूमिका पाहिल्यावर प्रतिक्रिया उमटली होती ती जोरदार खलनायक मिळाल्याची. हा विनोद पुढे नायक म्हणून चमकणार आहे असे कोणी सांगितले असते तर आमच्या फिल्मी पंडितांनीही असे भाष्य करणाऱ्याला मुर्खामध्ये काढले असते. पण आस्ते कदम वाटचाल करणारा, प्रसिद्धीसाठी फिल्मी पत्रकारांच्या पुढे पुढे न करणारा विनोद आज आघाडीचा नायक बनला आहे.

आर्थिक सुस्थिरता आली तरी लग्नाच्या बाबतीत हे फिल्मी सितारे उदासिन असतात. पण सत्तर सालीच लग्नाच्या मांडवाखालून गेलेला विनोद ' लाल त्रिकोणांकित ' सुखी परिवाराचा कर्ता पुरुष आहे.

बालबच्चेवाला असूनही दमदार वाटचाल करणाऱ्या विनोदकडून चित्र रसिकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत, विशेषतः अचानक नंतर. ■

### सॅन्सॉरच्या कात्रीतून सुटलेले चित्र

एखादे चित्र सेन्सॉर बोर्डाने अडवले की त्या चित्राची हवा तयार होत असे. पण सेन्सॉर डझनावारी चित्रे अडकवून ठेऊ लागल्यावर विशेष जागरूक रसीकांची या विषयातील गोडी कमी झाली आणि चित्रपट व्यवसायिकांनी बोर्डाचा धसका घेतला. बोर्डाने त्र्याहत्तरच्या जून नंतर जी पाच सात चित्रे अडकवून धरली होती त्यापैकीच प्राण जाए पर वचन न जाए हे एक चित्र. हे चित्र बोर्डाने अडकवल्यावर या चित्राच्या निर्मात्यापेक्षाही बिचारा सुनिल दत्त जास्त हवालदिल झाला होता. बाहत्तरच्या जूनपासून ते त्र्याहत्तरच्या ऑक्टोबर पर्यंत बिचाऱ्याचे एकही चित्र पडद्यावर आले नव्हते. त्यामुळे सुनिलचे



प्राण जाए
पर वतन
न जाए मध्ये
सुनील दत्त । रेखा

लफंगे मध्ये
मुमताज । रणधीर



अस्वस्थ होणे समजू शकते. वर्षाअखेरीस त्याचे हिरा नावाचे चित्र पडद्यावर आले खरे पण चित्रपटाच्या जाहिरातीमध्ये त्याच्यापेक्षा शत्रुघ्न सिन्हाला महत्व दिले गेले. गेल्याच महिन्यामध्ये बोर्डाने तुंबवलेली चार-सहा चित्रे मोकळी केली. त्यामध्येच सुनिलचे प्राण जाए पर वचन न जाए हे चित्रही मोकळे झाले आहे. या चित्रामध्ये सुनिलबरोबर नायिका आहे रेखा. याच जोडीचे मद्रासी ढंगाचे जमीन अस्मान नावाचे चित्र पडद्यावर आले आणि गेले. प्राण जाएच्या वाट्याला तेच भवितव्य येऊ नये अशी सुनिलच्या चाहत्यांनी इच्छा बाळगणे गैर ठरणार नाही.

मोठ्या घराण्याचे नाव सांगणाऱ्या रणधीरची वाट जरा नागमोडीच दिसते. जवानी दिवानीच्या यशानंतर रणधीरच्या वाट्याला 'रिक्षावाला'चे सणसणीत अपयश आले. नाव असलेली नायिका असली की अपयशाचे 'रिस्क' कमी असा आडाखा ठेऊन रणधीर सध्या कामे स्वीकारीत असावा. अजूनही आपला टवटवीतपणा टिकवून असलेली मुमताझ रणधीरची नायिका बनून येत आहे लफंगे या चित्रामध्ये.



दो चोर
पद्मा खन्ना । अरुणा इराणी

पद्मा खन्ना मुमताजची जागा घेऊ शकेल काय? याबद्दल अनेक मंडळींना दांडगी उत्सुकता लागून राहिली होती. पद्माची मोठी भूमिका असलेले 'सौदागर' हे चित्र चालते तर बिचारीला जरा वाट मोकळी झाली असती. सुंदर बाह्य चित्रण लाभलेले सौदागर कोसळले. खरं सांगायचं तर 'बॉबी'च्या झंझावती यशाशी टक्कर देऊन उभे राहू शकेल असे एकही हिन्दी चित्र मुंबईमध्ये अजून तरी नाही. जोशीला आपटला. हीरा निस्तेज झाला. सौदागरचे तीन तेरा वाजले. आणि पद्माला सध्या तरी काही खास वाव राहिला नाही. पद्मा खन्नाची महत्त्वाकांक्षा तरी मोठी आहे. अरुणा इराणीचे तसेही नाही. दुय्यम दर्जाच्या चित्राची नायिका म्हणून ती ज्या सफाईने मेहमूदबरोबर वावरेल त्याच सफाईने 'बॉबी' सारख्या चित्रपटातील छोटी भूमिका स्वीकार करेल. वेळ असला तर पाहुणी कलाकार म्हणून मराठी चित्रासाठीही धावाधाव करेल. तात्पर्य काय, मनस्ताप करून न घेणारा कलाकारांचा जो वर्ग असतो त्या गटातील ही हसतमूख छोकरी, कोणाबरोबरही खुलून दिसते. चित्रपटाचे नाव 'दो चोर' असले तरी चोरी करणाऱ्या नायकांचे दिल खास फिल्मी ढंगाने चोरणारी चतुराही हवीच. 'दो चोर'मध्ये ही कामगिरी अरुणा इराणी व पद्मा खन्ना यांनी संभाळली आहे. ❀

## निगूडा : पृष्ठ ३९ वरून

घेऊन आला. केडा आल्याबरोबर निगूडा इतका वेळ दगडावर जो बसून होता तो झटकन् उठला. आणि त्याने आदराने केडाला त्या दगडावर बसविलं.

गेल्या रात्रीतल्या साध्या घटनांवर मग सविस्तरपणे खल झाला, निगूडाला आणि उदगाला न समजणाऱ्या बऱ्याच गोष्टी केडाने उजेडात आणल्या. तो वयाने पिकलेला असला, शक्तीने खंगलेला असला तरी अनुभवाने डवरलेला होता ! आता संथपणे वाहणाऱ्या त्याच्या आयुष्यातील प्रवाहातून 'अनुभवाचे बोल बाहेर येत होते. त्याने आयुष्यभर झेललेल्या संकटातून त्याला जे ज्ञान मिळालं होतं, आणि ज्या ज्ञानाची स्मृती म्हणून त्याला जपणूक करता आलेली होती, त्याचा आता इथं या बैठकीत उपयोग होत होता. म्हणूनच म्हाताऱ्या माणसाविषयी त्या वस्तीला विशेष प्रकारचा आदर होता. एखादा म्हातारा-माणूस मेला तर सारी वस्ती दिङ्मूढ होऊन जात होती. एका मोठ्या आधाराला पारखं झाल्याचं दुःख तिथं उमटत होत !

निगूडाने म्हाताऱ्या केडाजवळून बऱ्याच गोष्टी कान देऊन ऐकल्या. त्यावेळी त्याचे बारीक बिबटे डोळे उजळत होते. मेंदू सारखा काहीतरी बोध घेत होता. कसला तरी विचार आपोआप सुचत होता. काही तरी निश्चित उपाययोजना आखण्याच्या उलाढाली करीत होता.

प्रथम निगूडाचं आणि उदगाचं मत होतं की, ही जागा आजच्या आज बदलून टाकावी. किंवा लवकर तरी बदलावी. आपल्यावर या जागेचा कोप झालेला आहे अशी त्यांची धारणा झालेली होती. ज्यावर आपण काहीही उपाय करू शकत नाही अशा एका बलिष्ठ उद्दाम शक्तीने त्यांना शह दिला होता, आव्हान दिलं होतं ! ते आव्हान स्वीकारायची हिंमत निगूडा, उदगात नव्हती ! कारण त्या उद्दाम परंतु गूढ शक्तीचा त्यांना थांगपत्ताच लागू शकत नव्हता ! कशावर हल्ला करायचा म्हणजे त्या शक्तीचा नायनाट होईल हे त्यांना उमगत नव्हतं ! त्या शक्तीचा उगम त्यांना सापडत नव्हता, या उत्पातांच्या मागे असलेला तिचा हेतू त्यांच्या लक्षात येत नव्हता ! तिच्या येण्याला निश्चित दिशा नव्हती तशी जाण्यालाही नव्हती !

मग झगडा कसा करायचा ? टक्कर कशी द्यायची ? कुणाला द्यायची ? हेच त्यांना उमगत नव्हतं !

म्हणून इथून दूर दूर जाणंच त्यांना इष्ट वाटत होतं. तिच्या तावडीतून सुटण्याचा हाच एकमेव मार्ग त्यांना सुचत होता.

आणि या विचारांना पुष्टी येण्याला दुसरंही एक कारण झालेलं होतं. कालच वडीगाच्या वस्तीवरून पुन्हा त्यांच्यावर टेहेळणी झाली होती. त्या टेहेळणीच्या मागचा हेतू स्पष्ट होता. परंतु त्या टेहेळणीला निगूडा इतका भीत नव्हता. असल्या संकटांना टकरा देण्याचं कसब त्याच्या अंगी होतं. त्यातच तो लहानाचा मोठा झाला होता !

आणि त्या टेहळणीमुळे तर त्याचा मोठा फायदाच झालेला होता. पूरिया वडीगाच्या वस्तीपर्यंत अजून पोहोचली नाही हे आता निश्चित झालेलं होतं, आणि ती आपल्याही वस्तीवर नाही हे वडीगाच्या माणसांना समजून चुकलेलं होतं ! म्हणजे पुन्हा आता तसल्या प्रकारच्या आणि त्या हेतूनं होणाऱ्या टेहळणीची भीती नाहीशी झाली होती.

तरी पण आदल्या दिवशी टेहेळणी झाली आणि लगेच रात्री हा एवढा प्रकोप झाला. या दोहोंचा कुठे तरी नक्कीच संबंध असला पाहिजे, असं म्हातारी रिशा सकाळपासून सांगत होती !

निगूडाला आणि उडीगाला ही जागाच बदलावी असं वाटण्याच्या मुळाशी थोड्या अंशाने तेही एक कारण असावं !

पण केडानं त्यांना सर्व प्रकारांनी खात्री करून दिली. या विशिष्ट ठिकाणाचं महत्त्व पुन्हा एकदा त्यांच्या मनात बिंबवलं— इथल्या नदीचा विस्तार, खोली, पाण्याची मुबलक सोय, माशांचा सुकाळ, कंदमुळांची विपुलता, शिकारीला मोक्याची जागा. किर्रं झाडी, उंच डोंगर, दऱ्याखोऱ्या आणि त्यात हमखास सापडणारी श्वापदं, आणि एवढं मोठं वडाचं झाड. सुरक्षिततेच्या दृष्टीने या साऱ्या बाजू किती तरी महत्त्वाच्या आहेत याचं परिणामकारक चित्र केडाने त्या दोन तरुणांपुढे उभं केलं !

शत्रूचा मारा आल्यानंतर प्रतिकाराला कणखर पवित्रे टाकण्याकरिता कोणकोणत्या जागा किती महत्त्वाच्या आहेत हे सारं त्याने त्या त्या परिसराकडे हातवारे करून दाखविलं. तेव्हा निसर्गाचं कालच्या रात्रीचं भयानक स्वरूप कुठल्या कुठं नाहीसं झालं होतं !

नदीचं घोंघावणारं पात्र, डोंगराचे काळेनिळे सुळके, दऱ्यातली अंधारलेली घूसरता, दाट झाडीची दडस हिरवी घनता आणि तो सारा न्हाऊन निघालेला हिरवट माळ केडाने निगूडाच्या नजरेसमोर अगदी नव्या स्वरूपात उभा केला. निगूडाच्या डोळ्यात त्या साऱ्या परिसराचं आगळंच प्रतिबिंब उमटलं-आणि मोठ्या खुषीत येऊन त्याने वृद्ध केडाला कडकडून मिठी मारली !

आता सूर्य बराच वर आलेला होता. फार प्रयासाने झोपड्यांतून विस्तव तयार केला गेला होता. तुरळकपणे नित्याच्या व्यवहाराला सुरुवात झालेली होती. झोपडीतील काहींचं कामाकडे लक्ष होतं आणि काहींचं या तिघांकडे होतं. पुढच्या साऱ्या घडामोडी पाहण्यास आणि करण्यास सारे उत्सुक दिसत होते.

हे तिघं वस्तीवर पोहोचले. सर्वं तरुण मंडळी, बाया-मुलं एकत्र जमली, आणि मोडतोड झालेल्या ठिकाणांची डागडुजी करण्याच्या उद्योगाला लागली. झाडांच्या मोठमोठ्या फांद्या तोडून त्यांनी काही झोपड्यांना आधार दिला.काही झोपड्या नवीनच उभारण्यात आल्या.

शिलकीतलंच खाण्यापिण्याचं वापरून त्यांनी दुपार भागविली.

दुपार टळल्यानंतर ती माणसं विश्रांतीला पडून राहिली. चहूकडची सारी व्यवस्था नीट झाल्यावर निगूडाला समाधान वाटलं आणि मोठ्या खुषीत येऊन त्यानं उदगाला जवळ बोलावलं.त्याच्याशी कानगोष्टी केल्या आणि उद्या दिवस उगवायच्या आत पूरियाच्या शोधाला निघायचा विचार त्याने उदगाजवळ स्पष्ट केला.

त्यामुळे उदगा एकदम बिघडला. रात्रीचा उत्पात त्याच्या डोळ्यांपुढे नाचू लागला. पूरियाचा नाद निगूडाने सोडून द्यावा असं त्याला वाटलं, परंतु निगूडाजवळ ते व्यक्त करण्याची त्याची हिंमत नव्हती! मग मनातल्या मनातच तो निगूडावर जळफळू लागला. त्याचा तिरस्कार करू लागला ! ¤

**[ प्रकरण १० ते १९ पुढील अंकी ]**




# पण आम्ही समाधानी नाही.

दहा वर्षापूर्वीची गोष्ट आहे; महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने चाचपडत चाचपडत आपली वाटचाल सुरू केली. कार्य मोठे व बिकट होते म्हणून आम्ही विचकलो नाही. आम्हीच आमची वाट शोधली—कधी प्रयोगांचा आधार घेऊन, कधी नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे तर कधी साहस करून! या धडपडीची फलश्रुति उघडच आहे.

आम्ही असे मानतो की एखादी चांगली गोष्ट झाली तर ती अधिक चांगली करण्याचा प्रयत्न करावा. काही उणीवा असल्या तर त्या दूर कराव्यात.

समस्या आणि समस्या — थोड्याथोडक्या नाहीत, खंडीभर! कच्च्या मालाचा कायमचा तुटवडा, वाटपयंत्रणेतील अडथळे, कनिष्ठ प्रतीची उत्पादकता, जुनाट यंत्रसामुग्री, इत्यादि, इत्यादि. या सगळ्याच समस्या आमच्या आवाक्याबाहेरच्या; पण तरीही त्या सोडविण्याचा आम्ही आमच्या परीने प्रयत्न केला — अजूनहि करीत आहोत. कारण ९५ टक्के यश मिळाले तरीहि तेवढ्यावर समाधान मानणे बरोबर नाही. उरलेल्या पाच टक्क्यांचाही विचार केला पाहिजे.

MSSIDC

**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लि.**

(महाराष्ट्र शासननिर्मित संस्था)

कृपानिधि, बॅलार्ड इस्टेट, पो. बॉ. क्र. ३११ अ, मुंबई ४०० ००१.

टेलिफोन: २६११२१ टेलेक्स: ०११-३३९९ तार: MASSIDCORP

Chaitra/MSSIDC/28 mar Rev.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच, संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**